04-03-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A

KBS/ 14:00

03-04-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A 1

KBS/SBT/MH. 14:00

**सभापतीस्थानी - माननीय सभापती.**

**महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्यांबाबत ...**

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी आपल्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, 1) श्री.भीमराव पोळ, पालम, जिल्हा परभणी., 2) श्री. रामराव कानवते, किनवट, जिल्हा नांदेड., 3) श्रीमती गंगूबाई तांदळे, नांदूरघाट, जिल्हा बीड., 4) श्री.गजानन वासुदेव ठोके, सांतेगाव, जिल्हा अमरावती या शेतकऱ्यांनी 30 मार्च 2006 रोजी दरम्यान आत्महत्या केलेल्या आहेत तर दिनांक 31 मार्च 2006 रोजी श्री. राजू उदयभान दुर्बे, पोरगवान, ता.कळम, जिल्हा यवतमाळ., 2) श्री. दिगंबर शामराव बहाणे, रामनगर, चिखली, जिल्हा बुलढाणा., 3) श्री. चंद्रभान बाबूराव गुडमुळे, सायंखेड, ता.केळापूर, जिल्हा यवतमाळ या शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे. राज्यामध्ये आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची संख्या आतापर्यंत 415 झालेली आहे.

*****

...... ए 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## तोंडी उत्तरे.

### जत, शिराळा (जि. सांगली) आदी ठिकाणी बेकायदा रॉकेल, पेट्रोल साठयावर पोलीसांनी टाकलेले छापे

(1) * 12965 **प्रा. शरद पाटील , श्री. जयंत पाटील** : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(1) माहे जानेवारी,2005 ते फेब्रुवारी,2006 या कालावधीत सांगली जिल्ह्यातील जत, शिराळा, कवलापूर व आदी ठिकाणी पोलीसांनी छापे टाकून बेकायदा रॉकेल व पेट्रोल साठा जप्त करण्यात आलेला आहे हे खरे आहे काय,
(2) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय,
(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार असा विना परवाना साठा बाळगणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. बाबा सिद्दीकी, श्री.सुनील तटकरे यांच्याकरिता** : (1) होय. हे खरे आहे.
(2) होय.
(3) माहे जानेवारी, 2005 ते फेब्रुवारी, 2006 या कालावधीत सांगली जिल्ह्यातील विविध ठिकाणी पोलीसांनी एकूण 55 छापे टाकले, या प्रकरणांमध्ये, पेट्रोल, डिझेल व केरोसीनशी निगडित बेकायदेशीर व्यवहार करण्यता येत असल्याचे आढळले. या अनुषंगाने मुद्देमाल जप्त करुन संबंधितांविरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा, 1955 च्या कलम 3 व 7 अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले व 82 व्यक्तिंना अटक करण्यात आली.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, सांगली जिल्ह्यात जानेवारी 2005 ते फेब्रुवारी 2006 या कालावधीत एकंदर 55 छापे टाकले असल्याची माहिती या उत्तरात दिलेली आहे तसेच पुढे असेही म्हटले आहे की, या प्रकरणांमध्ये पेट्रोल, डिझेल व केरोसीनशी निगडित बेकायदेशी व्यवहार करण्यात येत असल्याचे आढळले आहे. तेव्हा हे जे 55 छापे टाकले आहेत ते वेगवेगळ्या 55 ठिकाणी टाकले आहेत का ? आणि पेट्रोल, डिझेल व केरोसीनशी संबंधित बेकायदेशीर व्यवहारांचे स्वरूप काय आहे ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, हे 55 छापे वेगवेगळ्या 55 ठिकाणी टाकण्यात आलेले आहेत आणि त्याची यादी देखील आता माझ्याकडे उपलब्ध आहे. आपण सांगितले तर ती यादी येथे वाचून दाखविण्यास मी तयार आहे किंवा सभागृहाच्या पटलावर देखील मी ठेवू शकतो. सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या दुसऱ्या प्रश्नाबाबत माहिती देताना मी आपल्याला सांगू इच्छितो की, या छाप्यांमध्ये जे काही साठे आढळले ते केरोसीन किंवा पेट्रोल

....... ए 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. तटकरे (पुढे चालू....) ता.प्र.क्र. 12965 .....

मिश्रित इंधन तयार करून त्याची विक्री करण्याचा तो एक भाग होता. त्यामुळे पोलिसांनी छापे टाकून संबंधितांवर गुन्हे दाखल केले आहेत.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, हे केरोसीन कोणाकडून घेण्यात आले होते ? आपले जे अधिकृत परवानाधारक होते त्यांच्याकडून हे केरोसीन घेण्यात आले असेल तर त्यांच्या विरोधात आपण काय कारवाई केली आहे ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, याबाबतीत अजून पोलीस तपास चालू आहे. सांगली जिल्ह्यातील किंवा बहुतांश जिल्ह्यातील काही परवाने धारकांकडून केरोसीन घेतले गेले असेल तर त्यांच्या विरूद्ध आपण निश्चितपणे कारवाई करू. परंतु याबाबतीतील माहिती आम्हाला अजून प्राप्त झालेली नाही.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, लिखित उत्तर में लिखा है कि पुलिस ने 55 छापे मारे हैं. मैं यह जानना चाहती हूं कि इनमें से कितने पेट्रोल पंप सील किए गए हैं ? दूसरा प्रश्न यह है कि, छापे मारना यह एक सिम्टोमॅटिक ट्रीटमेंट की तरह है. आज पूरे महाराष्ट्र में इस मामले में भ्रष्टाचार फैला नज़र आता है. अत: इस मामले में हो रहे भ्रष्टाचार को रोकने के लिए शासन क्या कदम उठाएगा ? मैं एक बात और यहां बताना चाहूंगी कि, इसी संबंध में मैंने परभणी में "जन समस्या शोध अभियान " चलाया था, जिसमें अधिकाधिक शिकायतें राकेल की कमी के संबंध में थी. लेकिन नागपुर अधिवेशन में लिखित उत्तर में शासन की ओर से यह जानकारी दी गई थी कि राकेल की कमी नहीं है. तो जिस अधिकारी ने सभागृह को झूठी जानकारी दी है, उसके खिलाफ सरकार क्या कार्रवाई करेगी ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, हे जे छापे टाकण्यात आलेले आहेत ते पेट्रोल पंपावर टाकण्यात आलेले नाहीत. पेट्रोल पंपांवर 2005 मध्ये एकंदर 111 तपासण्या करण्यात आल्या आणि तेथील नमुने तपासणीसाठी आपण पाठविले आहेत. त्यापैकी एक नमुना दोषी आढळला. त्याच्यावर फौजदारी गुन्हा दाखल केलेला आहे तसेच सदर पंपदेखील बंद करण्यात आलेला आहे. सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो दुसरा प्रश्न विचारला आहे तो अत्यंत महत्त्वाचा आहे तो म्हणजे राज्यभरामध्ये आमच्या विभागाने नेमकी काय करायचे ठरविले आहे ?

..4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे....

केरोसीन विक्रीमध्ये मोठ्या प्रमाणात भेसळ किंवा अवैध विक्री होते हे लक्षात आल्यानंतर केरोसीनच्या वाटपामध्ये पूर्णपणे पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीने जानेवारी महिन्यापासून आपण कारवाई सुरू केलेली आहे. मुंबई ठाणे या रेशनिंग एरियामध्ये घाऊक परवानाधारक आहेत त्यांना किती केरोसीन दिले आहे, अर्धघाऊक परवानाधारक आहेत त्यांना किती केरोसीन दिले आहे ...

( यानंतर श्री. सरफरे ..... बी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 12965...

श्री. सुनील तटकरे...

किरकोळ विक्रेत्यांना किती केरोसीन दिले याची माहिती स्थानिक लोकप्रतिनिधी, नगरसेवक, पंचायत समितीचे सभापती, जिल्हा परिषदेचे सदस्य, विधीमंडळ सदस्य यांना देण्याचे निश्चित केले आहे. त्याचबरोबर प्रत्येक दुकानामध्ये दारिद्रय रेषेखालील लाभार्थींची यादी प्रसिध्द केली असून त्याची प्रत विधीमंडळ सदस्यांना देण्यासंदर्भात कार्यवाही केली आहे. प्रत्येक महिन्याला किती नियतन मंजूर केले जाते याची प्रत्येक दुकाननिहाय माहिती प्रसिध्दी माध्यमांना देण्याची तजवीज केली आहे. त्या अनुषंगाने लोकप्रतिनिधींच्या कार्यक्षेत्रामध्ये किती केरोसीन येते याची माहिती वर्तमानपत्रामधून लोकांना समजली तर त्यावर देखील नियंत्रण राहील. अशाप्रकारे यामध्ये पारदर्शकता आणण्याचा राज्य सरकारने प्रयत्न केला आहे. त्याकरीता दक्षता समित्या स्थापन केल्या असून ग्रामपंचायतीच्या पातळीवर दक्षता समित्या स्थापन करण्याची तजवीज केली आहे.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, पेट्रोल व डिझेलमध्ये केरोसीनची भेसळ करुन बेकायदेशीररित्या त्याची विक्री केली जाते. त्याचप्रमाणे नॅफ्थ्याची देखील पेट्रोलमध्ये भेसळ केली जाते हे खरे आहे काय? दुसरा प्रश्न असा की, मागणी प्रमाणे पुरवठा करण्याकरीता महिन्याकाठी किती कोटा रिलिज करण्यात आला याची माहिती सर्वांना होण्यासाठी केरोसीनची वेबसाईट तयार केली तर केरोसीनचा किती कोटा रिलिज झाला हे सर्वांना बघता येईल. अशाप्रकारची पध्दत आपण सुरु करणार काय?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, जप्त करण्यात आलेल्या पेट्रोलमध्ये केरोसीनसदृश्य इंधन आढळल्यामुळे ते तपासणीसाठी लॅबोरेटरीकडे पाठविण्यात आले व संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात आला. माननीय सदस्यांनी वेबसाईट सुरु करण्याबाबत प्रश्न विचारला आहे. यामध्ये पारदर्शकता आणण्यासाठी निश्चितपणे वेबसाईटवर माहिती देण्याची व्यवस्था करु.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, पहिल्या प्रश्नाचे उत्तर "होय" असे देण्यात आले आहे. हे बेकायदेशीर रॉकेल कोठून आले याची माहिती आपल्याला मिळाली आहे काय? पोलिसांनी आपले प्रेम दाखविले तर पटकन गुन्हा सापडत नाही. परंतु जर त्यांनी जास्त प्रेम दाखविले तर गुन्हा सापडतो. तेव्हा हा रॉकेल व पेट्रोलचा साठा कोठून आला होता याची माहिती मंत्रिमहोदयांनी द्यावी?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 12965...

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, हे केरोसीन कोठून आले याबाबत या क्षणापर्यंत राज्य सरकारकडे माहिती नाही.परंतु हे केरोसीन कोठून आले याबाबत तातडीने तपास करावा अशाप्रकारच्या सूचना पोलीस यंत्रणेला दिलेल्या आहेत.

डॉ. एन. पी. हिराणी : सभापती महोदय, मी गेल्या सात वर्षापासून या सभागृहामध्ये उपस्थित राहत आहे. या काळामध्ये प्रत्येक वर्षीच्या अधिवेशनामध्ये केरोसीन व पेट्रोलच्या भ्रष्टाचारासंबंधी प्रश्न उपस्थित करण्यात आलेला आहे. प्रत्येक वेळी या सदनामध्ये विषय उपस्थित करण्यात आल्यानंतर त्यावर माननीय सदस्य पोटतिडिकीने बोलतात. त्यावर मंत्रिमहोदयांकडून तात्पुरते उत्तर दिले जाते. प्रश्न असा आहे की, या भ्रष्टाचाराला आळा घालण्याकरीता सद्याचा प्रचलित कायदा असमर्थ ठरला आहे. कारण या कायद्यामधील पळवाटांमुळे अधिकारी लोकप्रतिनिधींचे खिसे गरम करण्यामध्ये समर्थ ठरत आहेत. तेव्हा या कायद्यामध्ये बदल करुन नवीन कडक कायदा करणार काय? तशाप्रकारचा कायदा झाल्यास या पुढील काळात भ्रष्टाचार करण्यास कुणीही धजावणार नाही.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय सदस्यांच्या सूचनेचा विचार केला जाईल.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, केरोसीनचा काळाबाजार हा या सदनातील रोजचा विषय आहे. आज राज्यामध्ये केरोसीनचे टँकरच्या टँकर काळया बाजारामध्ये विकले जातात ही आपली व्यथा आहे. मुंबई शहरातील उपनगरामध्ये 1 कोटी लोकसंख्येपैकी 70 लाख लोक झ ोपडपट्टयांमध्ये राहतात. केरोसीनवर त्यांचे जीवन अवलंबून असते. परंतु बाजारात घ्यायला गेल्यास त्यांना केरोसीन उपलब्ध होत नाही.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12965 (पुढे सुरु...

श्री.मधुकर सरपोतदार (पुढे सुरु...

पण रेशनिंग दुकानामध्ये काळ्याबाजारात 20 रुपये लिटरनी रॉकेल विकले जाते. हे रॉकेल कोठून येते, याला कोण जबाबदार आहे ? त्या संबंधात आतापर्यन्त कोणत्या प्रकारच्या कारवाया केलेल्या आहेत ? आता दक्षता समित्या निर्माण झालेल्या आहेत, परंतु बैठकीची नोटीस आम्हाला अजून आलेली नाही. काळाबाजार करणाऱ्यांना आज मोकाट सोडलेले आहे. या गैरव्यवहार प्रकरणी त्यांच्यावर कोणती कारवाई करणार अहात ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन सरकारने केलेल्या उपाययोजनेची माहिती आपल्यामार्फत सभागृहाला दिली. त्याचबरोबर विविध स्तरावरील दक्षता पथकांच्या मार्फत अनेक वेळेला धाडी घालून रॉकेल जप्त केले जाते. जे परवाना धारक असतील त्यांचा परवाना निलंबित केला जातो. त्याचबरोबर बाजारभावाने किंमत वसूल करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केला जातो. सर्वच लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन सार्वजनिक वितरण व्यवस्थेवर लक्ष ठेवण्याच्या दृष्टीने रेशनिंग ट्रेडिंग योजना सुरु केलेली आहे. त्यामुळे भविष्यामध्ये सर्व गोष्टींवर निश्चितपणे आळा बसेल असा मला विश्वास वाटतो.

श्री.जितेंद्र आव्हाड : विशेषत: पेट्रोल, डिझेलचा जो भाग आहे, त्याचे वितरण आंतरराष्ट्रीय कंपन्यांकडून केले जाते. त्यामध्ये बीपीसीएल, आयपीसीएल, आयओसी, शेल या कंपन्या आहेत. घाऊक बाजारामध्ये नाफ्थ्याचे ट्रक पकडलेले आहेत आणि आरोपींना मोक्काखाली अटक केलेली आहे. मुळामध्ये पेट्रोल, डिझेल जेथून येते, त्या ठिकाणचा तपास केलेला आहे काय ? ज्या ठिकाणी ते ट्रक पाठविले जातात, त्या ठिकाणी जे कोणी ऑर्गनायझर असा व्यवहार करतात त्यांच्यावर मोक्का खाली कारवाई करणार आहात काय ?

श्री.सुनील तटकरे : लेखी जो प्रश्न विचारलेला आले त्यामध्ये बेकायदा रॉकेल पेट्रोलचा साठा जप्त करण्यात आलेला आहे हे खरे आहे काय ? त्यासंबंधात 82 व्यक्तींना अटक केलेली आहे. सन्माननीय सदस्यांचा प्रश्न व्यापक आहे.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

ता.प्र.क्र.12965 (पुढे सुरु...

**सभापती** : मंत्री महोदय सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी प्रश्न उपस्थित केला, तो या प्रश्नाशी अप्रत्यक्ष संबंधित नसेल, परंतु डिझेल आणि पेट्रोलमध्ये जी भेसळ होते, त्या संबंधात ज्या कंपन्या हे डिझेल, पेट्रोल पाठवितात तेथून तपास करावा लागेल, या दृष्टीने शासन काळजी घेईल काय, आणि तसे आढळून आले तर कठोर कारवाई केली जाईल काय ?

श्री.सुनील तटकरे : याची शासन काळजी ? घेईल आणि कठोर कारवाई करेल. ज्या काही समन्वय समित्या आहेत, त्यांच्या बैठका बोलावून त्याबाबतीत त्यांना सूचना देण्यात येतील.

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी जी अपेक्षा व्यक्त केली, त्याच संबंधात मी प्रश्न विचारणार होतो. पोलिसांनी छापे टाकलेले आहेत. त्यामुळे गृह खात्याच्या मंत्र्यांनी उत्तर द्यायला पाहिजे. आपले घर साफ करता येत नाही आणि उकिरडा साफ करायला निघालेले आहेत, असा प्रकार झालेला आहे. गृहमंत्र्यांच्या सांगली जिल्ह्यामध्ये हे घडलेले आहे.

यानंतर श्री.बरवड ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT प्रथम श्री. किल्लेदार 14:15 वा.

ता. प्र. क्र. 12965.... श्री. दिवाकर रावते ...

त्या जिल्ह्यामध्ये एवढा भ्रष्टाचार चाललेला आहे. माझा प्रश्न असा आहे की, पोलिसांनी टाकलेल्या छाप्यांमध्ये 85 व्यक्तींना अटक करण्यात आली त्यांचे काय झाले ? हे छापे टाकत असताना त्यामध्ये पुरवठा खात्याचे कोणकोण अधिकारी सामील आहेत याची चौकशी झाली काय ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे माझ्याकडे 55 प्रकरणांचा तपशील आहे. कोणकोणत्या पोलीस स्टेशनच्या कोणत्या अधिकाऱ्याने कोणत्या ठिकाणी हे छापे टाकलेले आहेत त्याची माहिती पटलावर ठेवण्यास तयार आहे. ज्यांना अटक केलेली आहे त्यांना वेगवेगळ्या वेळी न्यायालयाने जामीन दिलेला आहे. त्यामुळे हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, खरे म्हणजे हा प्रश्न रॉकेल, पेट्रोल आणि गॅसशी संबंधित आहे. सांगली जिल्ह्याच्या पुरवठा विभागाने गॅसचा काळाबाजार करणाऱ्यांवर कारवाई केली. वितरकांवर देखील छापा टाकून त्या ठिकाणी काही गैरप्रकार उघडकीस आणले. त्यामुळे आता गॅस वितरकांवर बरीचशी दहशत बसलेली आहे आणि ते नीट कारभार करीत आहेत. परंतु रॉकेलचा काळाबाजार अगदी सुखनैव सुरु आहे. कवलापूर या गावामध्ये श्री. माळी नावाच्या व्यक्तींवर गॅस सिलेंडर्सचा बेकायदेशीर साठा केल्या प्रकरणी छापा टाकला गेला. त्यावेळी गॅस सिलेंडर्स एका टेम्पोमध्ये होते. त्यानंतर त्यांच्यावर गुन्हा दाखल केला. त्याबाबत पुढे काय झाले हे कळलेले नाही. परंतु त्याच ठिकाणी रॉकेलची विक्री होत होती आणि त्यामध्ये काळाबाजार केल्याचा सुगावा लागल्यानंतर पोलिसांनी छापा टाकला. त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर रॉकेल सापडले. ते प्रकरण देखील दडपले गेले अशी चर्चा नागरिकांमध्ये आहे. तेव्हा गॅसचा, रॉकेलचा काळाबाजार करणाऱ्या कवलापूर येथील श्री. माळी या व्यक्तीचे काही गॅस वितरकांशी आणि रॉकेलच्या वितरकांशी संबंध आहेत आणि त्यातून हा सगळा प्रकार सुरु आहे. असेच प्रकार सांगली जिल्ह्यात इतर ठिकाणीही सुरु आहेत. त्यांच्या या संबंधांची माहिती घेऊन त्या दोघांवर पुरवठा खात्यामार्फत कारवाई केली जाईल काय ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी जी माहिती दिली किंवा जो प्रश्न विचारला त्याची एक दोन दिवसांमध्ये जिल्हाधिकाऱ्यांकडून चौकशी करण्यात येईल आणि जर आमच्या विभागाचे ते परवानाधारक असतील तर तो परवाना तात्काळ निलंबित केला जाईल आणि त्यांच्यावर पुढील फौजदारी कारवाई केली जाईल.

-----

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## मुंबईतील घाटकोपर येथील पंतनगर शिधावाटप कार्यालयाची दुर्दशाबाबत

**(2) * 15158 श्री. मधुकर सरपोतदार , श्री. अरविंद सावंत , श्री. दिवाकर रावते , डॉ. निलम गोऱ्हे , श्री. विलास अवचट , श्री. विनोद तावडे , श्री. मधुकर चव्हाण , श्रीमती संजीवनी रायकर , डॉ. अशोक मोडक** : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबईतील घाटकोपर येथील पंतनगर येथील शिधावाटप कार्यालयाची दुर्दशा झाल्याबाबत म्हाडाला पत्रव्यवहार करुनही त्याकडे दुर्लक्ष होत आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदरहू कार्यालय म्हाडाच्या गृहनिर्माण मंडळाच्या वसाहतीत असून सदर कार्यालयाची इमारत म्हाडाच्या मालकीची आहे हे खरे आहे काय,

(3) असल्यास, याबाबत वारंवार संबंधित अधिकाऱ्यांनी म्हाडाच्या संबंधित अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष भेटून व पत्रव्यवहारातून संपर्क साधूनही पंतनगर येथील शिधावाटप केंद्र अद्याप दुरुस्तीच्या प्रतिक्षेत आहे हे खरे आहे काय,

(4) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(5) असल्यास, त्यात काय आढळून आले व या इमारतींची दुरुस्ती करणेबाबत वा शिधावाटप कार्यालय अन्य सोयीच्या ठिकाणी सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,

(6) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनील तटकरे** : (1) होय.

(2) होय.

(3) होय.

(4) होय.

(5) इमारतीची संपूर्ण दुरुस्ती करणे आवश्यक आहे. तथापि कार्यालयस्थित इमारतीचा पुर्नविकासाचा प्रस्ताव म्हाडाने बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे सादर केला आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणातील दुरुस्ती करणे शक्य नसल्याचे म्हाडा कार्यालयाने कळविले आहे.

(6) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या ठिकाणी दिलेले उत्तर हे मासलेवाईक उत्तराचा एक नमुना आहे. ज्यावेळी पंतनगर येथील वसाहत बांधली गेली त्यावेळी ती मेन्टेनंस इंजिनिअर्ससाठी बांधली गेली. त्या ठिकाणी मेन्टेनंस इंजिनिअर्सचे तसेच रेशनिंगचे कार्यालय वगैरे गोष्टी आल्या. जवळजवळ 46-47 वर्षे त्या कार्यालयाची सुधारणा किंवा दुरुस्ती झालेली नाही. या ठिकाणी तऱ्हेवाईक उत्तर दिलेले आहे. या ठिकाणी दिलेले उत्तर वाचण्यासारखे आहे. उत्तरामध्ये

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT

ता. प्र. क्र. 15158 ...... श्री. मधुकर सरपोतदार .....

असे म्हटले आहे की, इमारतीची संपूर्ण दुरुस्ती करणे आवश्यक आहे. तथापि, कार्यालयस्थित इमारतीचा पुनर्विकासाचा प्रस्ताव म्हाडाने बृहन्मुंबई महानगरपालिकेडे सादर केला आहे. ही सगळी इमारत सिमेंटची बांधलेली आहे. ती इमारत नादुरुस्त झाली याचा अर्थ काय ? हे तपासण्याची आवश्यकता आहे. गेली 40 वर्षे या इमारतीबद्दलच्या तक्रारी चालू आहेत. ती इमारत दुरुस्त करावी अशी मागणी आहे परंतु इमारत दुरुस्त होत नाही. आता पुनर्विकासाचा प्रस्ताव महानगरपालिकेकडे पाठविलेला आहे याचा अर्थ तुमच्या खात्याला ही दुरुस्ती करण्याची इच्छा नाही. जे आहे ते तसेच चालू ठेवावयाचे आहे असा त्याच अर्थ होतो. माझा असा प्रश्न आहे की, आपण स्वत: माननीय गृहनिर्माण मंत्र्यांशी बोलून, ही वस्तुस्थिती त्यांच्या निदर्शनास आणून ताबडतोबीने ही दुरुस्ती होऊ शकते. ती दुरुस्ती करुन ताबडतोब त्या कार्यालयामध्ये काम करणाऱ्या माणसांना दिलासा देऊन लोकांची सोय करणार काय ?

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 15158.......)

श्री. सुनील तटकरे : ही इमारत म्हाडाच्या मालकीची असल्यामुळे आमच्या विभागाने कार्यालय दुरुस्तीचा प्रस्ताव म्हाडाकडे सातत्याने पाठविलेला आहे. माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी सांगितल्याप्रमाणे या कार्यालयाची तातडीने दुरुस्ती होणे आवश्यक आहे. माननीय मुख्यमंत्र्यांकडे हा विभाग असल्यामुळे ही बाब त्यांच्या निदर्शनास आणून या इमारतीची तातडीने दुरुस्ती करण्यासाठी लवकरात लवकर परवानगी मिळविण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री. अरविंद सावंत : या शिधावाटप केन्द्राची अवस्था अशी आहे की, तेथे जमिनीतून पाणी येते आणि अशा गलिच्छ अवस्थेत लोकांना शिधा वाटप केले जाते. खरे म्हणजे या प्रश्नाचे उत्तर गृहनिर्माण विभागाने द्यावयास पाहिजे. हे शिधावाटप केन्द्र तातडीने हलविण्याची आवश्यकता आहे. माझा प्रश्न असा आहे की, या इमारतीच्या पुनर्बांधणीचा प्रस्ताव खाजगी विकासकाने महानगरपालिकेकडे केव्हा सादर केलेला आहे ? सदरहू पुनर्रचित इमारतीमध्ये शिधावाटप केन्द्रासाठी जागा आरक्षित ठेवण्यात येणार आहे काय ?

श्री. सुनील तटकरे : त्याठिकाणी दुकान नाही तर ते कार्यालय आहे. तेथून शिधा वाटप केले जात नाही. तरीही माननीय सदस्यांनी गंभीर विषय याठिकाणी उपस्थित केलेला आहे. मी ही बाब माननीय मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून देईन. या कार्यालयासाठी दुसरीकडे तात्पुरती जागा मिळविण्यासाठीही प्रयत्न केला जाईल. या परिस्थितीच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांशी चर्चा करुन तातडीने आदेश काढण्याची कारवाई केली जाईल.

श्री. मधुकर चव्हाण : या इमारतीच्या दुरुस्तीसाठी 20 लाख रु. द्या, अशी म्हाडाने आपल्या विभागाकडे मागणी केली होती काय ? उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, "त्यामुळे मोठ्या प्रमाणातील दुरुस्ती करणे शक्य नसल्याचे म्हाडा कार्यालयाने कळविले आहे." माझा प्रश्न असा आहे की, या इमारतीचा पुनर्विकास करावयाचा असेल तर त्यासाठी किती दिवस लागणार आहेत ? तसेच या कार्यालयाची दुरुस्ती करावी अशी तेथील कर्मचारी गेली 10-12 वर्षे मागणी करीत आहेत. ते हालअपेष्टामध्ये काम करीत आहेत. तेव्हा याबाबतीत शासनाने कोणती कारवाई केलेली आहे ?

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 15158.......)

श्री. सुनील तटकरे : ही इमारत म्हाडाच्या मालकीची असल्यामुळे म्हाडानेच त्या इमारतीची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. इमारत दुरुस्तीसाठी आम्ही वेळोवेळी प्रयत्न करुन देखील आम्हाला अद्याप यश येऊ शकले नाही. मी माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मी स्वत: म्हाडाच्या अधिका-यांशी बैठक घेईन. ही बैठी इमारत असल्यामुळे या इमारतीची दुरुस्ती शक्य नसून तेथे नवीन इमारत बांधणे आवश्यक आहे अशा त-हेचा तांत्रिक अहवाल आहे. याबाबतीत पुढील कारवाई विशिष्ट कालावधीमध्ये गांभीर्याने केली जाईल.

....नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.शिगम 14:25

ता.प्र.क्र. 15158 पुढे सुरु...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, म्हाडाने सदरहू इमारतीच्या दुरुस्तीचा प्रस्ताव महानगरपालिकेकडे केव्हा पाठविला ? इमारत नादुरुस्त झाल्याची तक्रार शिधावाटप कार्यालयाकडून म्हाडाकडे केव्हा करण्यात आली ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सदरहू इमारतीच्या दुरस्तीबाबत आमच्या विभागाकडून म्हाडाकडे सन 2000 सालापासून पत्रव्यवहार सुरु आहे. म्हाडाच्या अधिकाऱ्यांची आमच्या विभागाच्या अधिकाऱ्यांनी या प्रश्नाबाबत भेट सुध्दा घेतलेली आहे. म्हाडाने 22 सप्टेंबर,2005 रोजी नवीन इमारत बांधण्याचा प्रस्ताव महानगरपालिकेला पाठविला आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, या प्रश्नामध्ये आपण लक्ष घालावे अशी माझी आपल्याला विनंती आहे. कारण या शिधावाटप कार्यालयामध्ये जवळजवळ तीन ते साडेतीन फूट सांडपाणी साचते. अशा परिस्थितीमध्ये तेथील कर्मचारी काम करीत आहेत. हा प्रश्न गृहनिर्माण विभाग आणि अन्न व नागरीपुरवठा विभाग या दोन विभागांशी संबंधित असल्यामुळे प्रश्न क्लब करुन याचे उत्तर येणे आवश्यक आहे. अन्न व नागरी पुरवठा खात्याचा यामध्ये दोष नाही. म्हणून गृहनिर्माण खाते आणि पुरवठा खाते अशा दोन्ही खात्यांशी हा प्रश्न संबंधित असल्यामुळे या प्रश्नाचे उत्तर प्रश्न क्लब करुन देणे आवश्यक आहे.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, मी मघाशीच सांगितल्याप्रमाणे या प्रश्नाबाबत मी माननीय मुख्यमंत्र्यांशी आज किंवा उद्या चर्चा करणार आहे. या प्रश्नाचे उत्तर गृहनिर्माण विभागाने दिले तरी माझी हरकत नाही. परंतु माझ्या विभागाने समर्पक उत्तर दिलेले आहे. वेगळा प्रश्न उपस्थित करुन गृहनिर्माण विभागाने उत्तर दिले तरी माझी हरकत नाही.

**सभापती** : याबाबतीत मी माझ्या कार्यालयात गृहनिर्माण विभाग,अन्न व नागरी पुरवठा विभाग आणि महानगरपालिका यांची संयुक्त बैठक घेऊन या प्रश्नासंबंधी तातडीने निर्णय होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करीन.

------

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**शासकीय आदिवासी आश्रमशाळांमधील मानधनावर काम करणाऱ्या शिक्षकांच्या मागण्यांबाबत**

**(३) * १३०२२ श्री. रामनाथ मोते , श्रीमती संजीवनी रायकर , डॉ. अशोक मोडक :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय आश्रमशाळांमधील गत ७ वर्षांपासून मानधनावर काम करणारे शिक्षक माहे जोनवारी,२००६ मध्ये नाशिक येथील आयुक्त कार्यालयासमोर उपोषणास बसले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपोषणकर्त्या शिक्षकांच्या मागण्या काय आहेत,
(३) पैकी कोणकोणत्या मागण्या मान्य करण्यात आल्या आहेत,
(४) उर्वरित मागण्यांबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे ?

**श्री. रविशेठ पाटील,डॉ. विजयकुमार गावित यांच्याकरिता** (१) होय.
(२) अ) नवीन शिक्षक भरण्यापूर्वीच मानधन शिक्षकांना सरळ सेवेत सामावून घ्यावे.
ब) ३ वर्षापासून ७ वर्ष सेवा झालेल्या मानधन शिक्षकांना सरळ सेवेत सामावून घ्यावे.
क) १ ते २ वर्ष सेवा झालेल्या मानधन शिक्षकांना शिक्षण सेवक म्हणून नेमणूक आदेश द्यावा.
(३) व (४) तासिका पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक केलेल्या उमेदवारांना भविष्यात नियमित नियुक्तीसाठी कोणताही अधिकार सांगता येत नाही व अशी अट नमूद करुन नेमणूक केलेली असल्याने त्यांच्या वरील मागण्यांचा विचार करता येत नाही.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, आदिवासी,डोंगराळ आणि दुर्गम भागात काम करणाऱ्या शासकीय आश्रमशाळातील शिक्षकांचा हा प्रश्न आहे. शासनाने या प्रश्नाचे जे उत्तर दिले आहे ते वाचल्यानंतर आदिवासी विकास विभाग आदिवासींचा विकास न करता त्यांचे शोषण करीत आहे काय असा प्रश्न पडतो. शासनाच्या आश्रमशाळांमध्ये ७०-८० शिक्षक गेल्या ७-८ वर्षांपासून काम करीत आहेत. त्यांना पगार मिळत नाही. या शिक्षकांना ६० रु. रोजंदारीवर ठेवण्यात आलेले आहे. सर्व शिक्षक क्वॉलिफाईड आहेत. मागासवर्गीय म्हणजे अनुसूचित जमातीचे आहेत. माझा प्रश्न असा आहे की, या सर्व शिक्षकांना किती दिवसात शासन सेवेत सामावून घेतले जाणार आहे ? या शिक्षकांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत अडचण काय आहे ? प्रत्येक वेळी १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर हमीपत्र लिहून घेऊन या शिक्षकांची नेमूणक केलेली आहे. हिंदुस्थान एज्युकेशन सोसायटीचा आणि या शिक्षकांच्या नेमणुकाचा काय संबंध आहे ?

यानंतर श्री. खर्चे पी.

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ MHM/ SBT/ पूर्वी श्री. कानडे..... 14:30

ता. प्र. क्र. 13022.......

श्री. रविशेट पाटील : महोदय, या शिक्षकांच्या नेमणुकीबाबत नाशिक येथील आदिवासी विकास आयुक्त कार्यालयात चौकशी केली असता असे समजले की, या शिक्षकांकडून 100 रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर असे लिहून घेण्यात आले होते की, हया नेमणुका तात्पुरत्या स्वरुपाच्या असून कायमस्वरुपी नियुक्ती देता येणार नाही व त्यासाठी हे शिक्षक तयार असल्याचे लिहून घेतलेले आहे. तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार विहित पध्दतीप्रमाणे सेवेत न आल्यामुळे त्यांची सेवा कायम करता येणार नाही म्हणून या शिक्षकांना कायमस्वरुपी कामावर घेता येत नाही.

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी उत्तर मी ऐकलेले आहे. या शिक्षकांची अवस्था आमदार निवासातील कक्ष सेवकांच्या स्थितीपेक्षाही वाईट आहे. म्हणून या बाबीचा शासन काहीच विचार करणार नाही काय ? येथे खरे म्हणजे माननीय मंत्री महोदयांकडून स्टॅम्प पेपरवर लिहून घेण्याची परिस्थिती निर्माण झालेली आहे की, या शिक्षकांना तूम्ही काय न्याय देणार आहात ? आपण एकही मागणी मान्य केलेली नाही. म्हणून आमची अशी मागणी आहे की, या शिक्षकांना निदान शिक्षण सेवक म्हणून तरी तातडीने नेमणूक देणार काय ?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, हया नेमणुका केवळ तासिका पध्दतीने करण्यात आलेल्या आहेत. तसेच उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आम्हाला त्यांना कायमस्वरुपी नेमणूक देता येणार नाही. या ठिकाणी शिक्षकांच्या भरतीसाठी जाहिरात दिलेली होती व त्या अनुषंगाने लेखी परीक्षा झालेल्या आहेत व आता मुलाखती घेण्यासाठी उमेदवारांना बोलाविण्यात येणार असून अंतिम टप्प्यात कायम स्वरुपी नेमणुका असल्यामुळे तसेच नियमाप्रमाणे या शिक्षकांना रेग्युलर करता येणार नाही.

श्रीमती संजीवनी रायकर : महोदय, 7-7, 8-8 वर्षे या शिक्षकांना आपण तासिका बेसिसवर ठेवतात, त्यांच्याकडून स्टॅम्प पेपरवर लिहून घेतात, 20 रुपये त्यांना दररोज पगार देतात आणि या ठिकाणी मात्र ते सुध्दा 60 रुपये सांगण्यात येतात. येथेच जर असे दुमत आहे तर मग या शिक्षकांच्या नेमणुका नेमक्या कशा प्रकारे करण्यात आलेल्या आहेत ? यांच्या जागेवर सरळ सेवा भरतीद्वारे दुसरे शिक्षक आपल्याला मिळाले नाहीत काय ? एकीकडे एस.टी. चे उमेदवार मिळत नाहीत आणि इकडे मात्र जे आहेत त्यांच्याकडून स्टॅम्प पेपरवर लिहून त्यांची पिळवणूक केली जाते, हे योग्य आहे काय ? म्हणून या शिक्षकांना कायमस्वरुप्ी नेमणुका देण्याबाबत शासनाचा काय विचार आहे ?

( .......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 13022..........

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, हया शिक्षकांच्या नेमणुका केवळ तासिका बेसिसवर आणि तात्पुरत्या भरलेल्या असल्याने तसेच सर्वोच्च न्यायालयाचाही याबाबतीत निकाल आलेला असल्यामुळे व शासनाचे त्या अनुषंगाने आदेश आहेत म्हणून या शिक्षकांना आम्ही कायमस्वरुपी नेमणुका देऊ शकणार नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, तासिका पध्दतीने हया नेमणुका झालेल्य आहेत. असे असेल तर सात-सात, आठ-आठ वर्षे त्या शिक्षकांनी काम केलेलेच आहे, ते बसून नव्हते. जर आपल्या आश्रमशाळांमध्ये जागा उपलब्ध होत्या तर या तासिका पध्दतीने घेण्यात आलेल्या शिक्षकांना अशा प्रकारे वेठबिगारासारखे ठेवण्याऐवजी या शिक्षकांबद्दल सहानुभूतीने विचार करुन शासन कायमस्वरुपी नेमणूक करुन घेणार काय ?

डॉ. विजयकुमार गावित : महोदय, मी यापूर्वीच सांगितले की, सर्वोच्च न्यायालयाच्या निदेशाप्रमाणे आणि शासनाच्या विहित पध्दतीने भरती करण्याचे आदेश आहेत. तसेच मधल्या कालावधी आम्ही सन 2001 मध्ये विभागाचा रिक्त पदांचा आढावा सुरु केला व त्यातून काही पदे कमी करावयाची होती परंतु त्याला विलंब झाला. त्यानंतर ही शिक्षकांची पदे भरण्यासाठी 29 जानेवारी, 2006 रोजी जाहिरात दिली होती, उमेदवारांच्या लेखी परीक्षा होऊन त्याचे निकाल लागलेले आहेत व आता मुलाखतीसाठी बोलावून अंतिम यादी तयार करण्यात येईल. यामध्ये जर या शिक्षकांमधील उमेदवारांनी अर्ज केलेले असतील तर त्यांचाही विचार करता येईल.

यानंतर श्री. भारवि .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13022...

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, दिनांक 26 ऑगस्ट 2002 चा आदेश माझ्याकडे आहे. यात नमूद करण्यात आले आहे की, उपरोक्त शासन निर्णयाच्या अधीन राहून अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक विभाग,नाशिक हे प्राप्त अधिकारात प्रकल्प अधिकारी, तळोदा यांच्या अधिनस्त झालेल्या खालील शासकीय आश्रमशाळांतील रिक्त पदांवर नियमति शिक्षक नेमणूक होईपर्यंत 60 रुपये प्रतिदिन तीन महिने कालावधीसाठी खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून नियुक्ती देण्यात येत आहे. तीन महिन्यानंतर जागा भरण्यात येईल असे नमूद करण्यात आल्यानंतर आजतागायत जागा भरण्यात आलेला नाहीत. तेव्हा या शिक्षकांना सेवेत सामावून घेण्याबाबत शासन सहानुभूतीपूर्वक विचार करणार आहे काय ?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, आदेशात स्पष्टपणे म्हटले आहे की, नियमित पदे भरेपर्यंत शिक्षकांना तासिका पध्दतीवर तात्पुरत्या स्वरूपात घेण्यात येईल. त्याप्रमाणे या शिक्षकांना तासिका पध्दतीने तात्पुरती नेमणूक दिलेली आहे. आता या पदांसंबंधी जाहिरात देण्यात आली आहे. यातील ज्या शिक्षकांनी अर्ज केले असतील त्यांचा शासन सहानुभूतीपूर्वक जरूर विचार करील.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, या शिक्षकांना संरक्षण मिळणे आवश्यक आहे. शासनाच्या नियमात बसत नसेल तर या शिक्षकांना सेवेत सामावून घेण्यासाठी शासनाने सहानुभूतीपूर्वक विचार करणे आवश्यक आहे. याचे कारण असे की, 70 शिक्षकांपैकी 52 शिक्षक हे भिल्ल समाजाचे आहेत. हे सर्व शिक्षक एम.एस्सी.एम.एड., बी.एस्सी., बी.एड. आहेत. तेव्हा शासन या अर्हताधारक असलेल्या शिक्षकांना सेवेत सामावून घेणार आहे काय ?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, मी सांगितले आहे की, हे शिक्षक परीक्षेला बसलेले आहेत. त्यांनी परीक्षा दिलेली आहे. तेव्हा त्यांचा पुढच्या वेळी निश्चितपणे सहानुभूतीपूर्वक विचार केला जाईल.

(दोन्ही बाजूकडील काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13022...

श्री.धोंडिराम राठोड : सभापती महोदय, मी मंत्रिमहोदयांना असे विचारू इच्छितो की, गेली 7 वर्षे काम करणाऱ्या आदिवासी शिक्षकांना सामावून घेण्यामध्ये अडचण काय आहे ? एकीकडे अनूसचित जाती आणि अनुसूचित जमातीचा अनुशेष भरण्याचे धोरण शासन राबविते, तर दुसरीकडे अनुसूचित जमातीचे अर्हताधारक शिक्षक उपलब्ध असतानासुध्दा त्यांना सेवेत सामावून घेतले जात नाही. हा त्यांच्यावर अन्याय आहे. तेव्हा 7 वर्ष काम करणाऱ्या शिक्षकांना सेवेत सामावून घेण्यामध्ये काय अडचण आहे ? खरे तर या शिक्षकांना सेवेत सामावून घेतले पाहिजे.

(घोषणा)

**सभापती** : मंत्रिमहोदय सभागृहाच्या भावना आापण लक्षात घ्याव्यात. अनुसूचित जमातीतील भिल्ल या जमातीतील 52 अर्हताधारक शिक्षक हे 6-7 वर्षापासून तासिका पध्दतीने काम करीत आहेत. तेव्हा या शिक्षकांना पुन्हा प्राधान्याने सेवेत सामावून घेण्याच्या दृष्टीने शासन काही निर्णय घेणार आहे काय ?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, नोकर भरतीसंबंधीचे नियम ठरविण्यात आलेले आहे. तेव्हा जे नियमात बसतील त्यांचा नियमाप्रमाणे सहानुभूतीपूर्वक विचार केला जाईल.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य घोषणा देत सभात्याग करतात.)

यानंतर श्री.बोर्डे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.भारवि.... 14:40

ता.प्र.क्र.16305

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )

-----

**आश्रमशाळांसाठी सुधारीत आश्रमशाळासंहिता लागू करणेबाबत**

**(५) * १३१०५ प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , श्री. वसंतराव खोटरे , श्री. नानासाहेब बोरस्ते , श्री. जी. एल. अैनापूरे : तारांकित प्रश्न क्रमांक ९३८४ ला दिनांक ९ डिसेंबर, २००५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय/अनुदानित आश्रमशाळेसाठी लागू करण्यात येणाऱ्या सुधारीत आश्रमशाळासंहिता मसुद्याचे परिक्षणाचे काम पूर्ण केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुधारीत आश्रमशाळा संहिता शासकीय व अनुदानित आश्रमशाळेस लागू करण्यात आली आहे काय,

(३) नसल्यास, आश्रमशाळा संहिता शासकीय अनुदानित आश्रमशाळांसाठी केव्हापासून लागू करण्यात येणार आहेत ?

**श्री.रविशेठ पाटील, डॉ.विजयकुमार गावित यांच्याकरिता** : (१) होय.

(२), (३) आश्रमशाळा संहितेच्या मसुद्याचे परिक्षणाचे काम पूर्ण झाले असून सदर मसुद्यास शासनाची मान्यता घेवून आश्रमशाळा संहिता लवकरच लागू करण्यात येईल.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, आश्रमशाळांसाठी सुधारित आश्रमशाळासंहिता नसल्यामुळे त्या ठिकाणी काम करणाऱ्या शिक्षकांना संरक्षण मिळत नाही. खरे म्हणजे अनेक विभागात आपापल्या सोयीप्रमाणे शालेय शिक्षण विभागाची संहिता लागू केली जाते. वास्तविक पाहता अनेक वर्षांपासून हा प्रश्न प्रलंबित आहे. परंतु तरीही या प्रश्नाला शासनाने "आश्रमशाळा संहितेच्या मसुद्याचे परिक्षणाचे काम पूर्ण झाले असून, सदर मसुद्यास शासनाची मान्यता घेऊन, आश्रमशाळा संहिता लवकरच लागू करण्यात येईल." असे उत्तर दिलेले आहे. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, आश्रमशाळा संहिता लागू करण्यासाठी शासन कालबध्द कार्यक्रम आखणार आहे काय ? तसेच ही संहिता प्रमुख संघटनांच्या प्रतिनिधींना विचारात घेऊन तयार करण्यात येईल काय ?

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13105....

श्री.रविशेठ पाटील : सभापती महोदय, संहितेचे काम अंतिम टप्प्यात आलेले आहे. येत्या शैक्षणिक वर्षापासून संहितेचे काम पूर्ण करण्यात येईल. मंत्रिमंडळाचा ठराव झाल्यानंतर संहितेची पुढील कार्यवाही ताबडतोब करण्यात येईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, वास्तविक पाहता ही अतिशय दुर्दैवाची बाब आहे. Government should act as a good manager. But, it appears to be worst manager. माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, सुधारित आश्रमशाळा संहिता शासकीय व अनुदानित आश्रमशाळांना लागू करण्यात आली आहे काय ? कारण आज सभागृहासमोर जे उत्तर आलेले आहे ते अनेक वर्षापासून देण्यात येत आहे. खरे म्हणजे या आश्रमशाळांमध्ये काम करणाऱ्यांना न्याय देण्यासाठी आदिवासी विभाग निर्माण करण्यात आला आहे. त्यामुळे येत्या जून-जुलैपूर्वी या संहितेबाबतची प्रक्रिया पूर्ण करुन, आश्रमशाळांसाठी सुधारित आश्रमशाळासंहिता लागू केली जाईल काय ? नसल्यास, त्याबाबत काय अडचणी आहेत ?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, आश्रमशाळांसाठी सुधारित आश्रमशाळासंहिता येत्या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्यात येईल.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मौजे ओवळा (जि. ठाणे) येथील मे. कॉसमॉस स्टोन क्वॉरी या कंपनीने केलेल्या बेकायदेशीर उत्खननाबाबत**

**(६) * १५५८४ श्री. लक्ष्मण जगताप , श्री. जितेंद्र आव्हाड : तारांकित प्रश्न क्रमांक ११७७४ ला दिनांक १४ डिसेंबर, २००५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे ओवळा (जि. ठाणे) येथील मे. कॉसमॉस स्टोन क्वॉरी या कंपनीने बेकायदेशीररित्या उत्खनन करुन शासनाचा कोटयावधी रुपयांचा महसूल बुडविल्याप्रकरणी संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.

(२) अद्याप कोणतीही कारवाई केली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) तसेच उक्त प्रकरणी करण्यात येत असलेली कार्यवाही लवकरात लवकर पूर्ण व्हावी यासाठी कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

**डॉ.राजेंद्र शिंगणे, श्री.नारायण राणे यांच्याकरिता** : (१), (२) व (३) मौजे ओवळा, जि.ठाणे येथील खाजगी मालकीच्या जमिनीमध्ये कॉसमॉस स्टोन क्वारी व ठाकूर स्टोन क्वारी यांना खनिपट्टे मंजूर करण्यात आले आहेत. या दोन खनिपट्टा धारकांमध्ये खनिपट्टयाच्या हद्दीवरुन वाद आहेत. वादग्रस्त जागेच्या पोटहिश्श्याच्या हद्दी निश्चित करण्यासंबंधीचे प्रकरण उपविभागीय अधिकारी, ठाणे यांचेकडे प्रगतीत आहे. मे.कॉसमॉस स्टोन क्वारी यांनी प्राथमिक नोटीशीअंती सादर केलेल्या खुलाशावरुन त्यांनी उत्खनन/विक्री केलेल्या गौण खनिजाचे स्वामित्वधन शासनास अदा केले असल्याचे दिसून आले आहे. तथापि पोटहिश्श्याच्या हद्दी निश्चित झाल्यानंतर अनधिकृतरित्या उत्खनन झाले असल्याचे निष्पन्न झाल्यास संबंधितांविरुध्द दंडनीय कारवाई करता येईल.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, खरे म्हणजे या प्रश्नाचे उत्तरच थोडेसे चुकीचे आणि गडबड निर्माण करणारे देण्यात आलेले आहे. मे.कॉसमॉस स्टोन क्वॉरी या कंपनीने बेकायदेशीररित्या उत्खनन केलेले आहे. माझी माहिती अशी आहे की, या कंपनीने 16 कोटी रुपयांचा महसूल बुडविल्यामुळे कंपनीला जिल्हाधिकाऱ्यांच्या वतीने नोटीस देण्यात आली आहे. या कंपन्यांतील भाडेपट्टयाच्या आणि हिश्श्याचा जो वाद आहे त्याबाबत मला काही म्हणावयाचे नाही. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, जर या कंपनीने 16 कोटी रुपयांचा महसूल बुडविला असेल तर त्याची वसुली त्वरित करणार आहात काय ?

..4..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.भारवि.... 14:40

ता.प्र.क्र.15584....

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, मे.कॉसमॉस स्टोन क्वॉरी कंपनीने बेकायदा उत्खनन करुन, महसूल बुडविल्याची तक्रार सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी केली होती. मे.कॉसमॉस स्टोन क्वॉरी कंपनीने स्वत:च्या जागेमध्ये उत्खननासाठी परवानगी मागितली होती. ठाकूर स्टोन क्वॉरी यांना सुध्दा परवानगी दिली होती. परंतु या संदर्भात जेव्हा शासनाकडे तक्रार आली, त्याबाबत तपासणी केली गेली. प्रथमदर्शनी त्यामध्ये तथ्य आढळले. त्यामुळे मे.कॉसमॉस स्टोन क्वॉरी कंपनीला नोटीस दिलेली आहे.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSK/ SBT/ MHM यापूर्वी श्री. बोर्डे .. 14.45

**ता.प्र.क्र. 15584 ....**

डॉ. राजेंद्र शिंगणे ....

सभापती महोदय, या प्रकरणामध्ये जर तथ्य आढळले तर नक्की रिकव्हरीची कारवाई केली जाईल.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, आतापर्यंत संबंधितांना नोटीसेस देऊन एक वर्षे झाले आहे. सभापती महोदय, या प्रकरणात 16 कोटी रुपयांचा महसूल आहे. शेतकऱ्यांनी महसूलाचा भरणा केल्यानंतरही त्यांना महसूल भरण्यासंदर्भात नोटीसेस पाठविल्या जातात. सभापती महोदय, तरी आपण येत्या 15 दिवसांत हा महसूल संबंधितांकडून वसूल करावा. पोट हिश्श्याचे जे वाद आहेत, ते असू द्या. तरी, या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांना माझा असा प्रश्न आहे की, या प्रकरणांतील महसूलाचे 16 कोटी रुपये आपण कधी वसूल करणार आहात ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, मी आपल्याला सांगू इच्छितो की, 16 कोटी रुपयांसंदर्भात नोटीस दिलेली नाही. बेकायदेशीररित्या झालेल्या उत्खननासंदर्भात कारवाई सुरु आहे. 64780 ब्रासचे उत्खनन झाल्याचे उघडकीस आलेले आहे. या प्रकरणाबाबत चौकशी सुरु आहे. तरी, या संदर्भातील अंतिम अहवाल आल्यानंतर या प्रकरणी 15 दिवसांत कार्यवाही केली जाईल.

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, ओवळा व नागला येथे बऱ्याच ठिकाणी विनापरवानगी दगड खाणी सुरु आहेत. परंतु संबंधित कंपन्या रॉयल्टी देत नाहीत. संबंधितांनी शासनाचे या संदर्भातील सर्व नियम धाब्यावर बसविले आहेत. सभापती महोदय, हा प्रश्न बऱ्याच वेळा सदनामध्येही उपस्थित झालेला आहे. ओवळा व नागला येथील घरांना तडे गेलेले आहेत, शाळांच्या भिंतींना तडे गेलेले आहेत. तरी, माझा माननीय मंत्रीमहोदयांना प्रश्न आहे की, शासनाची परवानगी न घेता सुरु असलेल्या या दगड खाणींसंदर्भात आपण कारवाई करणार आहात का ? सभापती महोदय, या ठिकाणी होत असलेल्या भू-सुरुंगांबाबतही शासनाच्या नियमांचे पालन होत नाही. तरी, अशा प्रकारच्या दगड खाणींवर कारवाई होणार का ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, बेकायदेशीररित्या व परवागी न घेता उत्खनन झाले असल्याबाबत जर आपल्याकडे माहिती असेल तर ती शासनाला द्यावी. या संदर्भात आम्ही यापूर्वीच जिल्हाधिकाऱ्यांना सूचना दिलेल्या आहेत. या बाबतीतील प्रश्न मागील आठवड्यामध्ये देखील

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>ता.प्र.क्र. 15584 ....</u>**

डॉ. राजेंद्र शिंगणे ....

सभागृहात आला होता. यासंबंधी माननीय उपसभापतींनी देखील निदेश दिलेले आहेत. तरी, बेकायदेशीर उत्खनन झाले असेल तर, या संदर्भातील अहवाल प्राप्त करुन 15 दिवसांत आत पटलावर ठेवला जाईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मे. कॉसमॉस स्टोन क्वॉरी ही कंपनी रॉयल्टी भरते का ? आणि त्या कंपनीने आतापर्यंत किती रॉयल्टी भरलेली आहे ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, या कंपनीने आतापर्यंत नियमाप्रमाणे रुपये 29,79,384/- एवढी रॉयल्टी भरलेली आहे.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, माझा माननीय मंत्रीमहोदयांना असा प्रश्न आहे की, मे. कॉसमॉस स्टोन क्वारी व ठाकूर स्टोन क्वारी या कंपन्यांनी किती उत्खनन केले ? त्या उत्खननासंदर्भात महसूल अधिकाऱ्यांनी किती महसूल डिमांड केला व संबंधित कंपन्यांनी या संदर्भात किती रॉयल्टी भरलेली आहे ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, त्या कंपन्यांना जेवढ्या उत्खननाची परवानगी दिली होती, तेवढ्या उत्खननाची रॉयल्टी त्यांनी संपूर्णपणे भरलेली आहे. रॉयल्टी बुडविण्याच्या प्रश्नासंदर्भात असलेल्या तक्रारीबाबत जिल्हाधिकाऱ्यांना 15 दिवसांच्या आत कारवाई करण्यासंदर्भात सांगितले आहे.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मे. कॉसमॉस स्टोन क्वारी व ठाकूर स्टोन क्वारी यांच्यामध्ये असलेले पोट हिश्श्यांच्या हद्दीसंदर्भातील वाद किती दिवसांपासून सुरु आहे ? व तो वाद संपुष्टात आणण्यासाठी व महसूल मिळण्यासाठी किती काळ लागणार आहे ? सभापती महोदय, ही अतिशय साधीसोपी बाब असताना आपण या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना सूचना दिलेल्या आहेत. तरी, सभापती महोदय, हा वाद कधी संपुष्टात येणार आहे ?

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.15584...

प्रा. जोगेंद्र कवाडे :

यामध्ये सरकारचा मोठया प्रमाणात महसूल बुडत आहे. कॉसमॉस स्टोन क्वारी व ठाकूर स्टोन क्वारी या दोन खनिपट्टाधारकांमध्ये हद्दीवरुन वाद आहे. हा वाद संपुष्टात आणून शासनाचा महसूल वाढविण्याकडे शासन ताबडतोबीने लक्ष देणार आहे काय ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, कॉसमॉस स्टोन क्वारी व ठाकूर स्टोन क्वारी या दोन्ही खनिपट्टेधारकांची जमीन शेजारी-शेजारी असल्यामुळे जमिनीच्या हद्दीवरुन त्यांचा वाद आहे. पोट हिश्श्यांच्या मोजणीच्या संदर्भातील नोटीस संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेली आहे. यासंदर्भात दोन तारखा झालेल्या आहेत अंतिम तारीख 10.4.2006 अशी आहे. दिनांक 10.4.2006 रोजी यासंदर्भात अंतिम निर्णय घेतला जाईल.

----------------

......2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**शारदा बहुउद्देशिय विकास मंडळ नागपूर या संस्थेतील अनियमितेची चौकशी**

**(७) * १३३९२ श्री. नानासाहेब बोरस्ते , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. वसंतराव खोटरे : तारांकित प्रश्न क्रमांक १११०६ ला दिनांक ९ डिसेंबर, २००५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शारदा बहुउद्देशिय महिला विकास मंडळ, नागपूर या संस्थेमध्ये विहित पध्दतीने नेमणूका न करणे, कर्मचारी वेळोवळी बदलणे, नेमणूकीचे पूरावे न ठेवणे, अपात्र कर्मचारी नेमणे, चौकशीस पुरेसे सहकार्य न करणे, महिला कर्मचाऱ्यांना मानसिक त्रास देणे इ. अनियमितता बाबत आयुक्त अपंग कल्याण पुणे यांनी दिलेल्या कारणे दाखवा नोटीसच्या पत्राचा खुलासा संस्थेकडून प्राप्त झाला आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम,श्री.चंद्रकांत हंडोरे यांच्याकरिता**: (१) होय.

(२) व (३) संस्थेवर प्रशासक नेमण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांचेकडून नुकताच शासनास प्राप्त झाला असून, त्यावर कार्यवाही करण्यात येत आहे.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, हिवाळी अधिवेशनामध्ये हाच प्रश्न मी 93 च्या सूचनेअन्वये या संस्थेने केलेल्या भ्रष्टाचाराच्या संदर्भात उपस्थित केला होता. आता सन्माननीय मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, संस्थेवर प्रशासक नेमण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्त, अपंग कल्याण पुणे यांचेकडून नुकताच शासनाकडे प्राप्त झालेला आहे. आयुक्तांकडून अहवाल प्राप्त झालेला असतांना अधिवेशन संपण्याच्या आता सदर संस्थेवर प्रशासक नेमण्यात येणार आहे काय ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : अधिवेशन संपण्याच्या आत सदर संस्थेवर प्रशासक नेमण्यात येईल.

--------------

.....3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

VVK/ SBT/ MHM/ प्रथम श्री. कांबळे... 14:50

**वडाळा मुंबई येथील गांधीनगर मधील रिमोल्डिंगच्या दुकानात स्फोट होवून दोन कामगारांचा झालेला मृत्यू**

**(८) * १७०३८ श्री. अरविंद सावंत , श्री. विलास अवचट , डॉ. दिपक सावंत , डॉ. निलम गोऱ्हे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडाळा मुंबई गांधीनगर येथील रिमोल्डिंगच्या दुकानात दिनांक २१ फेब्रुवारी, २००६ च्या सुमारास बॉयलरचा स्फोट होऊन काही कामगार जखमी झाले हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर कारखान्यातील स्फोटात दोन कामगार ९० टक्के भाजल्याने त्यांना केईएम रुग्णालयात दाखल केले असतांना उपचारा दरम्यान त्यांचा मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार मृतकांच्या नातेवाईकांना शासनाने कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीच मदत केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**बाबा सिदिकी, श्री. गणेश नाईक यांच्याकरिता**: (१) बॉयलरचा स्फोट झालेला नसून आग लागून २ कामगार गंभीररित्या भाजले, ह खरे आहे.

(२) होय.

(३) होय.

(४) अपघाताच्या वेळेस दोन कामगार काम करीत असताना खिडकीच्या एक्झॉस्ट पंख्यामध्ये स्पार्कींग झाल्याने आग लागली. कोटींग रुममधील रबर, बॉंडींग गम इ. ज्वनशील पदार्थाने सदर आग रुममध्ये पसरली. त्यामुळे दोन्ही कामगार गंभीररित्या भाजले. व औषधोपचार सुरु असताना मृत्यू पावले.

मृतकांच्या वारसास आर्थिक नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी कामगार नुकसान भरपाई कायदा १९२३ अन्वये मालकावर असल्याने, मालकाने नुकसान भरपाईची रक्कम द्यावी याकरिता कामगार नुकसान भरपाई आयुक्त यांना कळविण्यात आले आहे.

(५) नुकसान भरपाई आयुक्त यानी या प्रकरणी अंतिम निर्णय घ्यावयाचा आहे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, वडाळा मुंबई येथील गांधीनगर टायर रिमोल्डिंगच्या दुकानात स्फोट झालेला नसून आग लागलेली आहे असे उत्तरात म्हटलेले आहे. या कारखान्यात आग लागून 2 कर्मचाऱ्यांच्या मृत्यू झालेला आहे, असे चौकशीत म्हटलेले आहे. माझा प्रश्न असा आहे की, जेव्हा चौकशी करण्यात आली तेव्हा तेथे काही बेकायदेशीर बाबी आढळून आलेल्या आहेत काय ? त्या ठिकाणी बॉयलर होता काय ? आणखी काही ज्वलनशील पदार्थ आढळून आलेले आहेत काय ? संबंधित मालकाने नुकसान भरपाई द्यावी यासंदर्भात आयुक्तांकडून तातडीने कार्यवाही करण्यात येत आहे काय ?

.....4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प.क्र.17038...

श्री. बाबा सिद्दिकी : सभापति महोदय, 5 क्रिमिनल केस दाखिल किए गए हैं. वे इस प्रकार हैं,

1. Running factory without licence - Rule 4(4)

2. Not examining tread bonder vessel after installing but before using in the premises - Rule 65(6)(iii)(b)

3. Not providing section existing to coating room - Rule 70(9)(d)

4. Not providing fire fighting equipment - Rule 71(b)(1)

5. Not reporting dangerous occurence within 4 hours of its happening-Rule 115(1)"

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, मी नुकसान भरपाईच्या संदर्भात प्रश्न विचारला होता. त्याचे उत्तर मिळाले नाही.

श्री. बाबा सिद्दिकी :वर्कमेन काम्पेनसेशन एक्ट के तहत नुकसान भरपाई आयुक्त क्वासी ज्युडिशियल अथॉरिटी है. अभी यह मामला सबज्युडिश है.

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी उत्तरात सांगितले की यासंदर्भात कार्यवाही करण्यात येत आहे. 21 फेब्रुवारी, 2006 रोजी दोन कामगारांचा मृत्यू झालेला आहे. परंतू अजूनपर्यंतही त्यांच्या वारसांना नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही. माझा प्रश्न असा आहे की, या कार्यवाहीस विलंब का लागत आहे. नुकसान भरपाई देण्याचा निर्णय जरी आयुक्तांमार्फत घ्यावयाच असला तरी यामध्ये आपल्या खात्याची जबाबदारी नाही काय ? संबंधितांना लवकरात लवकर नुकसान भरपाई देण्यात येईल काय ?

श्री. बाबा सिद्दिकी : सभापति महोदय, मैं इसका उत्तर दे चुका हूं. मैंने यह बताया है कि वर्कमेन काम्पेनसेशन एक्ट के तहत नुकसान भरपाई आयुक्त क्वासी ज्युडिशियल अथॉरिटी है और यह मामला सबज्युडिश है.

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. सुंबरे...

KBS/MHM/SBT. ता.प्र.क्र. 17038 ..... 14.55

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तरामध्ये सांगितले की, वर्कमेन्स कॉम्पेन्सेशन ॲक्ट नुसार कारवाई होत आहे. तर हा ॲक्ट कोणत्या सालातील आहे? हा ॲक्ट 1923 सालचा आहे किंवा काय हे वाटल्यास त्यांनी तपासून सांगावे. दुसरे म्हणजे वर्कमेन्स कॉम्पेंसेशन ॲक्टखाली कामगार नुकसान भरपाई आयुक्तांकडे आपण केव्हा सादर केली आहे आणि त्याची प्रगती आतापर्यंत काय झाली आहे ? तसेच यामध्ये दोन कामगार मृत्यूमुखी पडलेले आहेत, त्यांची कौटुंबिक परिस्थिती कशी आहे आणि त्यांना नुकसान भरपाई मिळावी यासाठी आपला कोणता अधिकारी म्हणजे कोणत्या स्टेटस्‌चा अधिकारी लक्ष घालत आहे ?

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, यह वर्कमेन काम्पेनसेशन एक्ट वर्ष 1923 का है. इस मामले में लेबर कोर्ट का जज कमिश्नर है. 27.03 2006 को केसेस दाखिल किए गए हैं.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मघापासून सातत्याने येथे प्रश्न विचारला जातो आहे की, या दुकानामध्ये जी अनियमितता आढळली आहे त्याबद्दल आपण त्या दुकानदारावर काय कारवाई केलेली आहे ? त्याच्यावर आपण 5 कलमांखाली गुन्हे दाखल केले आहेत हे सांगितले पण त्याचेवर कारवाई कोणती केली आहे ? तसेच सध्या तेथे हे दुकान चालू आहे काय ? आणि क्वासी ज्युडिशिअल ॲथॉरिटीकडे हे प्रकरण आहे तर मग त्याचा निकाल केव्हापर्यंत अपेक्षित आहे? आणि या कामगारांना न्याय मिळाला नाही तर शासन यामध्ये हस्तक्षेप करील काय ?

श्री. बाबा सिद्दीकी : मैंने पहले ही कहा है कि यह मामला सबज्युडिश है. लेबर कोर्ट के जज कमिश्नर है. शासन इस मामले में हस्तक्षेप नहीं कर सकता है, क्योंकि वर्कमेन एक्ट के अनुसार कमिश्नर जज है और इस मामले में उन्हें अंतिम निर्णय लेना है.

**सभापती** : माननीय राज्यमंत्री महोदयांनी हे समजून घ्यावे की, matter will be examined by the Competent Authority असे आपण सांगितले असले तरी या प्रकरणी त्या ठिकाणी जे पाच वेगवेगळ्या कलमाखाली गुन्हे घडल्याचे आढळून आले आहे असे आपण सांगितले आहेच तेव्हा ह्युमॅनिटेरीयन ग्राऊंडवर त्या कामगारांना न्याय मिळावा यासाठी आपल्या कामगार विभागाकडून काय करण्यात येणार आहे असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारलेला आहे तेव्हा आपण त्या दृष्टीने काही करू शकाल काय ? याबाबत आपण उत्तर द्यावे.

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, ऐसी प्रथा नहीं है. फिर भी शासन सहानुभूति से विचार करेगा.

....... ..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उल्हासनगर जि. ठाणे येथील गुरुनानक हायस्कूल मधील अनागोंदी कारभाराची चौकशी**

**(9) * 13479 श्री. गोविंदराव आदिक, श्री. संजय दत्त, श्री. धनाजी साठे, श्री.रमेश निकोसे : तारांकित प्रश्न क्रमांक 10254 ला दिनांक 16 डिसेंबर, 2005 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) गुरुनानक हायस्कुल उल्हासनगर (जि. ठाणे) या शाळेत चाललेल्या अनागोंदी कारभाराची शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद ठाणे यांचे मार्फत होत असलेली चौकशी पूर्ण झाली आहे काय,
(2) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांवर पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(3) अद्याप चौकशी पूर्ण झाली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.वसंत पुरके** : (1) होय.
(2) व (3) चौकशीअंती पुढील बाबी निदर्शनास आल्या:-
अ) श्रीमती प्रसन्ना नायक, सहाय्यक शिक्षिका यांच्या वैयक्तिक नस्तीमध्ये बी.एड. गुणपत्रिका आढळून आली नाही.
ब) श्रीमती उमादेवी नायर, सहायक शिक्षिका या बी.एस.सी. (होम सायन्स) असून त्यांना त्यांच्या शैक्षणिक व व्यावसायिक पात्रतेनुसार अध्यापनाचे विषय न सोपविता त्यांना इयत्ता 9 वी व 10 वी वर्गासाठी इंग्रजी विषयाचे अध्यापन देण्यात आले आहे.
क) विद्यार्थ्यांकडून घेण्यात येणारी शिक्षण फी व सत्र फी शासनाच्या प्रचलित मार्गदर्शन सूचनांप्रमाणे आकारल्या जात नाही.

वरील बाबींची पूर्तता करण्यात येत असल्याचे कळविण्यात आले आहे.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, श्रीमती उमादेवी नायर आणि श्रीमती प्रसन्ना नायक यांच्याप्रमाणे या संस्थेमध्ये डीएड वा बी.एड. या अध्यापनातील शैक्षणिक पात्रता नसलेल्या आणखी किती शिक्षक, शिक्षिका काम करीत आहेत ? तसेच गुरू नानक हायस्कूल,उल्हासनगर या संस्थेमार्फत शिक्षण फी आणि सत्र फी शासनाच्या सूचनेप्रमाणे आकारली जात नाही असे उत्तरात म्हटले आहे तर त्याबद्दल या संस्थेवर शासनाने कोणती कारवाई केलेली आहे ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, या शाळेमध्ये सुरूवातीस श्रीमती नायर, श्रीमती नायक आणि आणखी दोन शिक्षिका प्रशिक्षित नव्हत्या. परंतु श्रीमती नायर आणि श्रीमती प्रसन्ना नायक या दोन्ही शिक्षिकांनी डीएड पदवी धारण केलेली आहे आणि आज तेथे कोणीही अप्रशिक्षित

...... एल 3 ..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. पुरके (पुढे चालू...) ता.प्र.क्र. 13479 ...

नाही. तसेच तेथे आता शासनाच्या सुचनेप्रमाणे फी आकारली जाते आहे. तेथे प्रचंड फी आकारली जाऊ नये म्हणून शासनाने दिलेल्या सुचनेप्रमाणे 290 रूपये फी घेतली जाते आहे.

श्री. रमेश निकोसे : सभापती होदय, या संस्थेने आतापर्यंत अवैधरित्या किती फी वसूल केलेली आहे ?

प्रा. वसंत पुरके : अजून त्याबाबत तक्रार आलेली नाही.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, विना अनुदानित खाजगी शिक्षण संस्था चालकांनी विद्यार्थ्यांकडून किती फी घ्यावी याबद्दल शासनाने त्यांना काही निर्देश दिलेले आहेत काय ? असल्यास, ते काय आहेत ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, 290 रूपये फी ही तपासूनच आकारलेली आहे. तेव्हा तेथील विद्यार्थ्यांचे शोषण होऊ नये याचा दखल शासनाने घेतली आहे.

( यानंतर श्री. सरफरे ..... एम 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 13479...

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, गुरुनानक हायस्कूलला शासनाकडून काही अनुदान मिळते काय? दुसरा प्रश्न असा की, ज्यांनी या शाळेविरुध्द तक्रार केली त्यांची सुध्दा इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु आहे हे खरे आहे काय?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, शाळा सुरु आहे की नाही याची माहिती घेतो. तसेच, या दोन संस्थांमध्ये वाद आहे की नाही माहीत नाही. परंतु जर वाद असेल तर तो मिटविण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

**सभापती** : प्रश्नोत्तरांचा तास संपलेला आहे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## औचित्याच्या मुद्दयासंबंधी

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. मघाशी प्रश्नोत्तराच्या तासामध्ये आदिवासीसंबंधीचा प्रश्न चर्चेला आला होता. त्यावेळी जो उल्लेख करण्यात आला आहे त्यामध्ये सुधारणा व्हावी यासाठी मी हा औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे. उत्तर देतांना मंत्रिमहोदय म्हणाले हेते की, ज्यांनी परीक्षा दिली असेल आणि ते परीक्षेमध्ये उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करण्यात येईल. सभापती महोदय, या सभागृहामध्ये अशाप्रकारचे उत्तर दिल्यामुळे भिल्ल समाजावर अन्याय केल्यासारखे होत आहे. कारण इतर लोकांनी परीक्षा दिली असेल त्यांच्या मनामध्ये अशी शंका निर्माण होईल की, या 52 लोकांना वशिला लावून पुढे ढकलण्यात आले आहे. त्यांच्या मेरीटविषयी शंका निर्माण होईल. तसेच, विधीमंडळाच्या एकूण कामकाजाविषयी शंका निर्माण होईल. तेव्हा आपण हे उत्तर तपासून शक्य असल्यास ते कामकाजातून काढून टाकण्यात यावे अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : यासंबंधी इतिवृत्त तपासून निर्णय घेण्यात येईल.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, दिनांक 23 मार्च 2006 रोजी खालच्या सभागृहामध्ये माननीय पणन मंत्र्यांनी जाहीर केले होते की, या वर्षी खरीप हंगाम थोडासा वाढल्यामुळे राज्यामध्ये 7 ते 8 हजार टन कांद्याचे उत्पादन झाले. प्रचंड प्रमाणामध्ये कांद्याचे उत्पादन झाल्यामुळे कांद्याचे भाव अतिशय खाली आले. त्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले. त्या दिवशी माननीय पणन मंत्र्यांनी सांगितले होते की, नाफेड आणि इतरांबरोबर चर्चा करुन कांद्यासंबंधी ताबडतोब धोरण जाहीर करण्यात येईल. परंतु दिनांक 24 मार्च रोजी शासनाने धोरण जाहीर केले नाही. यासंबंधी नियम 93 अन्वये सूचना दिली होती. आज दिनांक 3 एप्रिल आहे. देशाचे कृषी मंत्री माननीय श्री. शरद पवार यांच्या सभेमध्ये काल शेतकऱ्यांनी प्रचंड गोंधळ घातला. शेतकऱ्यांनी कांदे फेकून त्यांची सभा उधळली तरीसुध्दा या सरकारला कांद्यासंबंधी अजून जाग येत नाही. या राज्यामध्ये कांद्याचे धोरण जाहीर न करता कांदा उत्पादक शेतकऱ्यांवर हे शासन अन्याय करीत आहे. या राज्यातील कापूस उत्पादक, धान उत्पादक, कांदा उत्पादक शेतकऱ्यांवर या सरकारकडून अन्याय सुरु आहे...

**सभापती** : माननीय विरोधी पक्षनेत्यांनी औचित्याचा मुद्दा कसा होतो एवढे सांगावे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ही अतिशय गंभीर बाब आहे. शासनाने आजच्या आज कांद्याच्या भावासंबंधी शासनाचे धोरण जाहीर करावे म्हणून आपल्यामार्फत या औचित्याच्या मुद्दयाव्दारे शासनाला विनंती करीत आहे.

(अनेक माननीय सदस्य एकाच वेळी बोलू लागतात.)

**सभापती** : ज्या माननीय सदस्यांनी माझी परवानगी घेतली आहे त्यांना मी औचित्याचा मुद्दा मांडण्यास परवानगी देतो.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आपण यासंबंधी शासनाला निदेश द्यावेत अशी माझ ी आपणास विनंती आहे.

**सभापती** : मी निदेश देणार आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्ही आपले आभारी आहोत. अतिशय गरम विषय असल्यामुळे त्यासंबंधी आमच्या भावना व्यक्त करण्यासाठी आपण आम्हाला परवानगी द्यावी.

**सभापती** : एकदा आपल्याला औचित्याचा मुद्दा मांडण्याकरीता परवानगी दिली आहे. याचा अर्थ आपल्याला दररोज परवानगी मिळेल असे समजू नका.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ही गंभीर बाब आहे. मंत्रिमहोदयांकडून यासंबंधी निवेदन होईल यासाठी आम्ही कालपासून थांबलो आहोत. तेव्हा आज तरी शासनाने कांद्यासंबंधी धोरण जाहीर करावे...

**सभापती** : माननीय अर्थमंत्री सभागृहामध्ये उपस्थित आहेत. तेव्हा त्यांना मी निदेश देतो की, शेतकऱ्यांचा अत्यंत जिव्हाळयाचा प्रश्न असल्यामुळे शासनाचे यासंबंधीचे निश्चित धोरण काय आहे यासंबंधीचे निवेदन संध्याकाळपर्यंत करण्याचा प्रयत्न करावा.

श्री. जयंत पाटील (अर्थ मंत्री) : सभापती महोदय, खालच्या सभागृहामध्ये या विषयावर चर्चा झाली त्यावेळी माननीय पणन मंत्र्यांनी सांगितले की, वेगवेगळया जिल्हयामधील माहिती घेण्यात येत आहे. त्याचप्रमाणे रेल्वे वाघिणी मिळविणे, वाहतूक व्यवस्था निर्माण करणे इत्यादी सर्व गोष्टींचे पॅकेज करण्यासंदर्भात माननीय पणन मंत्री काम करीत आहेत. आणि याबाबत लवकरात लवकर सभागृहासमोर येऊ असे त्यांनी विधानसभा सभागृहामध्ये थोडया वेळापूर्वी सांगितले आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/ पूर्वी श्री.सरफरे... 15:05

**सभापती** : आज संध्याकाळपर्यन्त निवेदन करता आले नाही तर उद्यापर्यन्त करता येईल काय ?

...(अडथळा)...

श्री.पांडुरंग फुंडकर : केंद्रीय कृषी मंत्री माननीय श्री.शरद पवार यांच्या सभेमध्ये लोकांनी कांदे फेकून मारले, तरीही सरकार कांद्याच्या प्रश्नाबाबत काही दखल घेत नाही.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, पणन मंत्र्यांनी बरेचसे मान्य केलेले आहे. ते लवकरात लवकर या विषयीचे निवेदन करतील. थोड्या वेळापूर्वी विधानसभा सभागृहामध्ये त्यांनी तसे सांगितलेले आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा पॉईन्ट ऑफ ऑर्डर आहे. या सभागृहामध्ये कामकाज कसे चालावे, यासंबंधात काही संकेत, प्रथा, परंपरा आहेत. सभापती महोदय, आपण आपल्या अधिकारामध्ये मंत्री महोदयांना सूचना केली. त्याप्रमाणे मंत्री महोदयांनी आज संध्याकाळपर्यन्त निवेदन करतो, असे सांगायला पाहिजे होते. तसे न सांगता सन्माननीय वित्तमंत्री विधानसभा सभागृहात पणन मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांनी काय सांगितले, ते सांगत आहेत. विधानसभा सभागृहाचा आणि विधानपरिषद सभागृहाचा काही संबंध नाही. सन्माननीय मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांचे दुभाषी म्हणून ते काय बोलले ते मंत्री महोदय सांगत आहेत. त्यांचे हे वक्तव्य सभागृहाचा आणि आपला अपमान करणारे आहे, ते योग्य नाही. आपण केलेल्या आदेशाप्रमाणे पणन मंत्र्यांना तसे सांगतो, ते संध्याकाळपर्यन्त निवेदन करतील, असे मंत्रीमहोदयांनी म्हणायला पाहिजे होते. पण मंत्री महोदयांनी, पणन मंत्र्यांचे दुभाषी म्हणून काम करणे, बरोबर नाही. माझी विनंती आहे की, आज संध्याकाळपर्यन्त या विषयावरील निवेदन सरकारकडून झाले पाहिजे आणि सन्माननीय मंत्री जयंत पाटील यांनी दिलगिरी व्यक्त केली पाहिजे. तो आपला अपमान आहे. टेक इट ग्रॅन्टेड असे आपणास धरता येणार नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, काल नासिक येथे केंद्रीय कृषी मंत्र्यांच्या जाहीर सभेमध्ये जो काही प्रकार झाला ते वर्तमानपत्रामध्ये छापून आलेले आहे. त्यानंतर केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार साहेबांनी जाहीर केले की, आज राज्य सरकार या सबंधातील धोरण जाहीर करेल. सभापती महोदय, आपणही निर्देश दिलेले आहेत. केंद्रीय कृषी मंत्री महोदयांनी स्टेटमेंट केलेले असले तरी शासनाचे यासंबंधातील धोरण स्पष्ट करणे आवश्यक आहे, अशी आमची आग्रहाची विनंती आहे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. मी सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो की, कफ परेड येथे...

श्री.नितीन गडकरी : सन्माननीय सदस्यांचा वेगळा विषय आहे.

श्री.जयंत पाटील : मला एवढेच सांगावयाचे आहे की, विधानसभा सभागृहामध्ये एखाद्या विषयावर निवेदन झाले आणि विधानपरिषद सभागृहामध्ये ते निवेदन झाले नाही, तर आपण येथे आक्षेप घेत असतो. खालच्या सभागृहामध्ये काय झाले, ते मी ऐकले होते. ते येथे सांगितले. सन्माननीय पणन मंत्र्यांना सभागृहात येण्याविषयी मी सूचना केलेली आहे, ते आल्यानंतर याबाबत काय ते सांगतील, तोपर्यन्त पुढचे कामकाज घ्यावे अशी विनंती आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आपल्या आदेशाचे पालन होत नाही.

**सभापती** : सन्माननीय अर्थमंत्र्यांचा माझा अपमान करण्याचा हेतू नाही, त्यांची तशी भावना नाही, याची मला खात्री आहे.

श्री.नितीन गडकरी : हे आपले उदार अंत:करण आहे.

**सभापती** : सन्माननीय ज्येष्ठ मंत्री श्री.जयंत पाटील यांना मी एवढेच सांगू इच्छितो की, हा शेतकऱ्यांचा जिव्हाळ्याचा प्रश्न आहे, शेतकऱ्यांच्या प्रश्नाविषयी अत्यंत तीव्र भावना आहेत. तेव्हा याबाबतीत आज संध्याकाळपर्यन्त निवेदन करावे, अशी मी सूचना केलेली होती, ती संबंधित मंत्र्यांना सांगावी.

श्री.जयंत पाटील : ठीक आहे.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. आपल्या राज्यातील विद्यापीठांचे आणि शिक्षण विभागाचे डोके फिरले आहे की काय ? त्यांना वेड लागले आहे की काय ? हे समजण्यास मार्ग नाही. 11 वर्षे आपल्या राज्याचे मुख्यमंत्री राहिलेले कै. वसंतराव नाईक, जे हरित क्रांतीचे जनक म्हणून ओळखले जातात, ज्यांनी सिंचनासाठी या राज्यामध्ये वसंत बंधाऱ्यांची योजना आखली त्यांच्याबद्दल पुणे आणि नांदेड विद्यापीठाच्या राज्यशास्त्राच्या अभ्यासक्रमामध्ये "आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण" हे जे राज्यशास्त्राचे पुस्तक आहे त्या पुस्तकामध्ये लेखक श्री. शिरसीकर यांनी अत्यंत अपमानजनक शब्दांमध्ये असा उल्लेख केला आहे की, त्यांना रम रमा रमीचा शौक होता. चांगल्या वाईट गोष्टींचे त्यांना देणेघेणे नव्हते. नरिमन पॉइंटसारख्या भागाला श्रीमंत करण्यासाठी त्यांनी अनेक प्रकारच्या भांडवलदारांशी सल्लामसलत केली." अशा प्रकारे त्यांनी पुस्तकात लिहिलेले आहे. सभापती महोदय, अभ्यासक्रमामध्ये जर अशा प्रकारची वाक्ये असतील तर....

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे जे सांगत आहेत त्या विचारांशी मी सहमत आहे. माझी याबाबतीतील चीड अशी आहे की, या सदनामध्ये आपण मुद्दा मांडत असताना त्यांनी ज्या शब्दांनी अवमान केला तेच शब्द पुन्हा रेकॉर्डवर येत आहेत. आपण पुन्हा तेच या ठिकाणी बोलत आहात. ते शब्द रेकॉर्डवर येऊ नयेत असा माझा हरकतीचा मुद्द आहे.

**सभापती** : ते शब्द रेकॉर्डवर येणार नाहीत अशी व्यवस्था केली जाईल.

प्रा. जागेंद्र कवाडे : सभापती महोदय, 11 वर्षे राज्याच्या मुख्यमंत्रीपदी राहिलेल्या व्यक्तीबद्दल असे लिहिलेले आहे. पुणे आणि नांदेड विद्यापीठाच्या अभ्यासक्रमामध्ये "आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण" हे पुस्तक आहे. त्यामध्ये अशा प्रकारे राज्याच्या माजी मुख्यमंत्र्यांची बदनामी करणारी वक्तव्ये आहेत. त्या विद्यापीठामध्ये हे जे पुस्तक लावलेले आहे ते रद्द होणार काय ? दुसरे म्हणजे अशा प्रकारच्या पुस्तकाची शिफारस कोणी केली ? या दोन्ही विद्यापीठामध्ये ते पुस्तक कसे लागू केले ? याची चौकशी होणार काय ? आणि श्री. शिरसीकर नावाच्या लेखकावर कठोर कारवाई शिक्षण विभाग करणार काय ? असा माझा प्रश्न आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : माननीय शालेय शिक्षण मंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. त्यांना मी सांगू इच्छितो की, याबाबतीत संपूर्ण चौकशी करणे आवश्यक आहे. आपण माननीय उच्च शिक्षण मंत्री यांच्याकडे सभागृहाच्या या भावना कळवाव्यात तसेच या ठिकाणी उपस्थित झालेला औचित्याचा मुद्दा त्यांना सांगावा. याची सर्वंकष चौकशी होईल यादृष्टीने याबाबतीत तातडीने कार्यवाही होईल अशी व्यवस्था करावी.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, होय.

प्रा. जोगेंद्र कवाडे : याची चौकशी झाली पाहिजे....

**सभापती** : याबाबतीत पूर्ण चौकशी करावी. जे आक्षेपार्ह आहे ते त्यातून निघेल अशी व्यवस्था करावी. जर कोणी जाणूनबुजून हे केले असेल तर त्याबाबतीत जे करणे आवश्यक आहे ते कठोरपणे उच्च शिक्षण विभागाने करावे.

श्री. जितेंद्र आव्हाड : याबाबतीत कारवाई झाली पाहिजे.

( काही सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

**सभापती** : याबाबतीतील माझ्या ज्या सूचना आहेत किंवा जे निदेश आहेत ते मी उच्च शिक्षण विभागाला दिलेले आहेत. त्यांनी याबाबतीत कठोर चौकशी करावी आणि त्यांनी याकडे कठोरतेने पहावे. सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड म्हणतात त्या पध्दतीने याबाबतीत कारवाई करावी.

श्री. जितेंद्र आव्हाड : ते पुस्तक विथ्ड्रॉ करावे.

**सभापती** : ते पुस्तक विथ्ड्रॉ करणे आवश्यक असेल तर ते विथ्ड्रॉ करावे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. एका महत्वाच्या विषयाच्या संदर्भात मी या सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. मुंबई शहरामध्ये निरनिराळ्या ठिकाणी झ ोपडपट्टी पाडण्याचे काम सुरु आहे. आज कफपरेड येथे झोपडपट्टी पाडण्यासाठी मोठया प्रमाणावर पोलीस गेले होते. त्या ठिकाणी जमाव प्रक्षुब्ध झाला होता. झोपडपट्टीत राहणाऱ्या माणसांवर ए.सी.पी. श्री. बजाज यांनी लाठीहल्ला केला. त्या ठिकाणी लोकांना मारहाण झालेली

...3...

RDB/ KGS/ MAP

श्री. गुरुनाथ कुलकर्णी ......

आहे. 250 ते 300 झोपडीधारक आणि मच्छिमार आमच्या कार्यालयामध्ये बसून आहेत. माझी आपल्या माध्यमातून विनंती आहे. माननीय गृह राज्यमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. त्या ठिकाणी काय घटना घडलेली आहे याबाबत त्यांनी निवेदन करावे आणि या सदनाच्या भावना त्यांना कळवाव्यात.

**सभापती** : माननीय गृह राज्यमंत्र्यांनी याबाबतीत नोंद घेऊन लवकरात लवकर निवेदन करावे.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.बरवड 15:15

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, ज्या एका विषयाकडे समाजाकडून गांभीर्याने लक्ष दिले जात नाही आणि शासनाकडूनही दुर्दैवाने त्या गोष्टीची गांभीर्याने दखल घेतली जात नाही अशा गंभीर विषयाकडे मी औचित्याच्या मुद्याद्वारे लक्ष वेधित आहे. अश्लीलता विरोधी मंचाच्या काही पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी हा मुद्दा उपस्थित केला होता. मागील 4 दिवसापासून वेगवेगळया वाहिन्यांवरुन आणि वेगवेगळया वृत्तपत्रातून स्त्री-देहाच्या अश्लील प्रदर्शनाच्या काही घटना समोर आलेल्या आहेत. लॅक्मे फॅशन वीकमध्ये स्त्रीदेहाचे अश्लील प्रदर्शन करण्याच्या घटना घडलेल्या आहेत. दोन मॉडेल्सच्या बाबतीत संपूर्ण महाराष्ट्राचीच नाही तर भारताची लाज सा-या जगामध्ये जाईल अशा पध्दतीच्या घटना घडलेल्या आहेत. भा.दं.वि.सं.च्या कलम 292,292(अ),293, 294 नुसार स्त्रीदेहाचे प्रदर्शन करणे हा दंडनीय अपराध आहे. मुंबई हायकोर्टाने देखील 1986मध्ये अशा घटनांच्या संदर्भात निकाल दिलेले आहेत. पश्चिम बंगाल आणि मध्यप्रदेश या राज्यांमध्ये अश्लीलतेच्या विरोधात जी पावले उचललेली आहेत त्यांसंदर्भातील सूचना आणि विधेयके आमच्याकडे आहेत. एका बाजूला मुंबई शहर हे एक आंतरराष्ट्रीय शहर बनत असताना दुस-या बाजूला अश्लीलतेच्या घटना घडत आहेत ही अतिशय गंभीर बाब आहे. लॅक्मे फॅशन वीकच्या कार्यक्रमाचे जे संयोजक आहेत त्यांनी अश्लीलता विरोधी कायद्याचा भंग केलेला आहे, म्हणून अश्लीलतेची जबाबदारी ही संयोजकावर टाकून त्याबाबतीत त्यांची चौकशी केली पाहिजे. त्याचप्रमाणे अशा प्रकारच्या सांस्कृतिक कार्यक्रमांना परवानगी देताना पोलीस विभागाने देखील अशा प्रकारच्या घटना घडणार नाहीत याची दक्षता घेतली पाहिजे. सभापती महोदय, फेब्रुवारी 2004मध्ये सिडनी, नोव्हेंबर 2004मध्ये न्यूयॉर्क, जानेवारी 2005मध्ये जर्मनी तसेच नार्वे, केन्स अशा 6 ठिकाणी घडलेल्या घटनांचे लाईव्ह टेलिकास्ट विविध वाहिन्यांवरुन झालेले आहेत. अशा घटनांमधून स्त्रीदेहाचा व्यापार करण्याचीच अशा कार्यक्रमाच्या सूत्रधारांची भूमिका असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. माझी विनंती आहे की, अश्लीलता कायद्याच्या कक्षेमध्ये या घटना घडत असतील तर त्याबाबतीत संबंधितांवर कारवाई होणे आवेश्यक आहे. सभापती महोदय, जे लोक समोर येऊन बोलू शकत नाहीत अशा लोकांच्या भावनांचा विचार करणारे हे सदन आहे. तेव्हा याबाबतीत लॉन्ग टर्म प्लॅन तयार करुन लॅक्मे फॅशन वीकच्या संदर्भात कारवाई करण्याचे आपण आदेश द्यावेत अशी माझी या औचित्याच्या मुद्याद्वारे आपणास विनंती आहे.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय सदस्य डॉ. नीलम गो-हे यांनी अतिशय महत्वाचा आणि गंभीर विषय याठिकाणी उपस्थित केलेला आहे. याबाबतीत आपण संरक्षण देण्याची गरज आहे. ही जी घटना घडली ती हेतुपुरस्सर घडली की तो अपघात होता हे काही समजू शकत नाही. मला तो अपघात आहे असे वाटते. बाहेर रस्त्यावर अस्ताव्यस्त पडलेल्या स्त्रीचे फोटो प्रकाशिक करणे योग्य नाही. ही घटना मी माझ्या घरी दूरदर्शनवरील वाहिन्यांवरुन पाहिली. त्यावेळी घरामध्ये माझी लहान मुले देखील होती. ही दृष्ये वाहिन्यांवरुन सतत दाखविली जात आहेत. याबाबतीत महाराष्ट्राच्या गृह विभागाने गांभीर्याने दखल घेण्याची आवश्यकता आहे. अशा प्रकारची अश्लील दृश्ये वाहिन्यांवरुन दाखविणे हे महाराष्ट्राच्या संस्कृतिला आणि अभिरुचीला धरुन नाही. लहान मुलांवर वाईट संस्कार करणा-या या घटना आहेत. क्रिमिनल प्रोसिजर कोड नुसार अशा घटनांची गंभीर दखल घेतली पाहिजे.

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ...

महाराष्ट्रातील विविध वाहिन्यांना याबद्दल अद्दल घडली पाहिजे असे वाटते. दिवसाचे 24 तास आम्ही काहीही दाखविणार आणि आम्हांला कोणी बोलणारे नाही असे या वाहिन्यांना वाटते ते बरोबर नाही. यासंबंधात गंभीर दखल घेण्याबाबत आपण गृहमंत्र्यांना निदेश द्यावेत अशी माझी आपणांला विनंती आहे.

**सभापती** : माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे आणि माननीय सदस्य श्री. नितीनजी गडकरी यांनी औचित्याच्या मुद्याद्वारे ज्या भावना याठिकाणी व्यक्त केल्या त्या आपणा सर्वांनाच मान खाली घालण्यासारख्या आहे. एक अत्यंत अश्लील असे दृश्य अनेक पध्दतीने दाखविण्याचा प्रयत्न होणे ही अत्यंत निंदनीय बाब आहे. या ठिकाणी गृहराज्यमंत्री उपस्थित आहेत. त्यांना मी सांगू इच्छितो की, या प्रकरणाची शासनाने संपूर्ण चौकशी करावी आणि अत्यंत कठोरपणे ही बाब हाताळावी. कुणाचाही मुलाहिजा न ठेवता इलेक्ट्रॉनिक मिडियावर कठोर कारवाई कशी होईल आणि अशा प्रकारांना वेळीच प्रतिबंध कसा घालता येईल हे शासनाने पहावे. असे प्रकार वेळीच रोखणे अत्यंत आवश्यक आहे. या विषयासंदर्भात माननीय सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे यांनी माझी भेट घेतली होती. मी त्यांना सांगितले की, यासंदर्भात लक्षवेधी सूचना किंवा अर्धा-तास चर्चा उपस्थित करावी. अर्धा-तास चर्चेला मी अधिक वेळ द्यायला तयार आहे. पण या विषयावर सर्वंकष चर्चा झाली पाहिजे. अर्धा-तास चर्चेच्या वेळी माननीय उपमुख्यमंत्री आणि माननीय गृहराज्यमंत्री यांना उपस्थित राहण्याबाबत मी सूचना देईन. आपण सर्वांनीच या बाबीकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, याबाबत आपण जी भूमिका मांडली त्याबद्दल मी आपले अभिनंदन करतो आणि आपल्याला धन्यवादही देतो.

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, मी औचित्याच्या मुद्याद्वारे एका महत्वाच्या विषयाकडे आपल्यामार्फत शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. गेले काही दिवस वर्तमानपत्रातून सातत्याने बातम्या येत आहेत की, देशी दारु आणि तत्सम द्रवपदार्थ शिधावाटप दुकानांतून किंवा किराणा मालाच्या दुकानातून उपलब्ध करुन दिले जाणार आहेत आणि अशा प्रकारचा निर्णय शासनाने घेतला आहे किंवा अशा प्रकारच्या सूचना शासनाने दिलेल्या आहेत. अशा बातम्यांमुळे जनमानसात गैरसमज निर्माण झालेले आहेत. या सदनामध्ये सत्य परिस्थिती काय आहे ते स्पष्ट होणे आवश्यक आहे. अशा प्रकारचा निर्णय जर शासनाने घेतला असेल तर माझ्यासारख्या असंख्य कार्यकर्त्यांचा या

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार ...

निर्णयाला विरोध राहील. मला आठवते की यापूर्वी सुध्दा अशा प्रकारचा निर्णय शासनाने घेतला होता व त्यावेळी मी माननीय मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून त्या निर्णयाला माझा विरोध दर्शविला होता आणि याबाबत आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. नंतर तो निर्णय रद्द करण्यात आला होता. आता पुन्हा एकदा रोज वर्तमानपत्रातून रेशनिंग दुकानावर आणि किराणा मालाच्या दुकानातून वाईन आणि देशी दारु उपलब्ध करुन दिली जाणार आहे अशा बातम्या येत आहेत. शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थी एका वेगळया दिशेने चालले असताना अशा निर्णयाने व्यसनाधीनता वाढेल असे मला वाटते. असा निर्णय दुर्देवाने शासनाने घेतला असेल तर तो मागे घ्यावा जर घेतला नसेल तर याबाबतीत सत्य काय आहे ते सांगावे म्हणजे जनतेमध्ये गैरसमज पसरणार नाही. गेले दोन दिवस मी वारकरी संप्रदायाच्या एका कार्यक्रमामध्ये होतो. त्याठिकाणी वारकरी संप्रदायाने अशा प्रकारच्या वृत्तपत्रातून येणाऱ्या बातम्यांबाबत तीव्र शब्दात वेदना व्यक्त केलेल्या आहेत. म्हणून शासनाने याबाबत खुलासा करावा किंवा सत्य काय आहे ते सांगावे अशी मी आपणांमार्फत शासनाला विनंती करतो.

**सभापती** : माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी औचित्याच्या मुद्याद्वारे एका अत्यंत महत्वाच्या आणि समाजाशी निगडीत असणाऱ्या विषयावर आपले विचार मांडले आहेत. विशेषत: नवी पिढी अत्यंत चांगल्या प्रकारे सुसंस्कृत झाली पाहिजे अशी आपल्या सगळयांची अपेक्षा असताना रेशन दुकानातून किंवा अन्य दुकानातून दारुची विक्री होणार असेल तर याबाबत शासनाने वेळीच काळजी घ्यावी असे मत त्यांनी व्यक्त केले ते 100 टक्के बरोबर आहे. यासंबंधात माननीय अर्थमंत्र्यांना मी सांगेन की, या विषयाबाबत शासनाची भूमिका काय आहे ती स्पष्ट करण्याबाबत संबंधित विभागाच्या मंत्र्यांना कळवावे.

----

यानंतर श्री. खर्चे पी.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री. धर्मराव बाबा आत्राम (परिवहन राज्यमंत्री) : महोदय, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे सन 2003-04 चे हिशेब व हिशेब तपासणी अहवाल मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : सन 2003-04 चे हिशेब व हिशेब तपासणी अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

-----------

श्री. जयंत पाटील ( वित्त मंत्री) : महोदय, पुरवणी विनियोजन विधेयकासंदर्भात माननीय राज्यपालांनी दिलेल्या निदेशाची प्रत मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : पुरवणी विनियोजन विधेयकासंदर्भात माननीय राज्यपालांनी दिलेल्या निदेशाची प्रत सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

-------------

...........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सादर करणे व संमत करणे.

डॉ. दीपक सावंत (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सादर करतो.

"सर्व सदस्यांना कळविण्यात येते की, मंगळवार, दिनांक 4 एप्रिल, 2006 रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशासकीय विधेयकांना द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता सोमवार, दिनांक 3 एप्रिल, 2006 रोजी समितीची बैठक झाली. विधानपरिषदेकडे सन्माननीय सदस्यांची एकूण 10 विधेयके पुर:स्थापनार्थ आहे. त्यासाठी 20 मिनिटांचा वेळ देण्यात यावा व उर्वरित 130 मिनिटांचा वेळ अशासकीय विधेयकांना खालीलप्रमाणे देण्यात यावा अशी शिफारस समितीने केली आहे.

1. सन 2005 चे वि.प.वि.क्र.8-विधेयक, 2005-प्रा. बी.टी.देशमुख वि.प.स. यांचे-
   35 मिनिटांपेक्षा जास्त नाही.
2. सन 2005 चे वि.प.वि.क्र.4-विधेयक, 2005-श्री कन्हैयालाल गिडवाणी यांचे.
   35 मिनिटांपेक्षा जास्त नाही.
3. सन 2005 चे वि.प.वि.क्र.9-विधेयक, 2005-श्री मधुकर चव्हाण यांचे.
   30 निमिटांपेक्षा जास्त नाही.
4. सन 2005 चे वि.प.वि.क्र.2-विधेकय, 2005 - ॲड. अनिल परब यांचे.
   30 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

यापैकी कोणत्याही विधेयकाचा वेळ वाचल्यास तो त्या पुढील क्रमांकाच्या विधेयकास देण्यात यावा, अशीही शिफारस समितीने केली आहे.

**सभापती** : अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला संमत आहे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

----------------

..........3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना.**

**सभापती** : श्री जयंत प्र. पाटील वि.प.स. यांनी "नागरी जमीन कमाल धारणा व विनिमय अधिनियम, 1976 मधील मोकळी जमीन व खुल्या जमिनी यांच्या व्याख्येमध्ये शेत जमिनीचा अंतर्भाव होत नसल्याने जी झोनमधील गांवे व जागा या कायदयाच्या अंतर्गत सामील होण्याची आवश्यकता नसणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर व इतर वि.प.स. यांनी "अनुसूचित जातीमध्ये समाविष्ट असलेल्या मेहेतर, भंगी, दूमार इ. उप जातींना सुदर्शन नामे सुधारित नावाने अनुसूचित जाती म्हणून मान्यता देण्याची मागणी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. सदर विषय हा नियम 93 चा होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र याबाबत शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री. रामनाथ मोते वि.प.स. यांनी "महाराष्ट्रातील उच्च माध्यमिक विभागातील सन 2003-04, 2004-05 व 2005-06 मध्ये मान्यता मिळालेल्या शिक्षकांना वेतन मिळण्यास शासनाने केलेले दुर्लक्ष" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे

यानंतर श्री. भारवि .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .....

यानंतर माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी "ठाणे जिल्हयातील सक्शन पंपाद्वारे होणाऱ्या बेकायदा रेती उत्खनाने नद्या व खाडयांमधील पाणी साठयाबरोबरच मच्छिमारी धोक्यात येणे तसेच तिवराच्या जंगलांची सर्रास कत्तल सुरू असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र, या विषयावर माननीय मंत्र्यांनी निवेदन करावे.

यानंतर माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण व इतर यांनी "मुंबईत चालणाऱ्या टॅक्सी, ऑटो रिक्षांनी परिवहन विभागाने नेमून दिलेल्या छापील तक्त्याप्रमाणे भाडे न आकारता मनाप्रमाणे भाडे आकारणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र, या विषयावर माननीय मंत्र्यांनी निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री दिवाकर रावते व इतर वि.प.स. यांनी "यवतमाळ जिल्हयातील दिग्रस तालुक्यातील मौजे बोरी येथे राहणाऱ्या प्रकल्पपीडित कास्तकारांना विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडून आजतागायत भू-संपादन निधी देण्यात न आल्यामुळे सदर शेतकऱ्यांनी दिनांक 1 एप्रिल, 2006 रोजी आत्मदहनाचा दिलेला इशारा." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री अरविंद सावंत, डॉ. नीलम गोऱ्हे व इतर वि.प.स. यांनी "दिनांक 2 एप्रिल, 2006 रोजीच्या सुमारास उरण येथील जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्टच्या पोर्ट युजर्स बिल्डींगला लागलेली भीषण आग" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**....

यानंतर माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, मधुकर चव्हाण व इतर यांनी "दिनांक 24 मार्च 2006 रोजी म्हाडाच्या मध्यवर्ती कार्यालयात स्टेट बँक ऑफ इंडियाच्या नावाने नऊ टक्के व्याज दराने ठेवी स्वीकारण्यासंबंधी म्हाडाचे लेखाधिकारी श्री.अशोक ब्रीद यांच्या स्वाक्षरीने 45 कोटी रुपयांचा धनादेश देणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र, या विषयावर माननीय मंत्र्यांनी निवेदन करावे.

यानंतर माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत व इतर यांनी "दिनांक 2 एप्रिल 2006 रोजी मुंबई उपनगरातील अंधेरीच्या साकीनाका भागात महानगर गॅस कंपनीच्या पाईप लाईन गळतीमुळे लागलेली आग" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेला अनुमती नाकारीत आहे. मात्र, या विषयावर शासनाने लक्ष घालावे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, येथे वारंवार आगी लागण्याच्या घटना घडत आहेत. आता पर्यंत येथे तीन वेळा अशा घटना घडलेल्या आहेत.

**सभापती** : यासंबंधातील आपण मला लक्षवेधी सूचना दिली तर मी तिचा विचार करीन.

डॉ.दीपक सावंत : ठीक आहे.

**सभापती** : यानंतर माननीय सदस्य डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "मार्च 2006 च्या शेवटच्या आठवडयात पंढरपूर जि.सोलापूर येथील विश्व हिंदू परिषदेचे शहर मंत्री श्री.चंद्रकांत अन्नदाते यांची झालेली हत्या" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र, या विषयावर माननीय मंत्र्यांनी निवेदन करावे.

यानंतर माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी व इतर यांनी "एरंजाड (ता.बदलापूर, जि.ठाणे) येथील पूरग्रस्तांची नुकसान भरपाईची रक्कम कृषी अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे दुसऱ्या व्यक्तींच्या नावे जमा होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषयत होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र, या विषयावर शासनाने लक्ष घालावे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती...

यानंतर माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी व इतर यानी "दिनांक 10 मार्च 2006 रोजी पांढरकवडा (जि.यवतमाळ) येथील कापूस पणन महासंघाच्या गोडाऊनला आग लागून झालेले नुकसान" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र, या विषयावर माननीय मंत्र्यांनी निवेदन करावे.

यानंतर माननीय सदस्य प्रा.शरद पाटील व इतर यांनी "मार्च 2006 च्या शेवटच्या आठवडयात काळम्मावाडी कालव्याला ऐनी गावाजवळ (ता.राधानगरी) पडलेल्या भगदाडामुळे जनतेत परसरलेले भीतीचे व घबराटीचे वातावरण" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषयत होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र, या विषयावर माननीय मंत्र्यांनी निवेदन करावे.

यानंतर माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी व इतर यांनी "वांद्रे (पूर्व) येथील मोक्याच्या जागेवरील तीस हजार चौरस मीटर क्षेत्रफळाच्या सुमारे 863 कोटी रुपयांचा भूखंड अवघ्या एक रुपया प्रति चौरस फूट दराने बडया बिल्डरच्या घशात घालण्याचा म्हाडाने केलेला प्रयत्न" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र, या विषयावर माननीय मंत्र्यांनी निवेदन करावे.

अन्य सूचना मी दालनात नाकारलेल्या आहेत.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, "दिनांक 2 एप्रिल 2006 रोजी सोलापूर जिल्हयातील अक्कलकोट शहरात व परिसरात अज्ञात रोग पसरल्याने दोन व्यक्तींचा गेलेला बळी व दोन वृद्ध अत्यवस्थ असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली होती.

**सभापती** : आपली सूचना मी दालनात नाकारलेली आहे. आपण मला दालनात येऊन भेटावे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आपण शासनाला निवेदन करण्याचे निदेश देतात. परंतु, येथे शासनातर्फे निवेदन करण्यात येत नाही शासनाने दररोज किमान तीन निवेदने सभागृहात करणे आवश्यक आहे. पण तसे होत नाही.

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : आज सहा निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येणार आहेत. मधल्या काळात एक-दोन निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येणार होती. परंतु, अन्य काही कारणांमुळे ती निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली नाहीत.

.....

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## माननीय राज्यपालांच्या निर्देशासंबंधी

Shri. Nitin Gadkari : महोदय, राज्यपालांच्या निदेशाची जी प्रत प्राप्त झालेली आहे त्यामध्ये असा उल्लेख आहे की, " Approval is accorded for introduction of the Appropriation Bill for Supplementary Grants since both the Houses of the Legislature have approved the demand for Supplementary Grants to the tune of Rs.1041.90 crores.

I have taken note of the Commitment of the Government to allot an additional amount of Rs.150 crores to Vidarbha and Rs.50 crores to Konkan from the Contingency Fund.

Of the Supplementary Statement of Expenditure of Rs.1041.90 crores, the following grants may be released:-

Rs.100 crores to Tapi Irrigation Development Corporation.

Rs.100 crores to Marathawada Godawari Irrigation Development Corporation.

Rs.150 crores to MKVDC for land acquisition and rehabilitation.

Rs.149.20 crores for projects under AIBP, out of which Rs.70.12 crores will be allotted to Vidarbha Irrigation Development Corporation, Rs.42.30 crores to MKVDC, Rs.10.50 crores to Konkan Irrigation Development Corporation and Rs.6.10 crores to Tapi Irrigation Development Corporation.

Rs.41.10 crores for Inter-State Irrigation Projects of Tillari and Dudhganga.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



Shri. Nitin Gadkari ....

Rs.8 crores to Irrigation Department for Irrigation Projects in Vidarbha.

The remaining grants out of Rs.1041.90 crores shall not be released."

हा सर्व पैसा 1041.90 कोटींमधून वितरित केलेला आहे. परंतु खाली असे म्हटले आहे की, "The remaining grants out of Rs.1041.90 crores shall not be released". खरे म्हणजे मला हा हिशेब लक्षात आलेला नाही. कारण तरतूद वजा केल्यानंतर उरलेली जी गँट आहे ती कोणती आहे ? 1041 कोटी रुपये रिलीज करण्याबाबत माननीय राज्यपाल महोदयांचे निर्देश आहेत. त्यांनी त्यांचे निर्देश परत घेतलेले नाहीत. त्यामुळे उर्वरित रक्कम सुध्दा रिलीज करावयास हवी होती.

श्री.जयंत पाटील : महोदय, 1041 कोटी रुपयांचा निधी पुढील बाबींवर कसा रिलीज करावा असे त्यांनी पत्रामध्ये नमूद केले आहे. त्यामुळे 1041 कोटींमधून त्या त्या बाबींवरील रक्कम वजा केल्यानंतर, जी रक्कम शिल्लक राहील ती रिलीज करु नये असा त्याचा अर्थ आहे.

Shri. Nitin Gadkari : Sir, at the end of the statement, it has been stated: "The remaining amount shall not be released." त्यामुळे 1041 कोटींमधून विशिष्ट बाबींसाठी असलेली रक्कम वितरित केल्यानंतर उरलेले पैसे वाटावयास हवे होते.

श्री.जयंत पाटील : महोदय, 1041 कोटी रुपयांपैकी उरलेले पैसे वाटू नयेत, असा त्याचा अर्थ आहे.

Shri. Nitin Gadkari : Sir, how it can be mentioned in the statement that the remaining grant shall not be released? 1041 कोटींपैकी 300-400 कोटी रुपये वाटल्यानंतर जी रक्कम शिल्लक राहते त्यासाठी सुध्दा राज्यपाल महोदयांचे निर्देश आहेत. As far as the provision of the Constitution of India is concerned, उरलेली रक्कम वाटावयास हवी होती.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, ठराविक मुद्यांसाठी पुरवणी मागण्या सभागृहात मांडण्यात आल्या होत्या. ज्या कामांसाठी पुरवणी मागण्या मांडण्यात आल्या होत्या त्याबाबत कामांच्या सूचना आणि त्याबाबतचा उल्लेख त्यामध्ये होता. राज्यपाल महोदयांनी विनियोजन विधेयक मांडण्यास मान्यता दिली. पुरवणी मागण्यांमधील ज्या पुरवणी मागण्या सभागृहाने मान्य

..3..



श्री.जयंत पाटील....

केल्या त्यासाठी विनियोजन विधेयक मांडण्यास राज्यपाल महोदयांनी अनुमती दिली. त्यानंतर विनियोजन विधेयकाला मान्यता देताना, विशिष्ट रक्कम रिलीज करावी आणि उरलेली रक्कम रिलीज करु नये असा या पत्राचा अर्थ आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**The CHAIRMAN** :  Mr. Gadkari, these are the directives given by the Hon. Governor of Maharashtra. हे आपल्यासमोर आलेले आहे.

श्री.नितीन गडकरी : राज्यपाल महोदयांच्या निर्देशाबद्दल आणि सरकारच्या निर्णयाबद्दल आम्हाला नितांत आदर आणि सन्मान आहे.  But, it is beyond my understanding. परंतु यामध्ये कोठे तरी तांत्रिक चूक झाली असावी असा माझा अंदाज आहे.  1041 कोटी रुपयांपैकी 447 कोटी रुपये वितरित केल्यानंतर 600 कोटी रुपये उरतात.  1041 कोटी रुपयांसाठी राज्यपाल महोदयांचे निर्देश लागू आहेत.  राज्यपाल महोदयांनी विशिष्ट रक्कम रिलीज केलेली आहे.  मला वाटते राज्यपाल महोदयांकडे या संदर्भातील माहिती गेली नसावी.  यासंदर्भात काय पत्रव्यवहार झाला याबाबत मला माहिती नाही.  खरे म्हणजे या संबंधी राज्यपाल महोदयांचे निर्देश अजूनही लागू आहेत.  इरीगेशनखाली पैसा उरला असेल आणि पुरवणी मागण्यांमध्ये जी रक्कम मंजूर केली आहे, त्यातील उरलेले 600 कोटी रुपये वितरित केले पाहिजेत एवढेच माझे म्हणणे आहे.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

सभापती महोदय, हे माझ्या कल्पनेपलीकडील आहे. मला वाटते की, यामध्ये काही तरी तांत्रिक चूक झाली आहे. तरी, मी माननीय वित्तमंत्र्यांना विनंती करतो की, आपण या संदर्भात तपासून निवेदन करावे.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, आपण पुरवणी मागणीमध्ये वेगवेगळ्या कामांसाठीच्या रकमा दर्शविल्या होत्या. विनियोजन विधेयक मान्य करताना, या वेगवेगळ्या कामांसाठी दर्शविण्यात आलेल्या रकमा नंतर त्यांनी वाढवून किंवा बदलून न देता, त्यातील काही रकमा रिलीज करु नयेत एवढेच सांगितले होते. सभापती महोदय, इरिगेशनसाठी ॲडहॉक एवढे पैसे असे आपण काहीही केलेले नाही आणि तसे केले असते तर आपल्याला असे बदल करता आले असते किंवा त्या पैशाला माननीय राज्यपालांचे निदेश लावता आले असते व शिल्लक राहिलेले पैसे वाटता आले असते. पण सभापती महोदय, पुरवणी मागणीत प्रत्येक कामासाठी प्रोजेक्टवाईज किंवा आयटमवाईज कामांची नोंद केली असल्यामुळे पुरवणी मागण्यांनंतरच्या विनियोजन विधेयकालाही माननीय राज्यपालांनी नाकारले नाही. परंतु त्यानंतरच्या रिलिजेसमुळे डिस्टॉर्शन होईल म्हणून त्यांनी काही कामांसाठी मर्यादा लावली आणि उरलेल्या कामांना पैस द्यावेत असे सांगितले.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय वित्तमंत्र्यांनी दिलेल्या माहितीतून नवीन प्रश्न निर्माण झालेला आहे. माननीय वित्तमंत्र्यांनी दिलेली डायरेक्शनसंदर्भातील माहिती आम्हाला मान्य आहे. त्यासंदर्भात आम्हाला काही म्हणावयाचे नाही. परंतु आता माननीय वित्तमंत्र्यांनी केलेल्या खुलाशातून नवीन बाब निदर्शनास आलेली आहे. सभापती महोदय, 1041 कोटी रुपयांमधील 449 कोटी रुपयांना निदेशाप्रमाणेच त्यांनी परवानगी दिली. परंतू त्यातील जे 600 कोटी रुपये राहिले, ते निदेशांप्रमाणे दिले नव्हते. त्यांनी ती अमाऊंट, "shall not be released " म्हणून विथहेल्ड केली. समजा ती विथहेल्ड केली तर, हे उरलेले 600 कोटी रुपये त्यातील आहेत. सभापती महोदय, ते पैसे त्यांनी पुरवणी मागण्यांद्वारे इरिगेशनकरिता मंजूर केले होते, त्या पैशांवर माननीय राज्यपालांनी आक्षेप घेतला होता. सभापती महोदय, ते पैसे निदेशाप्रमाणे नसल्यामुळे विथहेल्ड किंवा विड्रॉ केले. सभापती महोदय, मग ते

..2

श्री. नितीन गडकरी ....

पैसे विड्रॉ केले असतील ते इरिगेशनकरिता सप्लीमेंटरी म्हणून मंजूर झालेले आहेत. सभापती महोदय, ते पैसे नियमात बसत नव्हते. म्हणून ते पैसे माननीय राज्यपालांच्या निकषात बसत असल्याप्रमाणे, महाराष्ट्रातील तिन्ही कॉर्पोरेशनला वाटून द्यायला पाहिजे. सभापती महोदय, यामध्ये काय चूक आहे हे आपणच आम्हाला सांगावे. आपणाला ते पैसे या गोष्टीलाही द्यायचे नाहीत आणि त्या गोष्टीलाही द्यायचे नाहीत. हे पैसे लॅप्स करुन टाकायचे, असे काही माननीय राज्यपालांचे म्हणणे नव्हते. माननीय राज्यपांच्या निदेशांचे जे आता नवीन इंटरप्रिटेशन केले आहे, ते चूक आहे, असे मला वाटते. सभापती महोदय, हा प्रश्न अतिशय नाजूक असल्यामुळे आपण पहिल्यांदा या संदर्भातील डॉक्युमेंट्स तपासून पहावेत व दोन तासांनी किंवा उद्या या संदर्भात माहिती सांगावी.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, 1041 कोटी रुपयांपैकी 548.40 कोटी रुपयांचे माननीय राज्यपालांनी दिलेल्या डायरेक्टिव्हज्प्रमाणे वाटप झाले. नंतर दिनांक 31 मार्चला माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांच्या नेतृत्वाखाली या संदर्भात सर्वपक्षीय शिष्टमंडळ गेले. सभापती महोदय, यातीलच राहिलेल्या 285 कोटी रुपयांसंदर्भातील पत्र त्याच दिवशी संध्याकाळी आपल्या वित्त विभागाच्या सचिव महोदयांना आले. अशाप्रकारे 1041 कोटी रुपयांपैकी असलेले ते 285 कोटी रुपये कमी झाले. म्हणजे त्यातील 833.40 कोटी रुपये एवढी रक्कम 1041 कोटी रुपयांच्या अगेंस्ट माननीय राज्यपालांनी वेगवेगळ्या विभागांसाठी तसेच जलसंपदा विभागासाठी दिले आणि या व्यतिरिक्त सी.एफ. ॲडव्हान्समधून विदर्भाला 150 कोटी रुपये व कोकणाला 50 कोटी रुपये दिले.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, यामध्ये म्हटले आहे की, 100 कोटी विदर्भाला, 100 कोटी मराठवाड्याला, 10 कोटी ए.आय.बी.पी. प्रोजेक्टला, 10.50 कोटी रुपये कोकण इरिगेशनला, 70.12 कोटी रुपये विदर्भ इरिगेशनला. आपण मला याचे उत्तर द्या की, आम्ही पार्टी होतो.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VVK/ KGS/ MAP/ प्रथम श्री. कांबळे.. 15:45

श्री. नितीन गडकरी...

200 कोटी रुपये वाटू नयेत, असे माननीय राज्यपाल महोदयांनी निर्देश दिलेले आहेत काय ? असे नसेल तर मग 200 कोटी रुपये का वाटण्यात आलेले नाहीत ?

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, सभागृहामध्ये ज्यावेळी पुरवणी मागण्या सादर केल्या तेव्हा 1041 कोटी रुपयांच्या मागण्या सभागृहाने मंजूर केल्या. या मागण्यांचा अंतर्भाव विनियोजन विधेयकामध्ये आहे. विनियोजन विधेयकाचा अर्थच असा आहे की, तुम्ही ज्या मागण्या सादर केल्या त्या मागण्यांमध्ये बदल करु नये. म्हणून त्या मागण्या फिक्स केल्या जातात. विनियोजन विधेयकाद्वारे वेगवेगळया खात्याच्या पुरवणी मागण्या आपण मंजूर करतो. या सगळया एकत्रितपणाने खर्च करण्याची परवानगी विनियोजन विधेयकाव्दारा सभागृहाकडून मागतो. 1041 कोटी रुपयांची जी विगतवारी आहे त्यामध्ये 387 कोटी रुपये तापी एरिगेशन डेव्हलपमेंट कार्पोरेशनच्या वेगवेगळया प्रोजेक्टसाठी होते. 100 कोटी रुपये मराठवाडा गोदावरी इरिगेशन डेव्हलपमेंट अंतर्गत बॅरेजेससाठी होते. एमकेयुडीसीच्या वेगवेगळया कामांसाठी आणखी 125 कोटी रुपये होते. 149 कोटी रुपये एआयडीपीच्या वेगवेगळया प्रोजेक्टसाठी होते. सभापती महोदय, एकदा सभागृहाने पुरवणी मागण्या मान्य केल्यानंतर त्यामध्ये ज्या मागण्यांचा समावेश आहे त्या सोडून जर वेगळया कामांसाठी खर्च करावयाचा झाला तर त्यासाठी पुन्हा सभागृहापुढे यावे लागले असते किंवा जे 200 कोटी रुपये शिल्लक राहिलेले आहेत ते माननीय राज्यपाल महोदयांच्या निर्देशाप्रमाणे वाटावयास पाहिजे, असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. राज्यपाल महोदयांच्या निर्देशाप्रमाणे 387 कोटी रुपयांपैकी 200 कोटी रुपये जे शिल्लक होते ते सायंकाळी 6-7 वाजता आले, 31 मार्चला आपले अकाऊंट बंद होते. सभागृहाने मान्य केलेल्या ज्या मागण्या आहेत, त्या मागण्यांच्या व्यतिरिक्त वेगळया बाबींसाठी खर्च करावयाचा झाल्यास पुन्हा आपणाला सभागृहाची अनुमती घेणे आवश्यक असते. परंतु असे काही शिल्लक राहिलेले पैसे आपणाकडे नव्हेत. आपणाकडे पैसे शिल्लक आहेत पण वाटायचे नाहीत असा कोणताही पैसा आपणाकडे नव्हता. सभागृहामध्ये जे कबूल केलेले आहे त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे. सी.एफ. ॲडव्हांसच्या संदर्भात आताच माननीय जलसंपदा मंत्री महोदयांनी सांगितलेले आहे. तोही पैसा त्याच दिवशी दिलेला आहे व हा पैसा आपणाला 31 मार्चच्या आत व मागच्या वित्तीय वर्षामध्ये खर्च करणे आवश्यक होता. सन्माननीय सदस्यांच्या मनामध्ये असे आहे की, इरिगेशन विभागाला आपण

.....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील....

1041 कोटी रुपये दिलेत व शिल्लक राहिलेला पैसा माननीय राज्यपाल महोदयांच्या निर्देशाप्रमाणे वाटप करणे आवश्यक होते. शिल्लक राहिलेला जो पैसा आहे तो खर्च करु नये, असा शासनाला आदेश आला. हा पैसा खर्च करु नये असा आदेश येण्याचे कारण म्हणजे पुरवणी मागण्या सभागृहाने मान्य केलेल्या आहेत व या मागण्या त्या त्या हेडप्रमाणे मान्य केलेल्या आहेत. आता 100 रुपयांमधील 30 रुपयेच खर्च करा व 70 रुपये खर्च करु नका व हे खर्च केले तर डिसटॉर्शन वाढेल म्हणून माननीय राज्यपाल महोदयांनी तसे निर्देश शासनास दिलेले आहेत.

श्री. नितीन गडकरी : 1041.33 कोटी रुपये पुरवणी मागण्यांमध्ये मंजूर केलेले आहेत. सन्माननीय जलसंपदा मंत्री महोदयांनी सांगितलेले 285 कोटी रुपये दिलेले आहेत. 285 कोटी रुपये व 548 कोटी रुपये असे एकूण 833 कोटी रुपये झालेत. उरले 208.33 कोटी रुपये. 208.33 कोटी रुपये आम्ही पुरवणी मागण्याद्वारे इरिगेशनसाठी मंजूर केले होते.

श्री. जयंत पाटील : आपण इरिगेशनसाठी पुरवणी मागण्या मंजूर न करता, इरिगेशनमधील आयटमवाईज वेगवेगळया कामांसाठी मंजूर केलेले आहेत.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझी एकच विनंती आहे की, 208 कोटी रुपये जे सुप्त झालेले आहेत, ते 31 मार्चला लॅप्स् झालेले आहेत. इरिगेशनसाठी जो निधी असतो त्याबाबत असे कलम आहे की, It should be immediately informed to the Hon. Governor. दुसरे कलम असे आहे की, The allocation of funds should be made after his permission is taken. हे 31 मार्च रोजी आपण माननीय राज्यपाल महोदयांच्या लक्षात आणून द्यावयास पाहिजे होते. हे लक्षात आणून दिले असते तर 208 कोटी रुपये सुध्दा वाटले गेले असते. हे 208 कोटी रुपये सुप्त झाले, ते गायब झालेले आहेत. तुमच्या इच्छेप्रमाणे वाटले गेले, पुरवणी मागणी बरोबर होती, ते तुम्ही वाटून दिले. माननीय राज्यपाल महोदयांच्या निर्देशाप्रमाणे तुमची अडचण झाली म्हणून तुम्ही 208 कोटी रुपये लॅप्स् होऊ दिलेत. हे कसे काय बरोबर आहे, सभापती महोदय हा अन्याय नाही काय ?

यानंतर श्री. सुंबरे...

अमुद्रित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, अर्थसंकल्पातील काही नियम आहेत, काही प्रोसिजर्स आहेत. मंत्रिमंडळाने मंजूर केलेल्या सर्व पुरवणी मागण्या सरकार जेव्हा सभागृहासमोर मंजुरीसाठी घेऊन येते त्यावेळेस सभागृह त्या पुरवणी मागण्यांना मंजुरी देते. ती मंजुरी दिल्यानंतर जे विनियोजन विधेयक आपण करतो त्या विधेयकामध्ये राज्य सरकारने एका हेडखालील पैसे दुसऱ्या हेडसाठी ट्रान्स्फर करू नये यासाठी त्यावर आपण शिक्कामोर्तब करतो आणि त्यासाठी राज्यपालांची त्याला अनुमतो घेतो. एकदा ते झाल्यानंतर त्या हेडखाली मंजूर झालेले पैसे एक तर खर्च तरी होतात किंवा लॅप्स तरी होतात. आता आपण पूर्ण वर्षभरामध्ये तीन पुरवणी मागण्या मान्य केल्या आहेत, किंवा अर्थसंकल्प मान्य केला. या अर्थसंकल्पावर दाखविलेले वेगवेगळ्या हेडवरील पैसे सगळेच खर्च होतात असे नाही आणि ते राहिलेले पैसे वर्षअखेरीस लॅप्सच होतात. आता परत पैसे द्यावयाचे असतील, अतिरिक्त रक्कम आपल्याकडे शिल्लक असेल तर डायरेक्टीवज प्रमाणे सभागृहासमोर त्यासाठी परवानगी मागण्यास पुन्हा यावयास पाहिजे.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, एक साधा, सरळ आणि लहानसा प्रश्न या निमित्ताने पुढे आलेला आहे आणि आपण परवानगी दिलीच आहे म्हणून मी त्याबाबत काही बोलू इच्छितो. माननीय राज्यपालांच्या डायरेक्टशन्स या कॉन्स्टिट्यूशनली बंधनकारक आहेत आणि हे शासनाने मान्य केलेले आहे. वार्षिक अंदाजपत्रक सादर करताना ते पाळायचे आणि पुरवणी मागण्या आणताना मात्र ते पाळायचे नाही यातून निर्माण झालेला हा छोटासा वाद आहे इतकेच. माझे या बाबतीतील नेमके म्हणणे असे आहे की, जे आता शंभर-दीडशे कोटी राहिले आहेत हा भाग वेगळा. पण मूळ अंदाजपत्रक सादर करताना आणि पुरवणी मागण्या सादर करताना याची काटेकोरपणे अंमलबजावणी केली जाईल आणि त्याप्रमाणे निधी उपलब्ध करून दिला जाईल एवढे जरी शासनाने येथे सभागृहाला सांगितले तरी हा प्रश्न येथेच थांबतो.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, ही सगळी चर्चा गेले काही दिवस या सभागृहामध्ये झ ाली ती याच अनुषंगाने होती, यापेक्षा ती वेगळी काहीच नव्हती. पुरवणी मागण्या सभागृहात येण्याच्या आधी आपण राज्यपालांना कळविले पाहिजे. मला आठवते की, डिसेंबर महिन्यात आपण पुरवणी मागणीमध्ये मराठवाडा पाटबंधारे महामंडळाला 225 कोटी रूपये दिले. हे 225 कोटी रूपये आपण पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून दिले होते. त्यावेळी किंवा यापूर्वी ...

...... डब्ल्यू 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी. देशमुख : सभापती महोदय, जे डिस्टॉर्शन झाले त्याबाबतीतील चर्चा थांबविण्यासाठी म्हणून मी पॉईंटेड प्रश्न येथे विचारला की, यापुढे वार्षिक वित्तीय विवरणपत्र सादर करताना आणि पुरवणी मागण्या सादर करताना हे निधीचे वितरण डायरेक्शन्सप्रमाणेच केले जाईल हे नक्की आहे ना ?

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, सभागृहामध्ये याच विषयावर तर चर्चा झाली. आता तर याबाबत डायरेक्टिव्हजच आहेत. आजपर्यंत पुरवणी मागण्या मांडण्यासंबंधात कोणतेही भाष्य नव्हते, थोडेसे सरकारला स्वातंत्र्य होते. डायरेक्टिवजमध्ये पृ.2 वर शेवटच्या दोन परिच्छेदांमध्ये त्याचा उल्लेख देखील आहे. ...

श्री. बी.टी.देशमुख : ते सारे वाचल्यानंतर, म्हणूनच तर मी प्रश्न विचारला आहे. ..

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, शासनाचे धोरण हेच आहे. माननीय राज्यपालांनी डायरेक्टिव्हज दिल्यानंतर, ते पाळल्यानंतरच पैसे रिलिज झालेले आहेत. म्हणजे राज्यपालांचे डायरेक्टिव्हज सरकारने पाळलेले आहेत.. ..

श्री. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मी हा वाद थांबविण्यासाठी म्हणून प्रश्न विचारला होता तर तो वाद वाढविणारे उत्तर मंत्री महोदयांकडून येऊन राहिले आहे. ..

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, मला आपण संरक्षण द्यावे. आता येथे वाद होण्याचा प्रश्नच नाही. 31 मार्च आता संपलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.गडकरी साहेबांचा मुद्दा अगदी सरळ आहे. आपण जे सांगत आहात त्याला मी स्वतंत्र उत्तर दिले आहे. .... गडकरी साहेबांनी हात जोडायची गरज नाही. ...

श्री. नितीन गडकरी : आमचे 208 कोटी गायब झालेले आहेत ...

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांना मी अतिशय नम्रपणे सांगू इच्छितो की, अर्थसंकल्प मांडताना ज्या मागण्या सभागृहासमोर येतात, ज्याच्यावर विनियोजन विधेयक मांडले जाते त्यातील मागण्या या हेडवाईज होत्या. जर केवळ इरिगेशन डिपार्टमेंट यासाठी म्हणून मागणी असती तर नक्कीच आपल्याला ते म्हणताहेत त्याप्रमाणे करता आले असते. पण आयटेमवाईज ही मागणी असल्याने एका हेडखालील मागणी दुसऱ्या हेडसाठी ट्रान्स्फर करता आली असती तर राज्यपाल महोदयांनी आपल्याला तेच सांगितले असते की, आपण

..... डब्ल्यू 3 ..





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील .....

या ऐवजी आता असे असे वाटप करा. पण रक्कम तशी ट्रान्स्फर करता येत नसल्यामुळे राज्यपालांनी आपल्याला सांगितले की, तुम्ही या, या, या हेड खाली एवढेच पैसे खर्च करा, बाकी खर्च करू नका.

**सभापती** : खरे तर या विषयावर आतापर्यंत आपण खूप चर्चा केलेली आहे. माननीय राज्यपालांनी ज्या काही डायरेक्टिव्हज दिल्या आहेत त्या येथे आपल्यापुढे सादर करण्यात आलेल्या आहेत. आता या डायरेक्टिव्हज वर आपण चर्चा तरी किती करावयाची ? खरे तर यावर चर्चा करताच येत नाही. तेव्हा मी पुढील कामकाज घेण्यास सुरू करतो.

( यानंतर श्री. सरफरे .... एक्स 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, मला फक्त एवढाच प्रश्न विचारावयाचा आहे की, या डायरेक्शन्समध्ये जे म्हटले आहे त्याचे इमाने-इतबारे पालन केले जाईल की नाही ?

श्री. जयंत पाटील : केले जाईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : शासनाने विशेष पॅकेज अंतर्गत रु.25000/- पर्यंतच्या कर्जावरील व्याज माफ करण्याचा घेतलेला निर्णय

मु.शी. : शासनाने विशेष पॅकेज अंतर्गत रु.25000/- पर्यंतच्या कर्जावरील व्याज माफ करण्याचा घेतलेला निर्णय याबाबत माननीय सदस्य प्रा. बी. टी.देशमुख, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर (सहकार राज्यमंत्री) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. बी.टी. देशमुख व इतर विधान परिषद सदस्य यांनी "शासनाने विशेष पॅकेज अंतर्गत 25000/- रुपयांपर्यंतच्या कर्जावरील व्याज माफ करण्याचा घेतलेला निर्णय" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निर्देश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेले आहे. परंतु मी आपल्या अनुमतीने छापील निवेदनामध्ये दुरुस्ती करु इच्छितो. "छापील निवेदनामधील शेवटचा परिच्छेद रद्द करण्यात यावा," तसेच,शेवटून दुसऱ्या ओळीमध्ये "त्यानुसार रु.17981.74 लाख आकस्मिकता निधीतून दिनांक 1.4.2006 च्या शासन निर्णयाव्दारे उपलब्ध करुन देण्यात आले आहेत" अशाप्रकारची सुधारणा करण्यात यावी. या दुरुस्तीसह हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यांत आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, फार जिव्हाळयाचा प्रश्न नियम 93 च्या सूचनेमध्ये गुंतलेला होता. याबाबत मी मंत्रिमहोदयांचा फार आभारी आहे. कर्जमाफी दिली जाईल असे सांगितले होते. परंतु निर्णय घेतला गेला नव्हता. एप्रिल महिन्यापासून त्याची पुर्नबांधणी करावयाची होती परंतु ते करणे शक्य नव्हते असे लेखी कळविण्यात आले होते. मी माझ्या एका जिल्हयाचा प्रश्न विचारला होता. परंतु मंत्रिमहोदयांनी सर्व जिल्हयांसाठी उत्तर दिले आहे त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. 180 कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्यांव्दारे आकस्मिकता निधीमधून हे पैसे देणार आहात. हे पैसे सहा जिल्हयामधील बँकाकडे किती दिवसात दिले जातील?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, शासनाने आदेश निर्गमित केले असून लवकरात लवकर पैसे दिले जातील...

प्रा. बी. टी. देशमुख : लवकरात लवकर म्हणजे केव्हां?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : आठवडाभरात दिले जातील.

प्रा. बी. टी. देशमुख : दुसरा प्रश्न असा की, याची पुर्नबांधणी 2 तारेखापासून व्हायला पाहिजे होती ती झाली नाही. आणि रिझर्व्ह बँकेच्या परवानगीशिवाय होणे शक्य नाही. अल्प मुदतीच्या कर्जाची पुर्नबांधणी करण्याबाबत लक्षवेधी सूचनेमध्ये नमूद करण्यात आले आहे. त्यासंबंधी मंत्रिमहोदयांकडून निवेदनामध्ये उत्तर आले नाही, ते उत्तर येणे आवश्यक आहे.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, शेतकऱ्यांना पुढील वर्षी पुन्हा कर्ज मिळाले पाहिजे असा माननीय सदस्यांचा प्रश्न विचारण्याचा उद्देश आहे. शेतकऱ्यांना पुढील वर्षी कर्ज मिळण्यामध्ये काही अडचण निर्माण होणार नाही याची शासन दक्षता घेईल.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय,मंत्रिमहोदयांनी विषय समजून घेतला पाहिजे की, 180 कोटी सहा जिल्हयांतील बँकांना आठ दिवसात देणार आहात. त्यामुळे तो प्रश्न संपला आहे. आता बँकांच्या अध्यक्षांनी आपल्याला लेखी कळविले आहे की, रिझर्व्ह बँकेच्या आदेशाप्रमाणे आपल्याला ही पुर्नबांधणी करता येणार नाही. याबाबत मंत्रिमहोदयांकडून निश्चित असे उत्तर आले नाही. जर तसे नसेल तर बँकेच्या अध्यक्षांना चुकीचे कळविले आहे काय? म्हणून प्रश्न असा आहे की, कर्जाची पुर्नबांधणी करण्यात येईल काय?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : याबाबतीत रिझर्व्ह बँकेबरोबर बोलून शेतकऱ्यांना सहाय्य होईल अशाप्रकारची सरकारची भूमिका राहील.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी कर्जाच्या पुर्नबांधणीचा प्रश्न उपस्थित केला आहे. निवेदनामध्ये आपण "शेतकऱ्यांच्या कर्जाचे पुनर्गठन करण्यास कोणतीही अडचण राहणार नाही" असे सांगितले आहे. आपण हे एक ते दोन महिन्यात केले नाहीतर त्यांच्या कर्जावर असलेले व्याज किती आहे हे काढता येणार नाही. आणि त्याची त्यांनी माहिती होणार नाही. म्हणून एक ते दीड महिन्यात पुर्नबांधणीचे काम आपण पूर्ण करणार काय?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : निश्चितपणे केले जाईल.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: जालना जिल्हयातील शासकीय पॉलिटेक्निक महाविद्यालयामध्ये सुरु असलेला आर्थिक व प्रशासकीय गैरव्यवहार

**मु.शी.**: जालना जिल्हयातील शासकीय पॉलिटेक्निक महाविद्यालयामध्ये सुरु असलेला आर्थिक व प्रशासकीय गैरव्यवहार याबाबत माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. सुरेश शेट्टी (उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी "जालना जिल्हयातील शासकीय पॉलिटेक्निक महाविद्यालयामध्ये सुरु असलेला आर्थिक व प्रशासकीय गैरव्यवहार" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुसरून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, निवेदनामध्ये म्हटलेले आहे की, "विविध विषयांच्या अध्यापकांच्या रिक्त जागावर दोन वर्षाकरिता किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून नामनिर्देशनाद्वारे उमेदवार उपलब्ध होईपर्यन्त कंत्राटी तत्वावर नियुक्त्या करण्याबाबतचे आदेश आहेत....कंत्राटी जागांवर पद भरती करिता अशा दोन स्वतंत्र "समित्या" गठीत करण्यात आल्या आहेत," इ. मुळामध्ये आम्ही 93 च्या सूचनेमध्ये म्हटलेले आहे की, कंत्राटी प्राध्यापक हे त्या पदावर अल्पजीवी आहेत. समित्यांच्यां अधिकारामध्ये त्यांच्या नियुक्त्या होतात. हे अध्यापक विद्यार्थ्यांचे शोषण करतात. त्यांच्याकडून पैसे घेतल्याशिवाय ते विद्यार्थ्यांची हजेरी लावत नाहीत, पैसे घेतल्याशिवाय कार्यशाळेतील कामाचे मूल्यांकन करत नाहीत, ते भ्रष्टाचार करता. या संबंधात उत्तर न देता, विद्यार्थ्यांची काही तक्रार नाही, असे सांगितलेले आहे. विद्यार्थ्यांचे भविष्य त्यांच्यावर अवलंबून असते, विद्यार्थ्यांनी तक्रार केली तर त्यांचे आयुष्य हे कंत्राटी प्राध्यापक उद्‌ध्वस्त करतील. अशाप्रकारच्या भ्रष्टाचाराची माहिती आपण घेतलेली आहे काय ? विद्यार्थी तक्रार करण्यासाठी समोर येणार नाहीत.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, शासकीय पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये कंप्लेंट बॉक्सची व्यवस्था केलेली आहे. विद्यार्थ्यांची तक्रार असेल तर ते त्या कंप्लेंट बॉक्समध्ये कंप्लेंट टाकू शकतात. परंतु आतापर्यन्त जालना जिल्ह्यातील शासकीय पॉलिटेक्निक कॉलेज मधून कोणत्याही प्रकारची तक्रार आलेली नाही. पण सन्माननीय सदस्यांनी अधिकची माहिती दिली तर शासन त्याबाबतची पुन्हा चौकशी करेल, त्यामध्ये काही अडचण नाही.

श्री.दिवाकर रावते : कंत्राटी पध्दतीने नेमलेले शिक्षक हे संभाजी नगरमध्ये रहातात. ते रेल्वेने जा-ये करतात. ते वेळेवर कॉलेजमध्ये पोहोचत नाहीत. विद्यार्थी निघून गेल्यानंतर ते येतात, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या हजेरीचा प्रश्न निर्माण होतो. याबाबतची माहिती शासन घेणार आहे काय ?

श्री.सुरेश शेट्टी : या संबंधातील जॉईन्ट डायरेक्टरकडून 15 दिवसामध्ये अहवाल मागवून घेतला जाईल.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, हा गंभीर प्रश्न आहे. पॉलिटेक्निक आणि इंजिनियरींग कॉलेजमध्ये कंत्राटी पध्दतीने सहा महिन्याकरिता प्राध्यापकांना नेमण्याची विद्यापीठ कायद्याप्रमाणे तरतूद आहे.

03-04-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) Y-2

SKK/ MHM/ SBT/ श्री.श्रीकांत जोशी (पुढे सुरु...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

परंतु शासनाने सहा-सहा महिन्यांनी दोन वेळा नेमणुका करण्याबाबतचे आदेश काढलेले आहे. हे आदेश विद्यापीठ कायद्याच्या बाहेर जाऊन काढलेले आहे. विद्यापीठ कायद्याचे व्हायोलेशन केलेले आहे. तशी कायद्यामध्ये दुरुस्ती करणार आहात काय ? कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने प्राध्यापकांच्या नेमणुका करण्याबाबतचा जो शासनाने जीआर काढलेला आहे, तो रद्द करुन विद्यापीठ कायद्यामध्ये सुधारणा करणार आहात काय ? दुसरा प्रश्न असा आहे की, कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने प्राध्यापकांच्या नेमणुका केल्या जातात, त्यांची गुणवत्ता तपासली जाते काय ? विद्यापीठ कायद्याप्रमाणे सहा-सहा महिन्यांनी प्राध्यापकांच्या नेमणुका करता येत नाहीत. कॉन्ट्रक्ट पध्दतीने नेमलेल्या प्राध्यापकांकडून वेगवेळया पध्दतीने विद्यार्थ्यांना हॅरसमेंट करण्याचे, विद्यार्थ्यांकडून पैसे घेण्याचे प्रकार होतात. तसेच रोस्टरचाही विचार केला जात नाही. तेव्हा कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने प्राध्यापकांच्या नेमणुका करण्याची पध्दती कायम स्वरुपात निकाली काढण्याच्या दृष्टीने शासन काय व्यवस्था करणार आहे ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या शेवटच्या प्रश्नाचे उत्तर मी पहिल्यांदा देतो. कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने प्राध्यापकांची नेमणूक करण्यासाठी दोन कमिटया नेमलेल्या आहेत. त्यांच्याकडून प्राध्यापकांचे क्वॉलिफिकेशन इत्यादि गोष्टी तपासूनच त्यांची नेमणूक केली जाते. सन्माननीय सदस्यांची याबाबतीत स्पेसिफिक तक्रार असेल तर त्याची चौकशी केली जाईल. सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, जेवढी शासकीय इंजिनियरींग आणि पॉलिटेक्निक कॉलेजेस आहेत, त्यांच्या स्टाफींग पॅटर्नचा आढावा या समित्या घेत असतात. कोर्टामध्ये याचिका दाखल असल्यामुळे आम्ही या व्हेकन्सी भरु शकलेलो नव्हतो. परंतु आता एम.पी.एस.सी.कडे या जागा भरण्याबाबतचे प्रपोजल दिलेले आहेत. त्यांच्याकडून प्रोसेस सुरु आहे. त्यांची प्रोसेस पूर्ण झाल्यानंतर कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने प्राध्यापकांच्या नेमणुका करण्याचे थांबविण्यात येईल.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, माझ्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर आलेले नाही. यामध्ये ॲक्टचे व्हायोलशेन झालेले आहे. त्याबाबतीत उत्तर आलेले नाही. कायद्यामध्ये जी प्रोव्हीजन आहे त्याबाबतीत उत्तर देण्यात आलेले नाही.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, युनिव्हर्सिटी ॲक्ट तपासून बघू.

**उपसभापती** : यानंतर पुढचे निवेदन घेण्यात येईल.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, यामध्ये ॲक्टचे व्हायोलेशन आहे तरीही उत्तर मिळत नाही हे योग्य नाही.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्याच्या विक्रीकर विभागात कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार उघडकीस येणे.

**मु. शी.** : राज्याच्या विक्रीकर विभागात कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार उघडकीय येणे याबाबत सर्वश्री विनोद तावडे, मधुकर चव्हाण, डॉ. अशोक मोडक, सर्वश्री पांडुरंग फुंडकर व नितीन गडकरी, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, मधुकर चव्हाण, डॉ. अशोक मोडक, सर्वश्री पांडुरंग फुंडकर व नितीन गडकरी, यांनी "राज्याच्या विक्रीकर विभागात कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार उघडकीस येणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, या निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, यातील चारही आरोपींना अटक करण्यात आली असून गुन्हा तपासावर आहे. सदर गुन्ह्यात आतापर्यंत केलेल्या तपासावरुन या गुन्ह्याची व्याप्ती इतर राज्यांशी संबंधित आहे. ही बाब 14 राज्यांशी संबंधित असल्यामुळे आपल्या पोलीस खात्याला या 14 राज्यात चौकशी करुन येणे अवघड आहे. म्हणून आपण ही बाब सी.बी.आय. कडे सोपवणार काय ? ही बाब त्यांच्याकडे सोपवली पाहिजे असे माझे मत आहे. हा अतिशय मोठा भ्रष्टाचार आहे. कोणकोणत्या राज्यामध्ये हे चालते याची यादी आपल्याला वेळेवेळी समजू शकते. यामध्ये 14 राज्ये असतील तर आपल्या खात्याला ते झेपणार नाही. ही बाब आपण सी.बी.आय. कडे देणार काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, 14 राज्यांमध्ये याची व्याप्ती असली तरी आपला जो टॅक्स बुडालेला आहे तो आपल्या राज्याला मिळावा म्हणून तपासणी होणे आवश्यक आहे. यासाठी आपल्या राज्यातील क्राईम ब्रँच, सी.आय.डी., वित्त विभागाचे सेल्स टॅक्सचे अधिकारी यांचे संयुक्त पथक नेमून चौकशी केली जाणार आहे

श्री. मधुकर चव्हाण : आपल्या पोलीस अधिकाऱ्यांनी चौकशी केली त्यामध्ये विक्रीकर खात्यातील आपले अधिकारी किंवा कर्मचारी सहभागी असल्याचे आढळून आले काय ? त्यांना अटक करण्यात आलेली आहे काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : आतापर्यंत 4 लोकांना अटक करण्यात आलेली आहे...

श्री. विनोद तावडे : त्यामध्ये विक्रीकर खात्याचे कर्मचारी आहेत काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सन्माननीय सदस्यांनी माझे पूर्ण उत्तर ऐकून घ्यावे. आतापर्यंत 4 लोकांना अटक करण्यात आलेली आहे. त्यामध्ये खात्याचे कर्मचारी आहेत किंवा नाही यासाठी त्यांची नार्को टेस्ट 12 आणि 13 तारखेला होणार आहे. जी चौकशी चालू आहे त्याबाबत मी सांगत आहे. गुजरात राज्यात चौकशी केलेली आहे. यामध्ये कर्मचारी निष्पन्न झालेले नाहीत. असे असताना सुध्दा या 4 आरोपींची नार्को टेस्ट अॅनॅलिसिस होणार आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, विक्रीकराचे बनावट सी फॉर्म छापून गेली काही वर्षे हा गैरव्यवहार या राज्यामध्ये चालू आहे. हे जे व्यापारी अशा पध्दतीचे खोटे सी फॉर्म छापतात

..4..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

त्यावर शिक्का मारण्याचे काम विक्रीकर विभागामध्ये होते. यामध्ये बड्या व्यापाऱ्यांबरोबर विक्रीकर विभागातील मोठे अधिकारी, कर्मचारी यांचे फार मोठे रॅकेट आहे. बनावट सी फॉर्म ज्या छापखान्यामध्ये छापले गेले त्या छापखान्यापर्यंत याचे धागेदोरे गेलेले आहेत. हे सी फॉर्म छापल्यानंतर जर शिल्लक राहिले तर त्याचीही नोंद करावी लागते. तशी काही नोंद झाली आहे काय ? किती फॉर्म विक्रीकर कार्यालयाला दिले आणि तेवढेच फॉर्म वाटले गेले होते काय ? त्यापेक्षा जे अधिक फॉर्म आले ते कोठून आले ? याबाबतीत माननीय मंत्रिमहोदय माहिती देतील काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, हे सर्व जे सी फॉर्म विकले गेले ते पूर्णपणे बनावट होते. ते गुजरातच्या प्रेसमध्ये छापलेले आहेत. हे सी फॉर्म अधिकृत नव्हते. त्यांनी बनावट सही शिक्के मारुन हे प्रकार केलेले आहेत. हे सी फॉर्म पूर्णपणे बोगस आहेत आणि ते गुजरातच्या प्रेसमधून आलेले आहेत.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. सिध्दाराम म्हेत्रे पुढे सुरु...)

आणि 14 राज्यांमध्ये त्यांचे वाटप झालेले आहे. यामध्ये कोणकोण सामील आहेत याची चौकशी चालू आहे. चौकशीला आरोपी प्रतिसाद देत नसल्यामुळे त्यांची नॉर्को टेस्ट करण्यात येणार आहे. ती टेस्ट झाल्यानंतर त्यानुसार पुढील कारवाई करण्यात येईल.

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.बरवड 16:10

**पृ.शी.** : अमरावती जिल्हयातील मोर्शी तालुक्यातील खेड येथील प्रफुल्ल किसनराव राऊत याचा पोलीस गोळीबारात झालेला मृत्यू

**मु.शी** : अमरावती जिल्हयातील मोर्शी तालुक्यातील खेड येथील प्रफुल्ल किसनराव राऊत याचा पोलीस गोळीबारात झालेला मृत्यू याबाबत सर्वश्री दिवाकर रावते, मधुकर सरपोतदार, अरविंद सावंत, अनंत तरे, डॉ.दीपक सावंत, डॉ.नीलम गो-हे,सर्वश्री विलास अवचट, सुरेश जेथलिया, गोपीकिशन बाजोरिया, ॲड. अनिल परब, प्रा. बी.टी.देशमुख, सर्वश्री. व्ही.यू.डायगव्हाणे, वसंतराव खोटरे, जी.एल.ऐनापुरे, नानासाहेब बोरस्ते, प्रा. शरद पाटील व श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री दिवाकर रावते, मधुकर सरपोतदार, अरविंद सांवंत, अनंत तरे, डॉ. दीपक सावंत, डॉ.नीलम गो-हे, सर्वश्री. विलास अवचट, सुरेश जेथलिया, गोपीकिशन बाजोरिया, ॲड. अनिल परब, प्रा. बी.टी.देशमुख, सर्वश्री.व्ही.यू.डायगव्हाणे, वसंतराव खोटरे, जी.एल.ऐनापुरे, नानासाहेब बोरस्ते, प्रा.शरद पाटील व श्री.जयंत प्र. पाटील वि.प.स. यांनी "अमरावती जिल्हयातील मोर्शी तालुक्यातील खेड येथील प्रफुल्ल किसनराव राऊत याचा पोलिसांच्या गोळीबारात झालेला मृत्यू" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

(प्रेस : येथेसोबतचे निवेदन छापावे.)

...3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : निवेदनामध्ये मंत्री महोदयांना काही सुधारणा करावयाची आहे काय?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : नाही.

श्री. दिवाकर रावते : निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, "डॉ. अनिल बोंडे यांच्या नेतृत्वाखालील जमाव चारघड धरणाचा मुख्य कालवा फोडून धरणाची पूरक भिंत फोडत असताना त्यांना मनाई केली असता..." म्हणजे असत्य बाब या निवेदनाद्वारे या सदनासमोर आलेले आहे. या असत्य माहितीच्या आधारावर पुढील कारवाई केलेली आहे. यामध्ये पोलिसांनी केलेल्या गोळीबारामध्ये एका व्यक्तीचा मृत्यू झालेला आहे...

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : कालवा फोडलेला आहे. त्याचे फोटो देखील आहेत...

श्री. दिवाकर रावते : तो धरणाच्या पलीकडे असलेला नाला आहे...

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : कालवा फोडलेला आहे. मी माननीय सदस्यांना फोटो दाखवितो...

श्री. दिवाकर रावते : धरणाची भिंत फोडण्यात आली काय ? असा मी प्रश्न विचारलेला होता. मंत्रीमहोदयांनी कालवा फोडला असे उत्तर दिलेले आहे. म्हणून सुरुवातीला मी "मंत्री महोदयांना निवेदनामध्ये दुरुस्ती करावयाची आहे काय ?" असा प्रश्न विचारलेला होता. सभापती महोदय, धरण फोडलेले नसताना पोलिसांनी एका माणसाला ठार मारलेले आहे, हा माझा प्रश्न आहे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : मी माननीय सदस्यांना फोटोग्राफ्स दाखवितो.... धरण फोडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, चुकीची माहिती रेकॉर्ड येत आहे. धरण फोडण्याचा कोणीही प्रयत्न केलेला नाही. आम्ही त्याठिकाणी प्रत्यक्ष जाऊन आलो आहोत. धरणाची भिंत फोडण्याचा प्रयत्न झालेला नाही. मंत्री महोदयांनी निवेदनामध्ये दुरुस्ती करावी.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : धरणाचा रॉक-टो फोडण्याचा प्रयत्न झाला....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या ठिकाणी संसदीय पध्दतीने कामकाज चालते, अशा पध्दतीने शासन उत्तर देणार असेल तर राज्याचा कारभार कसा चालेल ? धरणाची भिंत फोडली काय ? असा प्रश्न मी विचारला असताना मंत्री महोदय, याठिकाणी कालव्याचे फोटोग्राफ्स दाखवत आहेत. चुकीच्या माहितीच्या आधारे मंत्री महोदय उत्तर देत आहेत. शेवटी हे सरकार सर्वसामान्य शेतक-यांसाठी आणि जनतेसाठी आहे. माननीय मंत्री महोदयांनी अधिका-यांना पाठिशी घालण्याचे काम कृपा करुन करु नये...

...4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : चुकीचे उत्तर देण्यात आलेले असल्यामुळे हे निवेदन राखून ठेवावे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : धरणाच्या पिचिंगचे रॉक तोडण्याचा प्रयत्न केला जात होता....

श्री. पांडुरंग फुंडकर : निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, "परंतु जमाव चारघड धरणाची भिंत खोदत असताना त्यांना पोलिसांनी रोखण्याचा प्रयत्न केला. परंतु जमाव काही ऐकण्याच्या मन:स्थितीत नव्हता. जमावाने तुफान दगडफेक केली व पोलिसांवर जीवघेणा हल्ला केला. जमावास ध्वनीक्षेपकावरुन वारंवार इशारा देण्यात आला. बळाचा वापर करण्यात येईल असे वारंवार सांगण्यात आले. तरीही जमावावर काहीच परिणाम झाला नाही. जमावाला पांगविण्याकरिता प्रथम अश्रुधुराचा वापर केला. त्यावर जमाव पांगत नसल्याने लाठीचार्जचा इशारा देऊन लाठीचार्ज करण्यात आला. लाठीचार्ज करुनही जमाव पांगण्याच्या परिस्थितीत नव्हता."

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.शिगम 16:15

श्री. पांडुरंग फुंडकर ...

जमावाने पोलीस कर्मचाऱ्यांच्या रायफल हिसकण्याचा प्रयत्न केला. काही लोकांचे हातात पेट्रोल,रॉकेलच्या शिशा होत्या व पोलिसांना जाळा,त्यांचे मुडदे पाडा,वाहने जाळा असे ओरडत होते. सभापती महोदय, असे काहीही घडलेले नाही. मोर्चा काढला होता हे खरे आहे. त्यानंतर तेथून या विभागाचे खासदार आणि आमदार यांनी पाटबंधारे विभागाच्या सचिवांशी चर्चा केली. सचिवांनी असे सांगितले की, या विषयाबाबत आठ दिवसात बैठक घेऊन या प्रश्नातून मार्ग काढू आपण आंदोलन संपवा. त्यानंतर धरणाच्या भिंतीवर समारोपाची सभा चालू झाली. सभा चालू असताना एस.पी.साहेबांची गाडी आली. धरणाच्या खाली 10-12 लोक उभे होते आणि समारोप सुरु होता. वरच्या बाजूला तहसीलदार,एसडीओ उभे होते त्यांना खालच्या बाजूला गोळीबार झाल्याचा आवाज आला म्हणून ते सांगत होते की ,आंदोलन मिटले आहे गोळीबार करु नका,लाठीचार्ज करु नका. सभापती महोदय, जमाव हिंसक झाल्यावर प्रथम अश्रुधूर,नंतर लाठीचार्ज आणि नंतर गोळीबार करतात. याठिकाणी उलटा प्रकार झाला. पहिल्यांदा लाठीचार्ज करुन प्रफुल्ल राऊत या युवकाचा बळी घेतला. त्यानंतर अश्रुधुराची नळकांडी फोडली. ती सुध्दा Out dated झालेली होती. त्यानंतर लाठीचार्ज केला. सभापती महोदय, या सूचनेला जे उत्तर दिलेले ते चुकीचे आहे म्हणून ही सूचना राखून ठेवावी. सत्य निवेदन आले नाहीतर सभागृहाची दिशाभूल होऊ शकते. म्हणून सत्य निवेदन सदनासमोर शासनाने ठेवावे अशी मी विनंती करतो.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या परिसरामध्ये 144 कलम लागू होते. असे असताना सुध्दा डॉ. बोंडे यांनी मोर्चा काढला होता. दुसऱ्या बाजूला मंगेश देशमुख यांनी मोर्चा काढला होता. एका मोर्चेकऱ्यांची अशी मागणी होती की कालव्यातून पाणी सोडा आणि दुसऱ्या मार्चेकऱ्यांची अशी मागणी होती की, नदीतून पाणी सोडा. पोलिसांना दोन्ही बाजूने ऐकून घ्यावे लागत होते. यानंतर परिस्थिती पाहून प्रथम लाठीचार्ज केला,नंतर अश्रुधुराची नळकांडी फोडली आणि परिस्थिती हाताबाहेर जात आहे हे पाहून गोळीबार केला आणि त्यामध्ये एकाचा मृत्यू झालेला आहे.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, 5-10 हजार लोक मोर्चा घेऊन येतात आणि मोर्चामध्ये मागणी करतात की आम्हांला पाणी द्या. पाणी मिळत नाही. सभापती महोदय, 1982 मध्ये या प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता दिलेली होती. हा मध्यम पाटबंधारे प्रकल्प होता तो 13

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख ...

वर्षांनी रद्द करुन शासनाने लघुपाटबंधारे प्रकल्प केला. 4.11.87 रोजी पाटबंधारे विभागाच्या सचिवांची आश्वासन समितीसमोर साक्ष झाली होती. त्यावेळी श्री. देवकुळे हे पाटबंधारे खात्याचे सचिव होते. त्यांनी सांगितले की 1982 मध्ये या प्रकल्पाला मान्यता मिळाली. प्रकल्पाचा अंदाजित खर्च 266 लाख रुपये असून 2775 हेक्टर क्षेत्र भिजणार आहे. यासाठी 10लाखांची तरतूद केलेली आहे. आमच्यासमोर जी टिप्पणी आलेली आहे त्यामध्ये पहिलेच वाक्य असे आहे की चारघड मध्यम यप्रकल्प 266 लाख रुपयांचा असून महाराष्ट्र शासनाकडून प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. ही प्रशासकीय मान्यता देण्यात आल्यानंतर 13 वर्षांनी हा मध्यम प्रकल्प लंबा करुन लघु पाटबंधारे प्रकल्प केला. 6.4.94 रोजी लघुपाटबंधारे प्रकल्प केला. 21 मार्च 1989 च्या गॅझेटनुसार या प्रकल्पामध्ये 17 गावे लाभक्षेत्रामध्ये होती त्यातील 6 गावे वगळून टाकली आहेत. निवेदनामध्ये स्पष्टमध्ये म्हटले आहे की 2775 हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार असून या प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. पाणी उपलब्ध आहे. 6 गावे आता लाभक्षेत्रातून वगळून टाकली आहेत.

यानंतर श्री. खर्चे पी.

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 93 ची निवेदने .......... प्रा. बी.टी.देशमुख .......सुरु.

मध्यम पाटबंधाऱ्याचे रुपांतर लघु पाटबंधारे प्रकल्पात करण्यात आले, तो प्रकल्प पूर्ण झाला. निम्न चारघड या प्रकल्पाच्या प्रशासकीय मान्यतेसाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे. माननीय राज्यपालांच्या निदेशांची अंमलबजावणी झाली असती तर त्यांनाच हे अधिकार आले असते, परंतु येथे तो विषय नसल्याने मी त्या विषयामध्ये जाऊ इच्छित नाही. माझे म्हणणे एवढेच आहे की, मुख्य अभियंता, नागपूर यांच्याकडून यासंबंधीचा प्रशासकीय अहवाल फेब्रुवारी, 2006 मध्ये शासनाला प्राप्त झालेला आहे. माझी अशी मागणी आहे की, या प्रकल्पाला आठ दिवसात प्रशासकीय मान्यता दिली जाणार आहे काय ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, या चारघड प्रकल्पाला नाशिक येथील मुख्य अभियंता, जलविज्ञान प्रकल्प या कार्यालयाकडून पाणी उपलब्धतेचे प्रमाणपत्र मिळणे आवश्यक आहे. मी सदनाच्या माध्यमातून सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, 15 मे, 2006 पर्यंत उशिरात उशिरा पाणी उपलब्धतेचे प्रमाणपत्र मिळविण्यात येईल आणि त्यानंतर 31 ऑगस्ट, 2006 पर्यंत या प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता देण्यात येईल.

प्रा. बी.टी.देशमुख : महोदय, प्रमाणपत्र या ठिकाणी माझ्याकडेच आहे. 2775 चा मध्यम प्रकल्प शासनाने त्यावेळी मंजूर केला होता. म्हणून या प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता लवकरात लवकर दिली जाईल काय ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, 15 मे, 2006 पर्यंत उशिरात उशिरा पाणी उपलब्धतेचे प्रमाणपत्र मिळविण्यात येईल आणि त्यानंतर 31 ऑगस्ट, 2006 पर्यंत या प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता देण्यात येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, यामध्ये मुळ मुद्दा बाजूलाच राहतो. या ठिकाणी जो गोळीबार करण्यात आला त्या गोळीबारामध्ये एक तरुण मृत्युमूखी पडलेला आहे. तसेच त्यासंदर्भात जे निवेदन माननीय मंत्री महोदयांनी दिलेले आहे ते बरोबर नसल्यामुळे हे निवेदन राखून ठेवावे, अशी आमची विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.........2

श्री. दिवाकर रावते : महोदय, पोस्ट मार्टेमच्या रिपोर्टमध्ये सुध्दा असेच सांगितले आहे की, अगदी जवळून गोळी घालण्यात आलेली आहे म्हणून हा युवक मरण पावला. याची लाइव्ह सी.डी. माझ्याकडे आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, आपल्या अध्यक्षतेखाली या ठिकाणी भेट देऊन स्पॉट व्हिजीट करावी त्यामुळे वस्तुस्थिती आपल्या लक्षात येईल व त्यानंतर निर्णय घ्यावा. जेणेकरुन या राज्यामध्ये विविधमंडळाच्या माध्यमातून न्याय मिळू शकतो अशी भावना तयार होईल. कारण या ठिकाणी एका व्यक्तीचा खून झालेला आहे असेच आमचे म्हणणे आहे. अगदी समोरुन गोळी झाडलेली आहे, एस.डी.ओ. सांगत होते की, काहीच करण्याची आवश्यकता नाही, सर्व परिस्थिती शांत आहे तरी सुध्दा ही गोळी झाडण्यात आली आहे. आम्ही आपणास रामशास्त्री प्रभूण्यांच्या जागी मानतो, म्हणून त्यादृष्टीने आपण निर्णय घ्याल अशी आम्हाला अपेक्षा आहे. त्यासाठी हे निवेदन तुर्तास तरी राखून ठेवावे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मागील वेळी सभागृहात यासंबंधीची चर्चा झाली होती त्यावेळी सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी. देशमुख यांनी सांगितले होते की, प्रशासकीय मान्यतेसंबंधीचा विषय हा पाटबंधारे विभागाचा असल्याने त्याला क्लब करुन याचे उत्तर द्यावे.

**उपसभापती** : या निवेदनाच्या अनुषंगाने माननीय मंत्री महोदय, श्री. अजितदादा पवार यांनी उत्तर दिले. तसेच सन्माननीय सदस्यांची देखील इच्छा आहे त्याप्रमाणे मी स्वत: या ठिकाणी भेट देऊन खातरजमा करुन घेईन व जी कार्यवाही करावयाची आहे ती करण्यात येईल. परंतु निवेदन राखून ठेवण्याचा येथे प्रश्न नसल्याने सन्माननीय सदस्यांनी तसा आग्रह करु नये. आपल्याला यासंबंधी जी कार्यवाही अभिप्रेत आहे ती करण्याच्या सूचना देण्यास मी तयार आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, निवेदन राखून ठेवले नाही तर प्रश्न अनुत्तरितच राहतो. सन्माननीय सदस्यांनी या प्रकल्पाच्या प्रशासकीय मान्यतेसंबंधीचा प्रश्न उपस्थित केला आहे. या ठिकाणी मोर्चा निघण्याचे मुख्य कारण म्हणजे या प्रकल्पातून नदीमध्ये पाणी सोडावे.

यानंतर श्री. भारवि .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

प्रकल्पाला मान्यता द्यावी न द्यावी हा नंतरचा विषय आहे. पण तेथे या वर्षी पिण्याच्या पाण्याची टंचाई आहे. आज तेथील खाली असलेली 10 ते 12 गावे तहानलेली आहेत. त्या गावांसाठी त्या प्रकल्पाचे पाणी सोडले पाहिजे ही मागणी घेऊन मोर्चा काढण्यात आला होता. सभापती महोदय, याला पार्श्वभूमी आहे. नागपूर अधिवेशनामध्ये विधानसभेतील दोन सन्माननीय सदस्यांनी त्या विभागातले दोन प्रश्न उपस्थित केले होते. त्यावेळी श्री. अजितदादा पवार यांनी असे उत्तर दिले होत की, "या प्रकल्पातून पाणी सोडण्यासंबंधीचा निर्णय झालेला आहे, लवकरात लवकर आम्ही पाणी सोडू." हे उत्तर डिसेंबर मध्ये दिले होते. जानेवारी, फेब्रुवारी महिना गेल्यानंतर देखील पाणी सोडण्यात आले नाही. म्हणून मोर्चा काढण्यात आला होता. हा मोर्चा पाण्यासाठी काढण्यात आला होता. तरीसुध्दा अजूनही पाणी सोडण्यात आलेले नाही. मंत्रीमहोदयांनी ताबडतोब पाणी सोडले जाईल असे उत्तर दिले होते. त्याची पूर्तता कधी होईल ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी सांगितल्याप्रमाणे हा प्रकल्प मोठा होता. या प्रकल्पातून सुरुवातीची 12 व नंतरची 6 अशी मिळून एकूण 18 गावे ओलिताखाली येणार होती. परंतु नंतरच्या काळात हा प्रकल्प लहान करण्यात आला व 12 गावातील काही क्षेत्र ओलिताखाली आणण्याकरीता हा प्रकल्प घेण्यात आला. राहिलेल्या गावांसंबंधीचे उत्तर मी दिलेले आहे. येथे सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी मुद्दा उपस्थित केला आहे. त्यासंबंधी मी सांगू इच्छितो की, कुठल्याही धरणातून मध्यम किंवा मोठया प्रकल्पामध्ये पाणी आल्यानंतर ते पाणी सिंचनाखाली येणाऱ्या क्षेत्रातील गावांना द्यावे लागते. कालवा फोडून नदीला पाणी द्यावे म्हणजे नदीच्या कडेला असणाऱ्या गावांना पाणी मिळेल, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला. हा प्रकल्प 12 गावांकरीता झाला होता. 12 गावांचे क्षेत्र ओलिताखाली आणण्याकरीता कॅनॉलमधून पाणी द्यावे लागते. सभापती महोदय, आपल्यालाही माहिती आहे की, आपल्या शिरुळ भागामध्ये नदीला पाणी सोडा अशी आग्रही मागणी केली जाते..... परंतु त्या प्रकल्पावर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्याच्या शेतीसाठी पाणी दिले जाते. आपण प्रथम पिण्याच्या पाण्याकरीता अग्रक्रम देतो. नंतर राहिलेले पाणी त्या प्रकल्पाद्वारे जे क्षेत्र सिंचनाखाली येते त्यांना देतो. त्या व्यतिरिक्त पाणी नदीसाठी सोडावे अशी काही सन्माननीय लोकप्रतिनिधींची मागणी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार

होती. मी नागपूरच्या अधिवेशनात उत्तर देताना असे सांगितले होते की, प्रकल्पामध्ये पाणी शिल्लक असेल तर ते पाणी जे लाभार्थी असतील त्यांच्यासाठी सोडण्यात येईल. त्यापध्दतीने आम्ही पाणी सोडलेले आहे. पण जे लाभार्थी नाहीत अशांनी पाणी नदीमध्ये सोडावे अशी मागणी केली होती. ती मान्य होत नसल्यामुळे त्यांनी कॅनॉल फोडलेला आहे.

श्री.दिवाकर रावते : नदीमध्ये पाणी सोडण्याकरीता तेथे एक वेगळा कॅनॉल बांधण्यात आलेला आहे. तसेच लाभार्थींकरीता देखील कॅनॉल बांधण्यात आलेला आहे. ज्यावेळी नदीत पाणी सोडण्यात येते, त्यावेळी लाभार्थींचा कॅनॉल बंद करण्यात येतो. तेथे दरवाजे वगैरे नाहीत. तेथे मातीचा/दगडांचा बंधारा आहे. तेथे फोडण्यासारखे पक्के असे बांधकामच नाही. मातीचा ढिगारा हा जमावाने बाजूला केलेला आहे. नदीमध्ये पाणी सोडण्याची व्यवस्था ही कॅनॉलद्वारे करण्यात आलेली आहे. सभापती महोदय, आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, ज्यावेळी आम्ही गेला होतो त्यावेळी सन्माननीय विरोधी विरोधी पक्षनेते व सन्माननीय सदस्य श्री. साहेबराव तट्टे हे देखील होते. तेव्हा अधिकारी व कलेक्टर म्हणाले होते की, हे पाणी आम्ही सोडू. परंतु, मध्ये पाणी उचलून घेणार नाही याची काळजी कोण घेणार ? त्यावेळेला संबंधित अधिकाऱ्यांनी सांगितले की आम्ही पाणी सोडल्यानंतर मध्ये पंप टाकून पाणी उचलण्याचा जो कोणी प्रयत्न करील त्याचा पंप जप्त करू. त्यासही आम्ही मान्यता दिली. म्हणजे नदीमध्ये पाणी सोडण्याकरीता तेथे व्यवस्था आहे हे मान्य करण्यात आले. आज तेथे पाणी सोडण्याची व्यवस्था आहे आणि त्याच्यापुढे 12 कोल्हापुरी बंधारे आहेत. पण त्यात पाणी नसल्यामुळे ते बंधारे कोरडे पडलेले आहेत. म्हणजे यात जिल्हा परिषदेने आपली जबाबदारी देखील योग्यरितीने पार पाडलेली नाही. त्यामुळे आज तेथे पाण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. आज तेथील 12 केटी वेअर्स् पाण्याअभावी कोरडया अवस्थेत पडलेल्या आहेत. या केटी वेअरमध्ये पाणी साठवले असते आणि ते थोडे थोडे करून सोडले असते तर त्या गावातील लोकांचा पाण्याचा प्रश्न थोडया फार प्रमाणात मिटला असता. त्यामुळे इकडच्या भागातील लोकांनासुध्दा सिंचनासाठी पाणी मिळाले असते. पण आज तेथे काहीच झालेले नाही. त्यामुळे हा महत्त्वाचा प्रश्न निर्माण झालेला आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.भारवि.... 16:30

श्री.अजित पवार : सभापती महोदय, नदीला पाणी सोडले असते तर ज्यांचे आता पीक उभे आहे त्या शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी कमी पडले असते. नदीला पाणी सोडून, त्यांचे भागले नसते आणि कॅनॉलवर ज्यांचे भरणे निघते त्यांचेही भागले नसते. साधारणत: पाणी अधिकचे उपलब्ध असेल तर प्रथम पिण्यासाठी पाणी दिले जाते, नंतर कॅनॉल असलेले क्षेत्र आणि त्यानंतर जर उरलेले पाणी येणाऱ्या पावसाळयापर्यंत शिल्लक राहत असेल आणि तशा प्रकारची आकडेवारी पुढे आली तर ते पाणी वाया जाण्याऐवजी नदीकाठच्या पिण्याच्या पाण्याच्या योजना किंवा नदीकाठी ज्या शेतकऱ्यांनी पाण्याच्या योजना केल्या असतील त्यांना देण्यासाठी विभाग नेहमीच प्रयत्न करीत असतो. अमरावती जिल्हयातील हे काम असल्यामुळे आणि विभागाचे राज्यमंत्री हे त्या जिल्हयाचे पालकमंत्री असल्यामुळे ते स्वत: या साईटवर गेले होते. सर्व परिस्थिती पाहिल्यानंतर त्यांनी मला सांगितले की, पाणी नदीमध्ये सोडले असते तर दुसऱ्या भागातील जे लोक आहेत त्यांच्यामध्ये हक्काचे पाणी मिळत नसल्यामुळे असंतोष निर्माण झाला असता. तसेच त्यातून नवीन प्रश्न निर्माण झाले असते. त्यामुळेच राज्य सरकारला अशा प्रकारची भूमिका घ्यावी लागली. सन्माननीय गृह राज्यमंत्री श्री.सिध्दाराम म्हेत्रे यांनी सांगितले की, प्रथम जमावाकडून कॅनॉलचा भराव फोडण्याचा प्रयत्न झाला, त्याबाबतचे फोटो सुध्दा त्यांच्याकडे आहेत. त्यानंतर जमाव वरच्या दिशेने जावयास निघाला होता. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर आणि सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितले की, तो जमाव वरच्या दिशेने सभेसाठी चालला होता. परंतु ज्यावेळी हा जमाव वरच्या दिशेने जावयास लागला त्यावेळी तेथील अधिकारी वर्गाला असे वाटले की, जमाव धरणावर ॲटॅक करावयास येत आहे. त्यातून पुन्हा नवीन प्रश्न निर्माण होतील, असे वाटल्यावरुन गोळीबार झाला व त्यामध्ये एका शेतकऱ्याचे दु:खद निधन झालेले आहे, ही वस्तुस्थिती आहे.

----------

--2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>नियम 93 च्या निवेदनासंबंधी</u>

**उपसभापती** : यानंतर निवेदन क्रमांक-6 हे सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी उपस्थित केलेल्या नियम-93 अन्वये सूचनेवरील आहे. परंतु ते उपस्थित नसल्यामुळे, आता निवेदन क्रमांक-1 घेण्यात येईल.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



SJB/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.भारवि.... 16:30

**पृ.शी.**: विक्रम पोतदार याचे करण्यात आलेले अपहरण.

**मु.शी.**: विक्रम पोतदार याचे करण्यात आलेले अपहरण याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "विक्रम पोतदार याचे करण्यात आलेले अपहरण" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

:: निवेदन ::

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

: **निवेदनानंतर** :

डॉ.नीलम गोऱ्हे : महोदय, आय.टी. क्षेत्रातून एका विद्यार्थ्याचे अपहरण झाल्यामुळे मी नियम 93 अन्वये सूचना उपस्थित केली होती. महोदय, त्या विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्याचे निवेदनात म्हटलेले आहे. हिंजवडी आणि औंध परिसरातील मुले-मुली शुक्रवार आणि शनिवार या दिवशी प्रवासासाठी निघतात. त्यांच्या निघण्याच्या वेळा निरनिराळया असतात. या परिसरात लोकांना लुटण्याचे प्रकार घडत आहेत. संतोष पाटले या व्यक्तीला गुंगीचे औषध देऊन, त्याच्याकडून 1 लाख 64 हजार रुपये घेऊन, फेकून देण्यात आले असे दिनांक 3 मार्च रोजीच्या तक्रारीवरुन निदर्शनास येते.

खरे म्हणजे या निवेदनाला जे उत्तर देण्यात आलेले आहे ते दु:खद आहे. कारण या घटना काही मर्यादित स्वरुपाच्या नाहीत. त्यामुळे अशा परिसरामध्ये पोलिसांचे मदत कक्ष असणे आवश्यक आहे. हिंजवडी येथे शेकडो माणसे लिफ्टसाठी उभी असतात. त्या ठिकाणी टॅक्सी, बसेस किंवा शेअर टॅक्सी यांची कसल्याही प्रकारची वाहतुकीची व्यवस्था नाही. वाकड, हिंजवडी या ठिकाणी वाहतुकीची व्यवस्था केली तर बरे होईल असे मला वाटते. वाहतुकीच्या साधनासाठी पुणे शहरापर्यंत किंवा औंध पर्यंत न जाता, त्याच परिसरात सहजगत्या वाहतुकीचे साधन उपलब्ध होऊ शकेल यासाठी शासनाने काही संयोजन केले आहे काय ? एशियाड मधून जाणाऱ्यांना याचा फायदा नाही. त्यामुळे त्या परिसरात मदत कक्ष आणि जवळच वाहतुकीची व्यवस्था उपलब्ध होणे आवश्यक आहे. महाराष्ट्र टाईम्स या वर्तमानपत्रामध्ये बातमी आली होती की, एमओपी शाखेमध्ये कर्मचारी वर्ग नसल्यामुळे अशा घटनांचा डाटा बेस होत नाही. त्यामुळे अशा प्रकारची गुन्हेगारी रोखण्याबाबत कार्यवाही होत नाही. म्हणून माझा माननीय मंत्री महोदयांना प्रश्न आहे की, या प्रश्नातून मार्ग काढण्यासाठी शासनाकडून काय पावले उचलण्यात आली आहेत ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, इन्फोसिस आणि त्या परिसरातील हजारो लोक पुणे-मुंबई येथे ये-जा करीत असतात.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिध्दाराम म्हेत्रे ....

सभापती महोदय, त्या ठिकाणी पाच दिवसांचा आठवडा असल्यामुळे मुंबईला येण्यासाठी लगेच गर्दी होते. त्या ठिकाणी शंभर रुपयांमध्ये मुंबईला नेणारे टॅक्सीवाले असतात. कमी पैशामध्ये लवकर जाता येईल या आशेने प्रवासी त्या गाड्यांमध्ये बसतात व त्यामुळे असे प्रकार घडतात. सभापती महोदय, असे प्रकार पुन्हा घडू नयेत म्हणून पोलिसांनी तेथील इन्फोसिसच्या अधिकाऱ्यांची बैठक घेतली आहे. त्याचप्रमाणे परिवहन महामंडळाच्या अधिकाऱ्यांची देखील बैठक घेतली आहे. या लोकांसाठी जादा बसेसची सोय करण्यासंदर्भात शासनातर्फे सूचना दिलेल्या आहेत. त्याचप्रमाणे कोणी लिफ्ट देत असेल तर त्या वाहनांमध्ये कोणीही अशाप्रकारे बसू नये असेही जाहीर पत्रक काढून सांगण्यात आले आहे. एम.एस.आर.डी.सी. आणि इन्फोसिसच्या गाड्या वाढविण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच कंपनीला सुटीच्या दिवशी त्यांच्या कर्मचाऱ्यांना नेण्यासाठी व आणण्यासाठी गाड्या सुरु करण्याबाबत सांगण्यात आले आहे.

डॉ. दीपक सावंत : माननीय मंत्रीमहोदयांनी फक्त गाड्या वाढविण्यात येतील एवढेच उत्तर दिले आहे. सभापती महोदय, हा रस्ता कित्येक कि.मी. निर्मनुष्य असतो. तरी, आपण हाय-वे वर उंच मनोरे बांधून दुर्बिणीने टेहाळणी करणारे पथक मोठ्या प्रमाणात सुरु करणार आहात का ?श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी केलेली सूचना अतिशय चांगली आहे. त्या सूचनेप्रमाणे निश्चितपणे कार्यवाही करण्यात येईल.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, अंमली पदार्थ मिसळून प्रवाशांना फसविण्यात येते. काही महिला प्रवासी त्या गुन्हेगारांचे साथीदार म्हणून काम करत असतात. सभापती महोदय, टोल नाक्याहून कित्येक गाड्या जात असतात. तेथून किती गाड्या पास झाल्या याची नोंद, त्या गाड्यांचे नंबर्स व त्या गाड्यांची तेथून जाण्याची वेळ ही टोलनाक्यावर असतेच. त्या नोंदी जर पोलिसांनी चेक केल्या तर बऱ्याचशा गोष्टींवर प्रकाश पडू शकेल असे मला वाटते. सभापती महोदय, या गाड्या पुन्हा पुन्हा दिसून येत आहेत, त्या गाड्या पांढऱ्या रंगांच्या असतात. सभापती महोदय, असे निदर्शनास येत आहे की, गुन्हेगारच हाय-वे वर पेट्रोलिंग करतात व पुढील टोलनाक्यांवर त्या गाड्या अडवितात. तरी, या प्रकरणात जर आपण नेहमीप्रमाणे यावेळी साध्या वेषातील पोलीसांना पाठविले तर गुन्हेगार निश्चित सापडू शकतील. तरी, आपण याप्रमाणे करणार का ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : होय.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : मल्टी लेव्हल मार्केटिंगमुळे मध्यमवर्गीय व गरीब आर्थिकदृष्ट्या उद्ध्वस्त होणे.

**मु.शी.** : मल्टी लेव्हल मार्केटिंगमुळे मध्यमवर्गीय व गरीब आर्थिकदृष्ट्या उद्ध्वस्त होणे यासंबंधी सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, श्रीमती कांता नलावडे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. मधुकर चव्हाण ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : अध्यक्ष महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" महाराष्ट्रात मल्टी लेव्हल मार्केटिंगचा अत्यंत भयानक व्यवसाय सुरु करुन साखळी पध्दतीने सभासद जमा करुन, त्यांना झटपट श्रीमंत होण्याचे खोटे आमिष दाखवणे, मध्यमवर्गीय व गरीबांसाठी बँकेतील गुंतवणूकीवर मिळणाऱ्या व्याजापेक्षा जास्त व्याज दर देऊन उत्कृष्ट परतावा मिळवून देणारी फसवी योजना बनवून सदर योजनेत गुंतवणूक केल्यास घर बसल्या दामदुप्पट पैसे मिळतील असे फसवे स्वप्न दाखवून हजारो मध्यमवर्गीय व गरीबांना आर्थिक दृष्टया उध्वस्त करुन घोटाळा करणाऱ्या कंपन्या व त्यांचे संचालक-चालक कोटयाधीश होणे, या मायावी योजनेत स्वत:च्या कष्टाची कमाई गुंतवून त्यांच्याकडे काम करणारे लोक व रोज सहभागी होणारे युवक अक्षरश: भिकेला लागणे, तर काहींनी कर्जबाजारी होऊन नाईलाजास्तव आत्महत्या करणे, खोटी माहिती व आमिषे दाखवून गट पाडून चर्चासत्र सुरु केले जाते, या चर्चा सत्रात दरमहा १५ ते २० हजार रुपये कसे सहज मिळतात, हे खोटया माहितीच्या आधारे दाखविणे, या कंपन्यांत सहभागी होताना अनेक इंग्रजी फॉर्मवर सहया घेणे, राज्यातील फसवणूक झालेल्या महिला, पुरुष व युवक इत्यादींना कायद्याची मदत होण्याऐवजी फसवणूक करणारेच कायद्याच्या कचाटयातून सुटणे, या सर्व गंभीर व आर्थिक गुन्हेगारीकडे शासनाचे दुर्लक्ष होणे, नागरिकांची फसवणूक करुन त्यांना आयुष्यातून आर्थिक दृष्टीने उठवणाऱ्या गुन्हेगारांना कठोर शासन करण्याबाबत शासनाने कोणतीही उपाययोजना अंमलात न आणणे, यामुळे जनतेच्या मनात निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना, यावर शासनाची प्रतिक्रिया व शासनाने करावयाची तातडीची उपाययोजना. "

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आपल्या लक्षात येतच असेल की, शासन नागरिकांच्या लुटमारीच्या प्रकरणांकडे अगदी मख्खपणे पाहत आहे. माननीय मंत्रीमहोदयांनी या ठिकाणी अतिशय विस्तृत आणि प्रमाणणिक उत्तर दिल्याबद्दरल प्रथमत: मी त्यांचे अभिनंदन करतो. सभापती महोदय, आपण या ठिकाणी काहीही लपवून ठेवलेले नाही. सभापती महोदय, मल्टी लेव्हलसारख्या अनेक वेगवेगळया कंपन्यांनी राज्यामध्ये धुमाकूळ घातलेला आहे. मध्यमवर्गीयांना, गरीबांना दुप्पट पैसे देतो, 14 ते 20 टक्के व्याज देतो, कार मोफत देतो अशी प्रलोभने दिली जात आहेत. सभापती महोदय, उत्तरामध्येच अशी माहिती देण्यात आलेली आहे की, जवळजवळ 469 कोटी रुपयांची फसवणूक झालेली आहे, 17 लाख 59 हजार नागरिकांची फसवणूक झालेली आहे आणि 295 कोटी रुपये वसूल करण्यात आलेले आहेत. सभापती महोदय, हे सर्व आपण अतिशय प्रामाणिकपणे सांगितले आहे. परंतु शेवटी आपण हताशपणे उत्तर दिले आहे की, महाराष्ट्रातील ठेवीदारांच्या हितसंबंधांचे रक्षण अधिनियम, 1999 माननीय उच्च न्यायालयाने दिनांक 5 सप्टेंबर, 2005 च्या निर्णयानुसार रद्दबातल ठरविले आहे आणि त्याबद्दल आपण सर्वोच्च न्यायालयात देखील गेलेला आहात. या संदर्भात ऑक्टोबर महिन्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिला की, या कायद्याखालील दाखल गुन्ह्यांचा तपास चालू ठेवून ज्या कंपनीची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे, ती तशीच ठेवून पुढील कार्यवाही करण्यास स्थगिती दिलेली आहे. म्हणजे सभापती महोदय, अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही करायची नाही असे आपणाला आदेश देण्यात आलेले आहेत. सभापती महोदय, सदर प्रकरण सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे न्यायप्रविष्ठ आहे.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधु चव्हाण....

लक्षवेधीच्या निवेदनात शेवटी असे म्हटलेले अहो की, "राज्यात मल्टीलेव्हल मार्केटिंगचे फुटलेले पेव व त्यांच्यामार्फत दाखविण्यात येणाऱ्या आकर्षक योजनांना बळी न पडण्याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती पोलिसांमार्फत तसेच वृत्तपत्र व प्रसार माध्यमाद्वारे करण्यात येत आहे. यावर माझा प्रश्न असा आहे की, महाराष्ट्र ठेवीदारांचे (वित्तीय संस्थामधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम जरी रद्द करण्यात आलेला असला तरी यासंदर्भातील अभ्यास करुन फसवणूक करणाऱ्या लोकांवर कडक शिक्षा करण्यासाठी नवीन कायदा करण्यात येणार आहे काय ? तसेच यासंदर्भात वेगवेगळया जाहिराती देण्यात येतात. फुकट मिळेल, दामदुप्पट मिळेल, अशा प्रकारच्या जाहिराती करण्यात येतात या जाहिरातीं पाहून मध्यमवर्गीय लोक मोठया प्रमाणात फसतात. अशा ज्या कंपन्या आहेत त्यांच्याकडून काही प्रमाणात पैसा व मालमत्तेतून 295 कोटी रुपये वसूल केलेली आहे त्या पैशातून जे लोक फसविले गेलेले आहेत त्यांना त्यांचा पैसा परत करणार आहात काय ? तसेच या संदर्भात नवीन असा कठोर कायदा करण्यात येईल काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, महाराष्ट्र ठेवीदारांचे (वित्तीय संस्थामधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम 1999 माननीय उच्च न्यायालयाने रद्द केलेला आहे. सदर निर्णयाविरुध्द सर्वोच्च न्यायालयात शासनातर्फे तातडीने अपील करण्यात आलेले आहे. यासंदर्भात न्यायालयाने "जैसे थे " चे आदेश दिलेले आहेत, त्यामुळे पुढील कार्यवाही (विक्री/विल्हेवाट) करण्यास स्थगिती दिलेली आहे. नागरिकांच्या ठेवींचे हितरक्षण करण्याकरीता कायदा करण्याची मागणी सन्माननीय सदस्यांनी केलेली आहे त्यासंदर्भात दिनांक 23.1.2006 रोजी असा नवीन कायदा करण्याबात केंद्र शासनाकडे विनंती केलेली आहे. सध्याच्या कायद्यातील तरतुदीप्रमाणे यासंदर्भात कार्यवाही सुरु आहे. त्यानुसार दोषींवर कडक कारवाई करण्यात येत आहे. संबंधित कंपन्याकडून 295 कोटी रुपये वसूल केलेले आहे त्यांचे वाटप करणार काय याबाबत माननीय न्यायालयाचे आदेश आल्यानंतर त्यासंदर्भातील निर्णय घेण्यात येईल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, यासंदर्भात माझा प्रश्न असा आहे की, अशा प्रकारच्या फसव्या जाहिराती ज्या वृत्तपत्रातून देण्यात येतात, त्या जाहिरात देणाऱ्या कंपन्या व वर्तमानपत्रावर शासनाकडून सुमोटो कारवाई करण्यात येईल काय ? तसे शासनाला करता येईल काय ? यासंदर्भात शासन काही प्रतिबंध करणार आहे काय ? ......2....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, अशा प्रकरणाबाबत शासनाला प्रतिबंध करावयाचा आहे. परंतु जनतेने किती वेळा फसावे हे सुध्दा ठरवायला पाहिजे, जाहिरातदारांचा यामध्ये दोष आहे "दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहिए " अशा प्रकारे फसवेगिरी करणाऱ्याविरुध्द शासनाकडून कठोर कारवाई करण्यात येईल.

श्री. मधु चव्हाण : सभापती महोदय, पिनॅकल कंपनी या आरोपामध्ये पकडण्यात आलेली आहे. परंतु आताच मंत्री महोदयांनी सांगितले की, "दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहिए " त्याप्रमाणे एवढे मोठे बलाढय शासन या कंपन्यासमोर झुकणार आहे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, शासन झुकणार नाही.

----------------

यानंतर श्री. सुंबरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : परभणी जिल्ह्यातील शासनमान्य खाजगी अनुदानित प्राथमिक शाळांची वेतन देयके जि.प.प्राथमिक विभागाने रोखणे.

**मु. शी.** : परभणी जिल्ह्यातील शासनमान्य खाजगी अनुदानित प्राथमिक शाळांची वेतन देयके जि.प.प्राथमिक विभागाने रोखणे यासंबंधी प्रा.फौजिया खान, सर्वश्री रणजितसिंह मोहिते-पाटील, जितेंद्र आव्हाड, विनायकराव मेटे, सदाशिवराव पोळ, लक्ष्मण जगताप, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

प्रा. फौजिया खान (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" परभणी जिल्ह्यातील 28 अनुदानित व 18 अंशत: अनुदानित अशा 46 शासनमान्य खाजगी प्राथमिक शाळांची जानेवारी 2006 या महिन्याची वेतन देयके जिल्हा परिषदेच्या प्राथमिक विभागाने रोखलेली असणे, यापैकी काही शाळा स्वातंत्र्यपूर्व काळातील तर काही शाळा महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपूर्वीपासून कार्यरत असणे, सदरील शाळांची वेतन देयके इतक्या प्रदीर्घ कालावधी नंतर रोखण्याच्या कारणाचे कसलेही स्पष्टीकरण संबंधितांकडून देण्यात येत नसणे, परिणामी हतबल झालेल्या शिक्षकांच्या कुटुंबियांवर आलेली उपासमारीची पाळी, त्यांच्यात पसरलेले नैराश्य आणि संतापाची भावना, या बाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

प्रा. वसंत पुरके ( शालेय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या आहेत, त्या निवेदनामध्ये मला थोडीशी दुरूस्ती करावयाची आहे. निवेदनातील खालून तिसऱ्या ओळीमध्ये 'उक्त 46 प्राथमिक शाळांची' या ऐवजी "उक्त 46 पैकी 40 प्राथमिक शाळांची" असे शब्द वाचावेत तसेच शेवटी 'उर्वरित 6 प्राथमिक शाळांनी देयके सादर केलेली नाहीत' असे वाक्य वाचावे. याप्रमाणे निवेदन दुरूस्त करून मी आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

........ एचएच 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( लक्षवेधी सुचनेवरील शालेय शिक्षण मंत्र्यांच्या निवेदनानंतर .... )

प्रा. फौजिया खान : सभापति महोदय, इस लक्षवेधी सूचना के निवेदन में यह लिखा है कि शिक्षा अधिकारी ने संबंधित स्कूलों को पत्र लिखा कर पूछा था कि आपके स्कूलों को शासन मान्यता आदेश एवं स्कूलों को विभाग की मान्यता कब मिली थी तथा स्कूलों को अनुदान दिए जाने संबंधी आदेश के कागजात शिक्षा अधिकारी के कार्यालय में प्रस्तुत किए जाए. मैं यह पूछना चाहती हूं कि जो स्कूल 50-55 साल पहले से चलाए जा रहे हैं और महाराष्ट्र राज्य बनने से पहले से चलाए जा रहे हैं, वे स्कूल महाराष्ट्र शासन की मान्यता कहां से लेकर आएंगे ? शासन की नीति के अनुसार जो स्कूल पहले ही नियमित हो चुके हैं, ऐसे स्कूलों के चालकों को परेशान करने के पीछे शिक्षा अधिकारी का क्या उद्देश्य है ? क्या ये शिक्षा अधिकारी सुमोटो शिक्षकों की सेलेरी रोक सकते हैं ?  दूसरी बात यह है कि शिक्षा विभाग यह कह रहा है कि अनुदान अधीक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधि पथक ने वेतन वितरीत नहीं किया. दूसरी तरफ यह कहा गया है कि कुछ स्कूलों ने आवश्यक कागजात समय पर प्रस्तुत नहीं किए इसलिए उन स्कूलों के संच निर्धारण समय पर नहीं हुए. यानी एक दूसरे पर ब्लेम किया जा रहा है. लेकिन मैं यह जानना चाहती हूं कि देरी करने के पीछे क्या इन्टेन्शन है ? मेरा दूसरा प्रश्न यह है कि 18 स्कूल 60 प्रतिशत अनुदान प्राप्त करने के लिए पात्र है लेकिन शिक्षा अधिकारी ने आज तक कोई उचित कार्यवाही नहीं की है. ऐसे शिक्षा अधिकारी एवं अनुदान अधीक्षक के खिलाफ ढेरों शिकायतें की गई हैं. लेकिन उनके खिलाफ कोई कार्रवाई नहीं की गई है. मैं यह पूछना चाहती हूं कि शासन उनके खिलाफ कार्रवाई करेगा या नहीं करेगा ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, ही जबाबदारी सरकारची आहे हे खरे आहे. परंतु आमच्या अधिकाऱ्यांकडून याबाबतीत जो विलंब झालेला आहे तो निश्चितच क्षम्य नाही. याबाबतीत मी आपल्याला असे सांगू इच्छितो की, काही 40 संस्थांकडून प्रमाणपत्रे इ. डॉक्युमेंटस् प्राप्त व्हायची होती त्यामुळे हा विलंब झालेला आहे. असे असले तरी, याबाबत कागदपत्रांची पूर्तता झाली नसली तरी ज्या संस्थांची वेतन देयके सादर झाली होती त्यांची वेतन देयके निश्चितपणे मान्य केली जातील आणि उर्वरित 6 शाळांना देखील यासाठी निश्चितपणे वेळ दिला जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

......3

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, या संदर्भात संबंधित अधिकाऱ्याबद्दल जिल्हा परिषदेच्या सभेमध्ये देखील सगळ्याच सदस्यांनी तक्रारी केल्या होत्या आणि त्यांना परत पाठविण्यात यावे असे सांगितले होते. या संदर्भात मी स्वत:चा अनुभव सांगतो. या शाळांचे प्रस्ताव पाठवा म्हणून सातत्याने सांगूनही हे अधिकारी प्रस्ताव पाठवित नव्हते. तेव्हा अशा निष्क्रीय अधिकाऱ्यावर सरकार कडक कारवाई करणार आहे काय ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, वेतन देयक अधीक्षक आणि वेतन अधिकारी यांच्यामध्ये सुसंवाद नव्हता त्यामुळे हा विलंब झालेला आहे. याबाबतीत योग्य ती चौकशी करून, विभागीय चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, परभणी जिल्हा परिषदेतील हा जो शिक्षण अधिकारी आहे त्याचे नाव श्री.काळे असे आहे. या जिल्हा परिषदेची 24.3.2006 रोजी जी सर्वसाधारण सभा झ ाली त्या सभेमध्ये सर्वच सदस्यांनी श्री.काळे यांना सक्तीच्या रजेवर पाठवा अशी एकमुखी मागणी केलेली आहे ही गोष्ट खरी आहे काय ? तसेच या अधिकाऱ्याबद्दल अनेक तक्रारी आहेत तेव्हा त्याबद्दल त्यांना ताबडतोब निलंबित करण्याची आपण घोषणा कराल का ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, या बाबत अतिशय कडक कारवाई केली जाईल असे अभिवचन मी आपल्याला देतो.

श्रीमती सुधा जोशी : या अधिकाऱ्याकडून ज्या प्रकारे हरॅसमेंट केली जाते आहे त्याबद्दल किती दिवसात कडक कारवाई आपण करणार आहात ? कडक कारवाई म्हणजे नेमकी काय कारवाई आपण करणार आहात ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, या बाबत त्वरित 8 दिवसात चौकशी करून कडक कारवाई केली जाईल.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना लावल्यानंतर या शाळांची वेतन देयके अदा करण्याबाबतची कारवाई झालेली आहे असे या निवेदनावरून दिसून येते आहे. ..

यानंतर श्री सरफरे..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख...

प्रश्न असा आहे की, वेतन पथक आणि त्यांच्या अधीक्षकांनी आपले काम नीट व वेळेवर केले पाहिजे. पहिल्यांदा त्यांची काय व्यवस्था करतात हे या ठिकाणी सांगितले पाहिजे. बाकीची तुमची कारकूनी तुम्ही अखंडपणे चालू ठेवा. परंतु हे काम नीट झाले पाहिजे. म्हणून माझे असे म्हणणे आहे की, ही व्यवस्था नीट चालली पाहिजे, हे काम त्यांनी पहिल्यांदा केले पाहिजे. यासाठी आपण त्यांना सक्त आदेश दिले पाहिजेत. आणि हे काम ज्यांनी बंद केले आहे त्यांच्यावर आपण कारवाई केली पाहिजे, ती आपण करणार काय?

प्रा. वसंत पुरके : शिक्षकांचे वेतन वेळच्या वेळी मिळणे व ते मिळवून देणे ही शासनाची मूलभूत जबाबदारी आहे. या संदर्भामध्ये जे दोषी असतील आणि ज्यांच्यामुळे विलंब झाला असेल त्यांना निलंबित केले जाईल.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : कनिष्ठ व वरीष्ठ महाविद्यालयातील ओ.बी.सी. विद्यार्थ्यांकरीता "फी माफी" व "शिष्यवृत्ती" बाबत शासनाने दिलेले स्थगिती आदेश

मु.शी. : कनिष्ठ व वरीष्ठ महाविद्यालयातील ओ.बी.सी. विद्यार्थ्यांकरीता "फी माफी" व "शिष्यवृत्ती" बाबत शासनाने दिलेल्या स्थगिती आदेशासंबंधी सर्वश्री सुधाकर गणगणे,प्रा. जोगेंद्र कवाडे, श्री.वसंतराव खोटरे, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री. व्हि.यू. डायगव्हाणे, पांडुरंग फुंडकर, जयंत प्र.पाटील, रमेश निकोसे, नतिकोद्दीन खतिब,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. सुधाकर गणगणे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे. अशी विनंती करतो.

"राज्यात ओ.बी.सी. च्या विद्यार्थ्यांना सन २००३-०४ या शैक्षणिक वर्षापासून भारत सरकार पुरस्कृत मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना शासकीय व अनुदानित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना लागू करणे, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षणासाठी ओ.बी.सी. करीता 'फी माफी' व 'शिष्यवृत्ती' बाबत शासनाने अचानक स्थगितीचे आदेश देणे, यामुळे शैक्षणिक वर्षाअखेर सदरहू फीची रक्कम भरणा केल्याशिवाय इतर मागासवर्गीय गरीब विद्यार्थ्यांना परिक्षेला बसता न येणे, शासकीय कार्यवेळेमध्ये आपल्याच काळात शासनाने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि ओ.बी.सी. या तिन्ही प्रवर्गातील अनुदानित व विनाअनुदानित संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना 'फी माफी' आणि 'शिष्यवृत्ती' देण्याचा घेतलेला निर्णय, सदर निर्णयाला शासनाने दिलेल्या स्थगितीमुळे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि ओ.बी.सी. या तिन्ही प्रवर्गातील विद्यार्थ्यांची व त्यांच्या पालकांची झालेली उपेक्षा, मागील दोन विधिमंडळ अधिवेशनात शासनाने एका महिन्याच्या आत आश्वासनपूर्ती करण्याचे मान्य करुनही त्यावर कार्यवाही न करणे व त्या संबंधीची कोणतीही वचनपूर्ती न करणे, सदर बाब अत्यंत गंभीर असल्यामुळे राज्यातील ओ.बी.सी. विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष व त्याच्यावर झालेल्या अन्यायाबाबत शासनाची भुमिका. "

----३

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धर्मरावबाबा आत्राम (सामाजिक न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यांत आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, या एकाच विषयावरील लक्षवेधी सूचना तिसऱ्यांदा सभागृहामध्ये मांडण्यात आली आहे. ओ.बी. सी. च्या विद्यार्थ्यांचा गंभीर विषय राज्य शासनाने अजून सोडविलेला नाही. मागील अधिवेशनामध्ये माननीय सभापतींनी निदेश दिले होते की, हा प्रश्न शासनाने एक महिन्याच्या आत निकालात काढावा. शासनाने त्यावेळी सदनाला आश्वासित केले होते. मागील अधिवेशन संपून चार महिने होऊन गेले तरीसुध्दा हा प्रश्न निकालात काढला गेला नाही. विना अनुदानित तत्वावरील जेवढी महाविद्यालये आहेत त्यामध्ये शिकणाऱ्या ओ.बी.सी. च्या विद्यार्थ्यांवर अन्याय होत आहे. शासनाने आपल्या निवेदनामध्ये प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे व लवकरात लवकर हा प्रश्न सोडविण्यात येईल असे म्हटले आहे. सभापती महोदय, आपण दिलेल्या निदेशाप्रमाणे शासनाने एक महिन्यात हा प्रश्न सोडविणे आवश्यक होते. तेव्हा हे अधिवेशन संपण्यापूर्वी हा प्रश्न शासन सोडविणार आहे काय, याचा खुलासा करण्यात यावा.

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, हा अत्यंत गंभीर विषय आहे. त्यामुळे या विषयाचा प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे आणण्यासंबंधी त्यावेळी सांगितले होते. लवकरात लवकर हा प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे ठेवण्यात येईल.

(गोंधळ)

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, चार महिन्यापूर्वी शासनाने हेच उत्तर दिले होते...

(गोंधळ)

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, आपण चेअरवरुन दिलेल्या निदेशाचा हा अवमान आहे...

(गोंधळ)

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मागील चार अधिवेशनापासून ही लक्षवेधी सूचना सातत्याने देण्यात येत आहे. हा महाराष्ट्रातील लाखो विद्यार्थ्यांचा प्रश्न आहे. ओ.बी.सी. च्या जीवावर राज्य करणाऱ्या सरकारकडून दर अधिवेशनाला हेच उत्तर मिळणार असेल तर हा त्या समाजाचा अपमान आहे. सभापती महोदय, आपण मागील कार्यवाही तपासून पाहिल्यास चार लक्षवेधी सूचनांना दिलेले उत्तर सारखे आहे. त्यामध्ये एक अक्षर सुध्दा बदललेला नाही. प्रत्येक वेळी मंत्रिमहोदयांनी प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे ठेऊ असे उत्तर दिले आहे. गेल्या वर्षभरामध्ये

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

DGS/MHM/SBT) 4.50

श्री. पांडुरंग फुंडकर...

मंत्रिमंडळाच्या 30 ते 40 बैठका झाल्या. त्यापैकी कोणत्याही बैठकीमध्ये आपण हा विषय कां ठेवला नाही? हा प्रस्ताव आपण किती दिवस विचाराधीन ठेवणार आहात? या राज्यातील ओ.बी.सी. च्या विद्यार्थ्यांवर आपण किती दिवस अन्याय करणार आहात? त्यांना शिक्षणापासून किती दिवस वंचित ठेवणार आहात. सभापती महोदय, आपण मागील अधिवेशनामध्ये निदेश देऊन सुध्दा शासनाने निर्णय घेतला नाही. तेव्हा आपल्याकडून मला संरक्षण पाहिजे की, या सभागृहाच्या माध्यमातून राज्यातील ओ.बी.सी. च्या विद्यार्थ्यांना न्याय मिळाला पाहिजे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.सरफरे... 16:55

श्री.पांडुरंग फुंडकर (पुढे सुरु...

माझी विनंती आहे की, शासनाला हे सत्र संपण्यापूर्वी निर्णय घेण्यासंबंधात आपण निर्देश द्यावेत.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, माझी विनंती अशी आहे की, सन्माननीय विरोधी पक्ष नेते यांनी सदनाला माहिती दिली की, एकदा नव्हे तर चार वेळा ही लक्षवेधी सूचना सभागृहात चर्चेला आलेली आहे. मागच्या अधिवेशनामध्ये सभापती महोदय,आपण आपल्या आसनावरुन शासनाला या विषयाच्या संदर्भात निर्देश दिलेले होते, त्याचे शासनाने पालन केलेले नाही. याचा त्यांना जाब विचारला गेला पाहिजे. आपण दिलेल्या निर्देशाचे शासनाने पालन का केले नाही ? याचा जाब आपण विचारावा अशी विनंती आहे.

...(अडथळा)....

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मागच्या अधिवेशनामध्ये आपल्या आसनावरुन आपण एक महिन्या आत याचा निकाल लागला पाहिजे,अशाप्रकारचे निर्देश शासनाला दिले होते.

श्री.सुधाकर गणगणे : हा प्रश्न निकालात निघाला पाहिजे.

श्री.धर्मरावबाबा आत्राम : हा प्रश्न लवकर निकाली काढण्याच्या दृष्टीने प्रयत्न केला जाईल.

**उपसभापती** : सभागृहामध्ये हा प्रश्न चारवेळा चर्चेला आलेला आहे.

श्री.सुधाकर गणगणे : दोन वेळा आपण या संबंधाने शासनाला निर्देश दिलेले आहेत.

**उपसभापती** : मला असे वाटते की, राज्यातील संवेदनशील अशा प्रश्नाच्याबाबतीत शासनाने अद्यापपर्यन्त निर्णय न घेणे, हे उचित नाही. हे अधिवेशन संपण्याच्या अगोदर कॅबीनेटमध्ये या विषयाच्या संबंधात निर्णय घेऊन या विषयाला योग्य तो न्याय द्यावा आणि तशाप्रकारचे निवेदन शासनाच्या वतीने या ठिकाणी करावे, असे निर्देश देतो. या सूचनेला जोडूनच सर्वार्थाने विचार ठेवतो की, सन्माननीय सदस्यांनी इकॉनॉमिक बॅकवर्ड क्लासच्याबाबतीत रास्त भूमिका मांडलेली आहे. इकॉनॉमिक बॅकवर्डची संज्ञेप्रमाणे मुलांना सवलत न मिळाल्यामुळे ती त्यापासून वंचित रहातात. मी स्वत: ई.बी.सी.ची सवलत घेऊन शिकलेला विद्यार्थी आहे. कै.बाळासाहेब देसाई शिक्षण मंत्री असतांना, त्यांनी ई.बी.सी.ची सवलत लागू केलेली होती. आता आर्थिक उत्पन्नामध्ये बराच फरक झालेला आहे. ही योजना प्रभावीपणे राबविण्याचा शासनाने निश्चितपणे प्रयत्न करावा, अशाप्रकारची मी सूचना करतो.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

**पृ. शी.** : वाडा तालुक्यातील कुडूस या गावामध्ये कोकाकोला कंपनीने दररोज लाखो लिटर पाणी त्यांच्या उत्पादनाच्या बाटल्या धुण्यासाठी वापरणे.

**मु. शी** : वाडा तालुक्यातील कुडूस या गावामध्ये कोकाकोला कंपनीने दररोज लाखो लिटर पाणी त्यांच्या उत्पादनाच्या बाटल्या धुण्यासाठी वापरणे, यासंबंधी श्री.अनंत तरे, डॉ.नीलम गोऱ्हे वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(माननीय सदस्य अनुपस्थित)

**उपसभापती** : हा ठाणे जिल्ह्यातील प्रश्न आहे. लक्षवेधी सूचना उपस्थित करणारे सन्माननीय सदस्य उपस्थित नसले तरी मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, त्यांनी या विषयाची सविस्तर माहिती दिली तर बरे होईल.

यानंतर श्री.बरवड.....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( काही सन्माननीय सदस्य बसून बोलण्याचा प्रयत्न करतात )

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांना सांगू इच्छितो की, त्यांनी सन्माननीय सदस्यांबद्दल हेत्वारोप करु नये. अशा प्रकारचे आरोप आपल्यावर सुध्दा होण्याची शक्यता असते.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरे व सन्माननीय सदस्य डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी नियम 101 अन्वये जी लक्षवेधी सूचना दिली आहे त्याबद्दल मला शासनाच्या वतीने एवढेच सांगावयाचे आहे की, ज्या वाडा को.प. बंधाऱ्यातून कोकाकोला कंपनी पाणी उचलते त्या कोकाकोला कंपनीला येणारा पावसाळा सुरु होईपर्यंत जेवढे पाणी लागणार आहे तेवढे पाणी त्यांनी उचलून देखील आपल्याला त्या ठिकाणी पाणी उपलब्ध आहे आणि त्यामुळे त्या भागातील गावातील पिण्याच्या पाण्याच्या योजनांवर परिणाम होऊ शकत नाही. त्या ठिकाणी कोणतीही अडचण नाही. त्यांना जेवढा वार्षिक पाणी वापर मंजूर केलेला आहे ते सगळे पाणी त्यांनी उचलले तरी देखील जवळपास 0.78 दशलक्ष घनमीटर पाणी त्या ठिकाणी उपलब्ध आहे. ते पाणी त्या भागातील सर्व पिण्याच्या पाण्याच्या योजनांकरिता किंवा शेतकरी बांधवांकरिता देऊ शकतो.

-----

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP

**पृ. शी.** : पाथर्डी, जिल्हा अहमदनगर येथील स्व. वसंतरावजी नाईक यांच्या पुतळ्याभोवती करण्यात आलेले अतिक्रमण.

**मु. शी.** : पाथर्डी, जिल्हा अहमदनगर येथील स्व. वसंतरावजी नाईक यांच्या पुतळ्याभोवती करण्यात आलेले अतिक्रमण यासंबंधी श्री. धोंडीराम राठोड, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. धोंडीराम राठोड ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्याच्या हरितक्रांतीचे जनक व माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतरावजी नाईक यांच्या हयातीत माननीय श्री. बबनरावजी ढाकणे यांनी त्यांचे जन्मगावी मौजे पाथर्डी, जिल्हा अहमदनगर येथे स्वर्गीय वसंतराव नाईक यांचा पूर्णाकृती पुतळा उभा करुन त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात येणे, सदर पुतळयाभोवती पाथर्डी येथील काही गाव गुंडांनी व धनदांडग्यांनी अतिक्रमण करुन तेथे वेगवेगळया प्रकारची दुकाने टाकून व्यवसाय सुरु करुन सदर स्मारकाचे विद्रुपीकरण करण्यात येणे, सदर अतिक्रमण हटविण्याबाबत तेथील लोकांनी संबंधित तहसिलदार व जिल्हाधिकारी यांना वारंवार लेखी निवेदने देऊन, उपोषण करुन तसेच मोर्चे काढून निषेध व्यक्त करुन न्याय मागणे, शासकीय यंत्रणा सदर अतिक्रमण हटविण्याबाबत उदासीन असणे, पर्यायाने जनसामान्यात तीव्र असंतोष पसरुन तो केव्हाही उफाळून येऊन दंगल होण्याची निर्माण झालेली परिस्थिती, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. राजेश टोपे ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धोंडीराम राठोड : सभापती महोदय, अत्यंत महत्वाच्या प्रश्नाकडे मी आपले आणि सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. हरितक्रांतीचे जनक आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, जे एक तप या महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदावर होते त्या स्व. वसंतरावजी नाईक यांच्या कार्याचा गौरव त्यांच्या हयातीमध्ये व्हावा, त्यांच्या जिवंतपणी त्यांच्या कार्याचा गौरव व्हावा म्हणून श्री. बबनराव ढाकणे यांनी पाथर्डी येथे 1976 साली स्व. वसंतरावजी नाईक यांचा पुतळा उभा केला. ज्यावेळी पुतळा उभा केला त्यावेळी ती शासकीय जागा होती. पुतळा उभा केला त्यावेळी त्या ठिकाणी ग्रामपंचायत होती. आता त्या ठिकाणी नगरपालिका झालेली आहे. त्या नगरपालिकेने या पुतळ्याच्या भोवती पाच फुटापर्यंत अतिक्रमण केलेले आहे. त्या ठिकाणी 5 फुटापर्यंत अतिक्रमण करण्याची परवानगी त्या नगरपालिकेच्या मुख्याधिकारी श्रीमती पास्तीया मॅडम यांनी दिलेली आहे. लोकांनी तहसिलदार, पाथर्डी यांच्याकडे 15.12.2005 रोजी निवेदन दिले. तहसिलदारांनी मुख्याधिकाऱ्यांना उपाहारगृहाचे बांधकाम करु नये अशी सूचना 19 तारखेला दिली. तहसिलदार, पाथर्डी यांनी 20 तारखेला बैठक बोलविण्याचे जाहीर केले. 20 तारखेला त्यांनी बैठक घेतली. त्या बैठकीमध्ये सुध्दा त्या ठिकाणी उपाहारगृह बांधू नये अशी सूचना देण्यात आली. 20 तारखेला झालेल्या त्या बैठकीत सर्वपक्षीय लोकांना आश्वासन देण्यात आले की, त्या ठिकाणी उपाहारगृह बांधले जाणार नाही. परंतु कोणतीही परवानगी न घेता, सिटीसर्व्हे विभागाकडून तांत्रिक मंजुरी न घेता त्या ठिकाणी एक उपाहारगृह बांधण्यासाठी मुख्याधिकारी मॅडम यांनी परवानगी दिली. त्याचे उद्‌घाटन करु नये असे पत्र तहसिलदारांनी दिलेले असताना त्या पत्राला केराची टोपली दाखविण्यात आली. त्या मुख्याधिकारी मॅडमनी त्या ठिकाणी संघटनेशी अर्थपूर्ण व्यवहार करुन ते उपाहारगृह त्या ठिकाणी थाटलेले आहे. त्या वादग्रस्त वास्तूच्या बांधकामामुळे त्या पुतळ्याचे विडंबन होण्याची, त्या पुतळ्याचे विद्रुपीकरण होण्याची शक्यता आहे. पुतळ्यापासून पाच फुटावर टपरी, चहाचे दुकान टाकलेले आहे. चहाच्या कपबशा धुतल्यानंतर ते पाणी पुतळ्याकडे फेकले जाते. म्हणजेच ते पाणी स्व. वसंतरावजी नाईक यांच्याकडे फेकले जाते. एवढी वाईट अवस्था त्या ठिकाणी निर्माण झाली आहे. प्रांत अधिकाऱ्यांनी त्या ठिकाणी बैठक बोलावली. त्या बैठकीमध्ये सुध्दा चर्चा झाली आणि सगळ्यांना आश्वासन दिल्यानंतर सुध्दा त्या पुतळ्याभोवती असणारे जे अतिक्रमण आहे ते

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धोंडीराम राठोड .....

दिवसेंदिवस वाढतच आहे. पूर्वी त्या ठिकाणी तीन उपाहारगृहे होती. आता त्या ठिकाणी चौथे उपाहारगृह बांधले आहे. या ठिकाणी निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, तीन उपाहारगृहांचा प्रश्न न्यायप्रविष्ट आहे. अगोदर उपाहारगृह बांधण्यासाठी परवानगी द्यावयाची, त्यांना बेकायदेशीरपणे मदत करावयाची आणि उपाहारगृह बांधून झाल्यानंतर आपणच त्यांना कोर्टात पाठवावयाचे आणि प्रकरण न्यायप्रविष्ट आहे असे उत्तर देऊन शासन स्वत:ला धन्य समजते काय ?

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. धोंडीराम राठोड....

म्हणून माझे दोन-तीन स्पेसिफिक प्रश्न आहेत. हे उपाहारगृह बांधण्यासाठी ज्यांनी परवानगी दिली त्या पास्तीया या महिला अधिका-यांना आपण निलंबित करणार काय ? त्याठिकाणी 4 उपाहारगृहे बांधलेली आहेत. ही 4 अतिक्रमणे आपण ताबडतोबीने हटविणार आहात काय ? हे बेकायदा बांधकाम करणा-यां विरुध्द आणि असे बांधकाम करण्यास परवानगी देणा-या अधिका-यांविरुध्द आपण कठोर कारवाई करणार आहात काय ? प्रत्येक वृत्तपत्रातून याबाबत छापून आलेले आहे. तसेच एसआरपी आणि शिरस्त्राण धारण केलेल्या पोलिसांना बोलावण्याइतपत परिस्थिती हाताबाहेर गेली होती आणि तरी देखील शासन याकडे गांभीर्याने पाहात नाही. तेव्हा हे अतिक्रमण शासन किती दिवसात काढणार आहे ?

श्री. राजेश टोपे : माननीय सदस्य श्री. धोंडीराम राठोड यांनी पाथर्डी शहरातील महत्वाचा प्रश्न या लक्षवेधीच्या माध्यमातून याठिकाणी उपस्थित केलेला आहे. पुतळा नगरपालिकेच्या हद्दीमध्ये स.नं. 444 या प्लॉटवर आहे ही वस्तुस्थिती आहे. पुतळ्याच्या बाजूला 5 फुटावर उपाहारगृह आहे. हे उपाहारगृह नगरपालिकेने बांधलेले आहे. त्याठिकाणी दोन प्रकारची अतिक्रमणे आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जागेवर अतिक्रमण झालेले आहे. तसेच नगरपालिकेच्या जागेवर अतिक्रमण झालेले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जमिनीवर जे अतिक्रमण आहे त्यासंदर्भात तालुका मॅजिस्ट्रेटचा स्टे आहे. कदाचित ते अतिक्रमण जुने असल्यामुळे त्यास स्टे दिलेला असेल. हा स्टे व्हॅकेट करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कारवाई करण्याच्या सूचना दिल्या जातील. त्याचप्रमाणे जे उपाहारगृह नगरपालिकेच्या कक्षेत आहे आणि ज्या उपाहारगृहाचे असिस्टण्ट कमिशनरकडून रेखांकन करुन घेतलेले नसताना त्यास मान्यता दिलेली आहे असे अतिक्रमण काढण्याच्या बाबतीत निश्चितपणे एक महिन्याच्या आत कारवाई केली जाईल.

श्री. जितेंद्र आव्हाड : ही कारवाई उद्याच करावी.

श्री. राजेश टोपे : ज्या चुकीच्या गोष्टी घडलेल्या आहेत त्या मी मान्य केलेल्या आहेत. हे उपाहारगृह निष्कासित करण्याची कारवाई नगरपालिकेकडून केली जाईल. त्यासंबंधीच्या सूचना ताबडतोबीने दिल्या जातील.

श्री. सुधाकर गणगणे : निदान एका आठवड्यात तरी ही कारवाई झाली पाहिजे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे : स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्याबद्दल सर्वांनाच आदार आणि अभिमान आहे. अतिक्रमणामुळे पुतळयाची विटंबना आणि विद्रुपीकरण होत असल्यामुळे ते अतिक्रमण 8 दिवसात निष्कासित करण्याच्या सूचना नगरपालिकेला दिल्या जातील. 1976 पासून त्याठिकाणी पुतळा आहे. त्या पुतळयाच्या आजुबाजूच्या जागेचे देखील सुशोभिकरण करावे अशाही सूचना नगरपालिकेला दिल्या जातील.

...नंतर श्री. नाईक...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MAP/ KGS/ पूर्वी श्री.शिगम 17:10

श्री. राजेश टोपे...

अशा प्रकारच्या सूचना निश्चितपणाने शासनाकडून देण्यात येतील. पुतळयाची विटंबना होऊ नये आणि पुतळयाच्या परिसराचे सुशोभिकरण करण्याच्या दृष्टीने सूचना दिल्या जातील. विनापरवाना जे बांधकाम झालेले आहे त्यासंबंधात निश्चितपणाने नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांची जिल्हाधिकाऱ्यांमार्फत चौकशी करुन अहवाल घेतला जाईल आणि त्यानुसार पुढील कारवाई करण्यात येईल.

डॉ.एन.पी.हिराणी : सभापती महोदय, मला मंत्रीमहोदयांना धन्यवाद दिले पाहिजेत. कै.वसंतराव नाईक यांच्याबद्दल संपूर्ण महाराष्ट्राला आदर आहे. या राज्याचे मुख्यमंत्रीपद त्यांनी 11 वर्षे भूषविले होते. पुतळा असताना नगरपालिकेने बेपर्वाइने अशा प्रकारचे अतिक्रमण होऊ देणे ही फार मोठी घटना आहे. मंत्रीमहोदयांनी 8 दिवसात अतिक्रमण काढण्याचे आश्वासन दिलेले आहे. माझा प्रश्न असा आहे की, पुतळयाच्या सभोवतालच्या परिसराचे सुशोभिकरण करण्याचे ठरविले आहे. तेव्हा पुतळा उभारताना नगरपालिकेची जेवढी जागा होती तेवढया जागेला वॉल कंपाऊंड घालण्यात यावे अशा प्रकारच्या सूचना नगरपालिकेला देण्यात येतील काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, वॉल कंपाऊंडसहित सुशोभिकरण केले जाईल आणि यासाठी नगर विकास खात्याकडून निधी उपलब्ध करुन दिला जाईल.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले होते की अनधिकृत बांधकामे अधिकाऱ्यांच्या संरक्षणाखाली उभी रहात असतील तर त्या अधिकाऱ्यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल आणि त्याला निलंबित केले जाईल. या प्रकरणात अधिकाऱ्यांच्या डोळयादेखत आणि त्यांच्याच आशिर्वादाने अतिक्रमण झालेले आहे तर मुख्याधिकाऱ्यांची चौकशी करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांची काय आवश्यकता आहे ? जे कोणी अधिकारी या अतिक्रमणाला जबाबदार असतील त्यांना तात्काळ निलंबित केले जाईल काय ?

**उपसभापती** : मंत्रीमहोदयांनी सविस्तर उत्तर दिलेले आहे. माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी जो प्रश्न विचारला आहे त्याचे उत्तर द्यायचे म्हटले तर महाराष्ट्रातील सगळे अधिकारी घरी जातील आणि ठाण्यात तर एकसुध्दा शिल्लक राहणार नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांनी सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन उत्तर दिले आहे एवढेच नव्हे तर एक पाऊल पुढे जाऊन त्यांनी पुतळयाच्या भोवताली

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

सुशोभिकरण केले जाईल असे सांगितले आहे. माझी अशी सूचना आहे की या सुशोभिकरणासाठी येणाऱ्या खर्चाचा भार शासनाने न उचलता आमदार निधीतून यासाठी पैसा खर्च करण्यात यावा.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी जबाबदारीने उत्तर दिलेले आहे. वॉल कंपाऊंडसहित सुशोभिकरणाच्या कामासाठी नगर विकास खात्याकडून पैसा उपलब्ध करुन दिला जाईल.

**उपसभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि संध्याकाळी 5.45 वा. पुन: भरेल.

( 5.14 ते 5.45 मध्यंतर )

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( मध्यंतरा नंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

**पृ.शी./मु.शी.**: लक्षवेधी सूचनेवरील अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

श्री. सतीश चतुर्वेदी (कामगार मंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने "मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाच्या संदर्भात" या विषयासंबंधी श्री मुजफ्फर हुसेन व इतर वि.प.स. यांनी दिनांक 21 जुलै, 2005 रोजी दिलेल्या लक्षवेधी सूचनेवर शासनातर्फे करण्यात आलेल्या निवेदनावर झालेल्या प्रश्नोत्तराच्या वेळी आश्वासन दिल्याप्रमाणे माननीय सभापतींनी निदेश दिल्याप्रमाणे अधिक माहिती सभागृहासमोर इेवीत आहे.

**उपसभापती** : लक्षवेधी सूचनेसंबंधीची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

**अधिक माहिती**

**(प्रेस : येथे सोबत जोडलेली अधिक माहिती छापावी.)**

---------------

..........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष उल्लेख**

**पृ.शी.**: ठाणे येथील भारतीय सैनिकी शाळेला वेतन अनुदान मिळणेबाबत.

**मु.शी.**: ठाणे येथील भारतीय सैनिकी शाळेला वेतन अनुदान मिळणेबाबत या विषयासंबंधी श्री. रामनाथ मोते, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

महोदय, विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी ठाणे शहरातील भारतीय सैनिकी विद्यालय या शाळेतील शिक्षकांच्या वेतनाबाबतचा प्रश्न सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो आणि त्याकडे शासनाचे लक्ष वेधू इच्छितो.

महोदय, भारतीय सैनिकी विद्यालय ही ठाण्यातील एकमेव सैनिकी शाळा आहे. या शाळेला शासनाचे 100 अक्के अनुदान आहे. परंतु गेल्या ऑक्टोबर, 2005 पासून या शाळेतील कर्मचाऱ्यांना वेतन अनुदान मिळालेले नाही. या शाळेमध्ये 15 शिक्षक आणि 4 शिक्षकेत्तर कर्मचारी काम करतात. या शाळेला ऑक्टोबरपासून मार्चपर्यंत सुमारे 9.68 लाख एवढी रक्कम देणे आवश्यक होते. यासंदर्भात जिल्हा शिक्षणाधिकारी यांनी वारंवार शासनाकडे विनंती करुनही सदर रक्कम उपलब्ध होऊ शकली नाही त्यामुळे गेली पाच महिने अनुदान मिळालेले नाही. अशा प्रकारे पाच-पाच महिने वेतन व वेतनेत्तर अनुदान न मिळणे ही बाब क्लेशदायक आहे. तेंव्हा या शाळेचे अनुदान तातडीने व यापुढेही नियमितपणे मिळत राहील तसेच वेतन अनुदान व वेतनेत्तर अनुदान मिळण्यासाठी संघर्ष करावा लागणार नाही याबाबत शासनाने लक्ष घालावे, अशी माझी या निमित्ताने विनंती आहे.

---------------

.......3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: ऐतिहासिक माहुली किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या 12 पाडयांना पिण्याचे पाणी न मिळण्याबाबत.

**मु.शी.**: ऐतिहासिक माहुली किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या 12 पाडयांना पिण्याचे पाणी न मिळण्याबाबत, या विषयासंबंधी श्री. अरविंद सावंत, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, माहुली किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या वाशिंदजवळील वांद्रे-खोर या 100 अक्के आदिवासी ग्रूप ग्रामपंचायतीअंतर्गत आळणपाडासह 12 पाडयातील ग्रामस्थांची थेंबभर पाण्यासाठी पायपीट सुरु आहे. यामध्ये वांद्रे-खोर गावठाण, आळणपाडा, खेडकेपाडा, मेंगाळपाडा, साठेपाडा, दोडेपाडा, घाटाळपाडा, तांबडेपाडा, बायजीपाडा, नवलेपाडा, पारधीपाडा, काकडपाडा असे 12 पाडो आहेत. या पाडयांमध्ये जपळपास 2500 एवढी लोकवस्ती आहे. या 2500 लोकवस्तीला गेल्या 11 वर्षांपासून नियोजनशुन्यतेमुळे थेंबभर पाणी सुध्दा मिळत नाही. या पाण्यासाठी जागतिक बँकेच्या सहकार्ययाने पिण्याच्या पाण्याची योजना आखली गेली आणि त्याला साडेचार किलोमीटर लांबीची पाईपलाईन टाकण्यात आली आहे. 30 हजार लिटर क्षमता असलेली टाकी बांधण्यात आली आहे आणि पिण्याच्या पाण्यासाठी या ठिकाणी 5 विहीरी खोदल्या व त्यातील फक्त एकाच विहीरीला पाणी लागले, इतर विहीरी कोरडया आहेत. हा खर्च होऊन जवळजवळ 11 वर्षे झाली तरी देखील लोकांना पाण्यासाठी खोदलेल्या खडडयांचाच आधार घ्यावा लागत आहे. या कायमस्वरुपी उपाययोजनेसाठी अडीच ते तीन कि.मी. अंतरावरील माहुली किल्ल्याच्या पायथ्याशी नंदकेश्वर या शंकराच्या देवस्थानाजवळ बारमाही पाण्याने दुथडी भरुन वाहणारे एक तळे आहे. तळयातील गाळ काढून त्याची डागडुजी करुन व कठडा बांधून पाणी अडविण्यासाठी एक बंधारा बांधण्यास जागतिक बँकेच्या पाणीपुरवठा योजनेतील धूळ खात पडलेली 4 कि.मी. लांबीची पाईपलाईन तलावाला जोडून त्याद्वारे पाणी खेचून आणता येईल, हे पाणी

......4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत .....

कोरडया विहीरी व 30 हजार लिटर क्षमतेच्या टाकीत सोडल्यास कायमची पाणी समस्या दूर होणार आहे. मात्र केवळ सरकारी अनास्थेमुळे येथील नागरिकांना भीषण पाणीटंचाईला तोंड द्यावे लागत आहे. म्हणून या पाडयांना कायमस्वरुपी पिण्याचे पाणी मिळण्याच्या दृष्टीने उपाययोजना व्हावी, म्हणून मी शासनाचे लक्ष या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून वेधण्याचा प्रयत्न करीत आहे.

-----------

यानंतर श्री. भारवि .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: बुलढाणा जिल्हयात खामगाव येथे एक रुपयांची जुनी नाणी वितळविण्याचे होत असलेले प्रकार

**मु.शी.**: "बुलढाणा जिल्हयात खामगाव येथे एक रुपयांची जुनी नाणी वितळविण्याचे होत असलेले प्रकार" याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य डॉ.नीलम गोऱ्हे यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेद्वारा निर्वाचित) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते

सभापती महोदय, बुलढाणा जिल्हयातील खामगाव आणि बुलढाणा शहरात एक रूपयांच्या जुन्या नाण्यांना जास्त भाव मिळत आहे. एक रुपयांची 100 जुनी नाणी 120 रुपयात खरेदी करून वितळविण्यात येत आहेत. एक रुपयांच्या जुन्या नाण्यांना येथे मागणी असल्यामुळे जुनी एक रुपयांची नाणी बाजारातून गायब करण्यात आलेली आहेत. हा समाजविघातक प्रकार बुलढाणा आणि खामगाव शहरामध्ये सुरू आहे. त्याकडे शासनाने लक्ष द्यावे अशी मी विनंती करते.

...



असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

**पृ.शी.**: नागपूर विभागातील खाजगी शाळातील शिक्षक कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित व तातडीच्या समस्यांवर निर्णय घेणे.

**मु.शी.**: "नागपूर विभागातील खाजगी शाळातील शिक्षक कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित व तातडीच्या समस्यांवर निर्णय घेणे" याबाबत श्री.व्ही.यू. डायगव्हाणे, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य व्ही.यू.डायगव्हाणे यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे (नागपूर विभाग शिक्षक) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो :-

नागपूर विभागतील सहा जिल्हयामधील खाजगी माध्यमिक / उच्च माध्यमिक शाळामधील शिक्षक कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित व तातडीच्या समस्यावर दिनांक 29 नोव्हेंबर, 2005 व 3 मार्च, 2006 रोजी शिक्षण उपसंचालक नागपूर विभाग, नागपूर यांचे कार्यालयात शिक्षक प्रतिनिधी (वि.प.स.) व विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे प्रतिनिधी यांची बैठक झाली. बैठकीत पुढील मुद्यांवर चर्चा झाली. चेर्चेत दिलेल्या निर्णयाची कार्यालयाने दखल घेतली नाही. पुढील मुद्यांवर योग्य निर्णय घ्यावा.

मुद्दे 1) नागपूर, भंडारा, वर्धा या जिल्हयात सर्व शिक्षा अभियान अंतर्गत आलेल्या निधीचा योग्यप्रकारे विनियोग न होणे, मानधन, सादील खर्च वाटपात मोठया प्रमाणात झालेली अनियमितता. 2) कृषक विद्यालय, वर्धा येथील श्री.शेंडे यांची नियमबाहय नियुक्ती, संस्था सचिवाने शाळेतून संगणक संचांची केलेली अफरातफर, सुभाष हायस्कूल डोंगरगांव, जि.गोदिया येथील नियमबाहय नियुक्ती, राष्ट्रीय सामाजिक विद्यालय, वर्धा व विवेक विद्यालय मांडवा या शाळेत प्रशासक नियुक्त करण्याबाबतची कारवाई, झोडे कन्या विद्यालय आष्टी, जि.वर्धा येथे प्रशासक नियुक्त करणे. 3) संजय गांधी विद्यालय, केळकर वाडी,वर्धा येथील सेवते कायम असलेल्या तक्रारकरती शिक्षक कर्मचाऱ्यांना न्याय दिला नाही. काही प्रकरणात कोर्टाचे निदेश पाळले नाहीत. मात्र मान्यता नाकारलेल्या शिक्षकांना थकबाकीसह नियमबाहयपणे वेतन अदा करून शासनाच्या निधीचा गैर उपयोग करणाऱ्या अधिकाऱ्यांवर अद्याप कार्यवाही झाली नसणे, ...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे....

4) दुपारचे अन्न देण्यासाठी शाळांना वितरित करणारे अनुदान 2-3 माहिने विलंबाने देणे, 5) भविष्य निर्वाह निधीतून ना परतावा घ्यावयाचे कर्ज प्रकरण एकदा मंजूर झाल्यानंतर पुढील हप्त्यासाठी संपूर्ण केस नवीन तयार करुन मंजूरी घेण्याची आवश्यकता नसावी. 6)परांजपे विद्यालय, बजाज नगर,नागपूर (शहर) येथील शिक्षकांच्या विना अनुदानीत सेवा वेतन निश्चिती व सेवा निवृत्ती वेतनासाठी ग्राहय न धरणे. 7) नियुक्तीस मान्यता कॅम्प मध्ये मान्यता मिळालेली किंवा अमान्य प्रकरणे बाबत शासन निर्णयाप्रमाणे त्याच दिवशी यादी फलकावर न लावणे. 8) वेतनेतर अनुदान जिल्हा कार्यालयाकडे प्राप्त झाल्यानंतर शाळांना वितरित करण्यास होणारा विलंब. 9) नेताजी सुभाषचंद्र माध्यमिक विद्यालय सुंदर नगर ता.मुलचेरा, जि.गडचिरोली या शाळेतील व या शाळेच्या संस्थेतील अन्य शाळेतील आर्थिक अनियमितता, शिक्षक-कर्मचाऱ्यांचे आर्थिक शोषण व नियमबाहय पदोन्नती इ. बाबत सखोल चौकशी करणे. 10) 8 वर्षाची सक्षम कारावासाची शिक्षा झालेले श्री. रवींद्र भरणे, यशवंत विद्यालय, हमदापूर, जि. वर्धा यांना संस्थेने नियम धाब्यावर ठेवून कामावर रुजू करुन घेणे 11) माझे पत्र क्र.-1094, दि.14/3/2006, पत्र क्र.-1090, दि. 23/2/2006 व नागपूर जिल्हा कार्यवाह यांचे पत्र क्र.-465/03/06, दि. 27/2/2006 मधील समस्या. या समस्यांना न्याय द्यावा यासाठी मी विशेष उल्लेखाची सूचना उपस्थित करीत आहे.

...

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**पृ.शी.**: दऱ्यापा कोळेकर या शेतकऱ्याने केलेली आत्महत्या.

**मु.शी.**: दऱ्यापा कोळेकर या शेतकऱ्याने केलेली आत्महत्या याबाबत श्री.प्रकाश शेंडगे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.प्रकाश शेंडगे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"कवठेमहांकाळ तालुक्यातील (जि.सांगली) हिंगणगांव येथील शेतकरी दऱ्यापा पांडुरंग कोळेकर, वय 35 वर्षे याने कर्जबाजारीपणाला कंटाळून, दिनांक 20/3/2006 रोजी राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या करणे, तसेच दिनांक 26/3/2006 रोजी म्हैसाळ (जि.सांगली) येथील द्राक्ष बागायतदार शिवाजी बाबू सुर्यवंशी, वय 50 वर्षे यांनी कर्जाला कंटाळून विषारी औषध प्राशन करुन, आत्महत्या केल्याने शेतकरी वर्गात निर्माण झालेला तीव्र असंतोष व चिडेची भावना, शासनाने संबंधित शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याची नितांत आवश्यकता, याकडे शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, राज्यात वारंवार शेतकरी करीत असलेल्या आत्महत्यांना आळा घालण्यास शासनाला आलेले अपयश, शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना, सदर विषय अत्यंत गंभीर व महत्वाचा असूनही शासनाचे त्याकडे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे."

महोदय, शेतकऱ्यांच्या आत्महत्येविषयी ही विशेष उल्लेखाची सूचना उपस्थित करण्यात आली आहे. आतापर्यंत विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांसंदर्भात चर्चा झाली आणि त्याबाबत निर्णयही झालेत. परंतु मी जी विशेष उल्लेखाची सूचना उपस्थित केलेली आहे ती, पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्याने केलेल्या आत्महत्येबाबत आहे. कवठेमहांकाळ तालुक्यातील हिंगणगांव येथील दऱ्यापा पांडुरंग कोळेकर या शेतकऱ्यांनी सोमवार, दिनांक 20 मार्च, 2006 रोजी गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. त्याच्यावर 1 लाख 14 हजार रुपयांचे कर्ज असल्यामुळे आणि बँकेने वसुलीसाठी तगादा लावल्यामुळे त्या शेतकऱ्याने आत्महत्या केली. तसेच दुसरे कारण हे वीज

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे....

बिलाबाबतचे होते. कारण त्या शेतकऱ्याने 5380 रुपयांचे वीज बील भरले नाही म्हणून, वीज मंडळाने त्या शेतकऱ्याचे वीज कनेक्शन तोडले. गेल्या वर्षी त्या शेतकऱ्याची द्राक्ष बाग पाण्याखाली वाहून गेली होती. त्यामुळे त्याने यावर्षी ऊस लावला होता. परंतु वीज बील भरले नाही म्हणून त्याचे वीज कनेक्शन तोडण्यात आले. त्यामुळे त्याने सावकाराकडून 1800 रुपये व्याजाने घेतले आणि वीज बील भरले व वीज कनेक्शन सुरु करण्याबाबत विनंती केली. परंतु अधिकाऱ्यांनी त्याला सांगितले की, संपूर्ण वीज बील भरल्याशिवाय वीज कनेक्शन सुरु करणार नाही. त्यामुळे मानसिक तणावापोटी त्या शेतकऱ्याने आत्महत्या केली. या निमित्ताने माझी शासनाकडे मागणी आहे की, या आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना त्वरित 2 लाख रुपये आर्थिक मदत देण्यात यावी. तसेच जे अधिकारी त्या शेतकऱ्याच्या आत्महत्येस कारणीभूत आहे त्या सर्वांविरुध्द मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा. दिनांक 26 मार्च, 2006 रोजी शिवाजी सुर्यवंशी या शेतकऱ्याने कर्जाला कंटाळून विषारी औषध प्राशन केले व आपली जीवनयात्रा संपविली. सभापती महोदय, दुष्काळी भागासाठी शासन जे पॅकेज जाहीर करणार होते ते अद्यापपर्यंत जाहीर केलेले नाही. त्यामुळे दुष्काळी भागासाठी असलेले पॅकेज त्वरित जाहीर करावे आणि शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना तातडीने 2 लाख रुपये द्यावेत, अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे विनंती करीत आहे.

-----------



असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**पृ.शी.**: महाराष्ट्र राज्य ग्रंथ संचालनालयात होत असलेला गैरव्यवहार.

**मु.शी.**: महाराष्ट्र राज्य ग्रंथ संचालनालयात होत असलेला गैरव्यवहार याबाबत श्री.मुझफ्फर हुसेन, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य मुझफ्फर हुसेन यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.मुझफ्फर हुसेन (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"मराठी भाषेच्या संवर्धनात मोलाची भूमिका बजावणाऱ्या शासकीय ग्रंथालयाची आजची परिस्थिती या बाबत विचार करण्याची वेळ आलेली आहे. शासकीय ग्रंथालयाच्या पुस्तक खरेदीला भ्रष्टाचाराचा विळखा बसल्यामुळे मराठी साहित्य विश्वातील उत्कृष्ट वाचक वर्ग वंचित राहिला आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. महाराष्ट्र ग्रंथ संचालनालयातर्फे गेले अनेक वर्षे उत्कृष्ट साहित्याची खरेदी सर्रास किंमत वाढवून केली जात असून, या खरेदीत लाखोंचा भ्रष्टाचार होत असल्याचे दिसून येत आहे. राज्यातील 28 शासकीय ग्रंथालये व 7,503 सार्वजनिक अनुदानित वाचनालयांच्या देखरेख आणि विकासाची जबाबदारी असणाऱ्या महाराष्ट्र राज्य ग्रंथ संचालनालयाच्या चाललेल्या अनागोंदी कारभारामुळे समस्त ग्रंथ चळवळीस धोका निर्माण झाला आहे. ग्रंथालयामधील वार्षिक पुस्तक खरेदी सार्वजनिक वाचनालयाची मान्यता आणि दर्जा (वर्ग) बदल ते अनुदान वाटप, अशा अनेक कामांमध्ये संचालनालयाचे अधिकारी अक्षरश: निती नियम, अटी व निकष धुडकावून मुळ छापील किंमतीच्या दुप्पट वाढीव किंमती मध्ये पुस्तके खरेदी करणे अशा प्रकारचे सर्रास गैरव्यवहार करीत असल्याचे आढळून आले आहे. वाचकांच्या माथी मान्यवर लेखकांची पुस्तके व मराठीच्या उत्तम साहित्याऐवजी सुमार दर्जाची टाकावू पुस्तके मारण्याचा प्रकार होत आहे. या वर्षाची खरेदी 31 मार्च पर्यंत करणे बंधनकारक असताना सुध्दा यंदाची खरेदी करण्यात आलेली नाही. तरी महाराष्ट्र राज्य ग्रंथ संचालनालयात होत असलेल्या गैरव्यवहाराबाबत त्वरित राज्य शासनाने लक्ष घालून वाचकांमध्ये पसरलेला असंतोष दूर करण्याकरिता हया विशेष उल्लेखाद्वारे मी विनंती करीत आहे."

..4..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: विजयदुर्ग परिसरामध्ये औष्णिक वीज प्रकल्प घेण्याबाबत सुरु असलेली चर्चा

**मु.शी.**: विजयदुर्ग परिसरामध्ये औष्णिक वीज प्रकल्प घेण्याबाबत सुरु असलेली चर्चा याबाबत कर्नल सुधीर सावंत, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य कर्नल सुधीर सावंत यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

कर्नल सुधीर सावंत (नामनियुक्त ) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"विजयदुर्ग परिसरामध्ये औष्णिक वीज प्रकल्प घेणे बाबत चर्चा चालू आहे. औष्णिक प्रकल्प हा कोळशावर आधारित असल्यामुळे तेथील पर्यावरणावर त्याचा काय परिणाम होणार आहे यावर त्या प्रकल्पाचे भविष्य निर्धारित आहे. देवगड व राजापूर तालुक्यात प्रामुख्याने पिकणारा आंबा हे कोकणचे व पर्यायाने भारताचे भूषण आहे. कोणत्याही परिस्थितीत कुठल्याही प्रकल्पामुळे आंब्यावर विपरित परिणाम होत असेल तर तो प्रकल्प तेथील लोक स्वीकारणार नाहीत. त्यामुळे तज्ज्ञ संस्थांकडून पर्यावरणावरील परिणामांचा अभ्यास झाल्याखेरिज या प्रकल्पाला हिरवा कंदील देणे हितकारक ठरणार नाही.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत ....

विजयदुर्ग हे महाराष्ट्रातीलच नव्हे तर जगातील सर्वात मोठे बंदर होऊ शकते. दुर्दैवाने बंदर विकासासाठी जो अभ्यास गट स्थापन केला जातो, त्याने विजयदुर्गबद्दल काहीही मत प्रकट केले नाही. विजयदुर्ग येथे पाण्याची पातळी जवळजवळ 13 ते 20 मीटर इतकी खोल आहे. विजयदुर्ग व राजापूरातील मुसा काझी ही दोन ठिकाणे मिळून जवळजवळ 100 ते 125 बर्थ ( धक्के ) तेथे होऊ शकतात. असे नियोजन केल्यास विजयदुर्ग हे रॉट्रडॉमपेक्षा मोठे बंदर होऊन जगातील सर्वात मोठे बंदर म्हणून ठरू शकते. हे सर्व घडविण्यासाठी पूर्ण परिसराचा मास्टर प्लॅन बनविणे आवश्यक आहे. मास्टर प्लॅनमध्ये खालील गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे.

1. कंटेनर टर्मिनल : जे.एन.पी.टी आणि मुंबई या बंदराची खोली विजयदुर्गपेक्षा कमी आहे. तेथील सुविधा अपुरी आहे. पुढील काळातील आयात-निर्यातीला वाव देण्याची क्षमता या बंदरांमध्ये नाही. त्यामुळे मुंबई ते गोवा दरम्यान एक मोठे कंटेनर टर्मिनल होणे आवश्यक आहे व ही क्षमता विजयदुर्गमध्ये आहे.

2. शिप बिल्डींग यार्ड : शिप बिल्डिंगला प्रचंड मागणी आलेली आहे व खाजगी उद्योजक शिप बिल्डींग यार्ड बनविण्याच्या प्रयत्नात आहे. या उद्योगाद्वारे 1 लाख लोकांना रोजगार मिळू शकतो. तरी, ऑक्टोबर, 2007 ला हे शिप बिल्डींग यार्ड सुरु होणे आवश्यक आहे. त्यानुसार जलद गतीने उद्योजकांना आवश्यक त्या सर्व परवानग्या सरकारने मिळवून द्याव्यात.

3. स्पेशल इकोनॉमी झोन : या भागामध्ये एक अत्यंत आधुनिक स्पेशल औद्योगिक इकोनॉमीक झोन निर्माण करण्यात यावा.

4. नागरी सुविधा : या भागामध्ये वरील प्रकल्पांना पुरक अशा लोकवस्तीला नागरी सुविधा निर्माण करणे आवश्यक आहे.

5. दळणवळण : कंटेनर ट्रॅफिकसाठी हे बंदर व्यवहार्य बनविण्यासाठी खालील गोष्टींची गरज आहे.

1. मुंबई - गोवा हा चारपदरी पर्यटन महामार्ग बनविण्यात यावा व सहापदरी बनविण्याची क्षमता ठेवली पाहिजे. जेवणेकरुन मुंबई ते विजयदुर्ग हे अंतर 4 तासांमध्ये कापता येईल व पर्यायाने पर्यटनाला देखील मोठी चालना मिळेल.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत ....

2. रेल्वे : पहिल्या टप्प्यामध्ये कोकण रेल्वे होऊन रेल्वे लाईन विजयदुर्ग पर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे आणि दुसऱ्या टप्प्यामध्ये तिला कोल्हापूरपर्यंत जोडणे आवश्यक आहे.

3. जल वाहतूक : मुंबई, रत्नागिरी, विजयदुर्ग व गोवा अशी जल वाहतूक सुरु करण्यात यावी.

5. मत्स्यव्यवसाय : हे मोठे मत्स्यव्यवसाय बंदर म्हणून विकसित करण्यात यावे.

6. इन्स्टिटट्युट फॉर शिप बिल्डींग अँड मेरी टाईम टेक्नॉलॉजी : जागतिक पातळीवरील संशोधन व विकास करणारी संस्था निर्माण करण्यात यावी.

विजयदुर्ग हे एक नैसर्गिक बंदर ईश्वराने दिलेली मोठी देणगी आहे. नवीन आर्थिक धोरण, विकासाला गती देण्यासाठी, रोजगाराचा प्रश्न सोडविण्यासाठी विजयदुर्गमध्ये मोठी क्षमता आहे. त्यासाठी कोकणाचे भविष्यातील महत्त्व लक्षात घेता कोकण विकासाचा कार्यक्रम नव्याने ठरविणे आवश्यक आहे. या दृष्टीने तातडीने पुढील चार बाबींवर उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे.

1. पहिल्या टप्प्यामध्ये शिप बिल्डींग यार्डच्या संबंधित परवानग्या पुढील 6 महिन्यांत देण्यात याव्यात.
2. विजयदुर्गसाठी एक मास्टर प्लॅन पुढील 6 महिन्यांत तयार करण्यात यावा.
3. सन 2007-2008 च्या नियोजन आराखड्यातील विजयदुर्ग बंदराच्या विकासाचा समावेश करण्यात यावा.
4. तज्ज्ञांची एक समिती नेमण्यात यावी.

या सर्व गोष्टींची चर्चा होणे आवश्यक आहे. यासाठी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

----

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष उल्लेखाच्या सूचनेबाबत**

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, माझीही एक विशेष उल्लेखाची सूचना असून दिनांक 3 एप्रिल, 2006 रोजी म्हणजेच आज सभागृहात उपस्थित करण्यास परवानगी दिलेली आहे.

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पॉईंट ऑफ प्रोसिजरसंदर्भात**

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ प्रोसिजर आहे. विशेष उल्लेखाच्या सूचना, नियम 93 अन्वयेच्या सूचना यांमध्ये सभागृहाचा फार वेळ जात आहे. सभापती महोदय, शेवटी शासकीय कामकाज देखील आहे. शासकीय कामकाजालासुध्दा या सभागृहात वेळ मिळाला पाहिजे. आज अधिवेशन सुरु होऊन 20 दिवस होत आले आहेत. परंतु शासकीय कामकाज झालेले नाही. सभागृहाचे कामकाज सकाळी सुरु झालेले आहे. सभागृहात शासकीय कामकाज देखील झाले पाहिजे एवढेच माझे म्हणणे आहे.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, नियम 93 अन्वये नोटीस दिल्यानंतर, विशेष उल्लेखाची सूचना दिल्यानंतर देखील असे बोलले जात असेल तर नोटीस न देता जर एखादा विषय मांडला तर काय होईल ?

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय आता पॉईंट ऑफ प्रोसजरवर बोलले त्यावर माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय मंत्री महोदयांनी या सदनाचा व सदनातील सदस्यांचा अवमान केलेला आहे, असे म्हटले तर वावगे होणार नाही. विशेष उल्लेखाचे महत्व आहे, सभापती महोदय, आपण आम्हाला संरक्षण द्यावयास पाहिजे. या सभागृहामध्ये विशेष उल्लेखाची प्रथा माजी सभापती माननीय श्री. फरांदे साहेबांनी सुरु केलेली आहे. त्यावेळी मोठया प्रमाणात लक्षेवधी येत असल्यामुळे व त्यातून सर्वांना न्याय मिळत नसल्याने सर्व सदस्यांनी यासंदर्भात आग्रह धरल्यामुळे विशेष उल्लेख सुरु झालेले आहेत. नियमामध्ये त्याचे रुपांतर झालेले आहे. सन्माननीय मंत्री महोदय म्हणाले की, विशेष उल्लेखामुळे शासकीय कामकाज होत नाही, त्यांनी सदनाचा व सदनातील सदस्यांचा अवमान केलेला आहे. असा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

--------------

.....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: ठाणे जिल्हयातील रेल्वे क्रॉसींगवर पादचारी पूल नसल्यामुळे होणारे मृत्यू

**मु.शी.**: ठाणे जिल्हयातील रेल्वे क्रॉसींगवर पादचारी पूल नसल्यामुळे होणारे मृत्यू याबाबत श्री. संजय दत्त, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखासंबंधीची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

" ठाणे जिल्हयातील कल्याण, अंबरनाथ, शहाड, ठाकुर्ली या व इतर त्यालगतच्या रेल्वे स्टेशन दरम्यान रेल्वे क्रॉसींगवर रेल्वे पादचारी पूल नसल्यामुळे तसेच कांही ठिकाणी योग्य जागी पादचारी पूल नसल्यामुळे प्रवाशांच्या होत असलेल्या गैरसोयीमुळे प्रवाशांना रेल्वे लाईन ओलांडून ये-जा करावी लागत आहे. यामुळे या एका वर्षात (2005-2006) सुमारे 500 ते 600 प्रवासी रेल्वे लाईन ओलांडताना मृत्यूमुखी पडल्याचे आढळून आले आहे, रेल्वे पूल नसल्यामुळे प्रवाशांना आपला प्राण नाहक गमवावा लागत आहे. रेल्वेने याबाबत अधिक सोयी द्याव्यात अशी प्रवाशांची अपेक्षा असूनही रेल्वे कोणत्याही सोयी देत नसून याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे आढळून येत आहे. प्रवाशांना रेल्वे लाईन क्रॉस करण्याकरीता क्रॉसींगवर रेल्वे पादचारी पूलाची नितांत गरज असल्याचे महाराष्ट्र शासनाने याबाबत केंद्र शासनाकडून योयी उपलब्ध करुन घेण्याबाबत खास उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. अशा प्रकारची विनंती मी सूचनेद्वारे शासनास करीत आहे.

.......3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी जी विशेष उल्लेखांची सूचना मांडलेली आहे ती अत्यंत महत्वाची आहे ठाणे जिल्हयात व लगतच्या परिसरामध्ये रेल्वे क्रॉसींगवर उड्डाणपूल नसल्यामुळे गेल्या 2 ते 4 वर्षापासून लक्षावधी नागरिकांची गैरसोय होत आहे. हा प्रश्न निकाली काढण्याकरिता मी स्पष्ट अशी सूचना देत आहे की, शासनाच्या नगर विकास विभागाने येत्या 8 ते 15 दिवसांमध्ये तातडीने मध्य रेल्वे व पश्चिम रेल्वेच्या जनरल मॅनेजर सोबत बैठक घेऊन हा प्रश्न निकाली काढण्यात यावा.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, आपण दिलेल्या निदेशाचे मी आभार मानतो, तसेच मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून पश्चिम महाराष्ट्रामध्ये दोन शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. त्यांना शासनाने त्वरीत मदत द्यावी अशा प्रकारचे आपण निदेश द्यावेत अशी माझी विनंती आहे.

-----

यानंतर श्री. सुंबरे...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : नालवाडी ग्रामपंचायत (ता. व जि. वर्धा) येथील आदिवासी कॉलनीतील रहिवाशांना वर्धा नगरपरिषदेने पाणी वितरण बंद करणे.

**मु. शी.** : नालवाडी ग्रामपंचायत (ता. व जि. वर्धा) येथील आदिवासी कॉलनीतील रहिवाशांना वर्धा नगरपरिषदेने पाणी वितरण बंद करणे याबाबत श्री.व्ही.यू.डायगव्हाणे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□□य सदस्य श्री. व्ही.यू.डायगव्हाणे यां□ ए□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे (नागपूर विभाग शिक्षक) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रमाणे विशेष उल्लेखाची सूचना मांडतो. ..

" नालवाडी ग्रामपंचायत (तालुका व जिल्हा वर्धा) येथील आदिवासी कॉलनीतील रहिवाशांना विशेष बाब म्हणून वर्धा नगर परिषदेच्या पाणी वितरण व्यवस्थेतून नळाद्वारे पाणी दिले जाते. नियमा प्रमाणे त्यासाठी रूपये 1037/- ॲडव्हान्स व रूपये 806/- टॅक्स शेकडो नागरिकांनी भरलेला आहे. पण गेल्या 7-8 महिन्यांपासून नगर परिषद वर्धा यांनी या वसाहतीला पाणी देण्याचे बंद केले आहे. काही वेळेस अंशत: पाणी दिले जाते. अनियमितपणामुळे काही नळ कनेक्शन धारकांनी टॅक्स भरणे बंद केले. पाणी नियमित व पुरेसे देण्यात यावे अशी मागणी नळधारक नागरिक व वॉर्ड सदस्य यांनी माननीय जिल्हाधिकारी, वर्धा यांच्याकडे 8 मार्च 2006 च्या पत्रान्वये कली आहे. सद्य:स्थितीत नळधारकांनी संपूर्ण टॅक्स भरलेला आहे.

प्रथम पासूनच या भागात पाणी टंचाई आहे. गोरगरीब, कष्टकरी, रिक्षाचालक व आदिवासी यांची या भागात महत्तम संख्या आहे. येथील लोकांना 1 कि.मी. अंतरावर पाण्यासाठी जावे लागते. सध्या भीषण स्थिती आहे. तरी तातडीने याबाबत उपाय योजना करावी यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे. धन्यवाद.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

***

...... एसएस 2 ..

**पृ. शी.** : ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील माळ, शिरोशी, सावर्णे, धसई व म्हसा या परिसरात रोजगार हमी योजनेची कामे सुरू करणे.

**मु. शी.** : ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील माळ, शिरोशी, सावर्णे, धसई व म्हसा या परिसरात रोजगार हमी योजनेची कामे सुरू करणे याबाबत श्री.अरविंद सावंत,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□□य सदस्य श्री. अरविंद सावंत यां□ ए□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : महोदय, मी पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यामध्ये आदिवासी कुटुंबे अत्यंत दारिद्र्य रेषेखाली आहेत. त्या ठिकाणी रोजगार हमी योजनातील कोणतीही कामे होत नाहीत. त्यामुळे आदिवासींसाठी खरे तर अंत्योदय योजना आणली गेली होती. त्या योजनेतून दारिद्र्यरेषेखालील या आदिवासींना कामे देऊन त्याद्वारे महिना 25 किलो तांदूळ आणि 10 किलो गहू देण्यात येतात. परंतु प्रत्यक्षात तेवढी देखील खरेदी करण्याची क्षमता या आदिवासी लोकांची नसल्यामुळे ही सारी आदिवासी कुटुंबे अगदी मुलाबाळांसह मासेमारी करीत आहे आणि त्यातून आपले पोट भरीत आहेत. मुरबाड तालुक्यातील माळ, शिरोशी, सरवर्णे, धसई, म्हसा या परिसरामध्ये सध्या तरी रोजगार हमी योजनेतील कोणतेही काम सुरू नाही. तेथे असलेले दलाल आणि भ्रष्ट अधिकारी व अभियंते यांच्यामुळे ही योजना या परिसरातील तळागाळातील आदिवासींपर्यंत पोहोचलेली नाही. त्यामुळे मुरबाड तालुक्यातील या गावांमध्ये रोजगार हमी योजनेतून कामे सुरू करून आदिवासी बांधवांच्या उदर निर्वाहाचा प्रश्न काही प्रमाणात तरी आपण सोडवावा यासाठी म्हणून मी ही विशेष उल्लेखाची सूचना येथे दिली आहे. त्याबाबत आपण सत्वर कारवाई करावी ही विनंती.

****

...... एसएस 3 ..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : वैजापूर (जिल्हा औरंगाबाद) येथील श्री.अजीझ खान पठाण यांना लागलेल्या महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या तिकिटाची रक्कम त्यांना अद्याप न मिळणे.

**मु. शी.** : वैजापूर (जिल्हा औरंगाबाद) येथील श्री.अजीझ खान पठाण यांना लागलेल्या महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या तिकिटाची रक्कम त्यांना अद्याप न मिळणे याबाबत श्री.विलास अवचट, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.विलास अवचट यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. विलास अवचट (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो. -

संभाजीनगर येथील वैजापूरच्या अजीझ खान पठाण यांनी चार वर्षापूर्वी म्हणजे दिनांक 6.10.2002 रोजी महाराष्ट्र राज्य सरकारचे लॉटरीचे तिकीट खरेदी केले होते. त्या लॉटरीचा निकाल दिनांक 12.10.2002 रोजी दैनिक देशदूत मध्ये प्रसिद्ध झाला. त्यानुसार श्री. पठाण यांनी खरेदी केलेल्या तिकीटाला 14 लाखाचे बक्षिस लागले होते. त्यांनी बक्षिसपात्र सदर तिकीट जिल्हा कोषागार, औरंगाबाद येथील कार्यालयात अधिकाऱ्यांकडे जमा केल्यावर त्याची रितसर वित्त आयोगाने संबंधित कार्यालयाची पावतीही देण्यात आली. असे असताना देखील सदर लॉटरीची रक्कम अद्याप पावेतो त्यांना मिळालेली नाही. याबाबत त्यांनी मंत्रालयामध्ये संबंधित खात्याकडे चौकशी करूनही याबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नाही. याबाबत संबंधित अधिकारी उडवा-उडवीची उत्तरे देत असून बक्षिसपात्र तिकीट बोगस असल्याचे सांगण्यात येत आहे. या सर्व घटनां मुळे महाराष्ट्रातील जनतेचा शासनावरील आणि शासनातर्फे चालविल्या जाणाऱ्या लॉटरीवरील विश्वास उडत चालला आहे. तेव्हा या गरीब नागरिकाला न्याय मिळावा यासाठी मी विशेष उल्लेखा द्वारा हा विषय उपस्थित केला आहे. याबाबत शासनाने त्वरित निवेदन करावे अशी मी या निमित्ताने विनंती करतो.

****

...... एसएस 4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>औचित्याच्या मुद्याबाबत</u>** ....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मला या ठिकाणी एक औचित्याचा मुद्दा उपस्थित करावयाचा आहे. या सदनामध्ये आपण निदेश दिले होते की, लॉटरीच्या बाबतीत शासनाने संध्याकाळपर्यंत निवेदन करावे. त्याला आज 4 दिवस झाले तरी सरकारची संध्याकाळ उजाडत नाही. त्या दिवशी मंत्री महोदय दिल्लीला गेले आहेत असे आम्हाला सांगण्यात आले होते. ते आम्ही समजू शकतो. पण अजूनही ते निवेदन सरकारकडून करण्यात आलेले नाही. तेव्हा ते निवेदन सरकारकडून केले जाणार आहे की नाही ? किमान आज तरी आपण हे निवेदन करण्यास सरकारला सांगावे.

श्री. दिलीप वळसे-पाटील (उच्च व तंत्रशिक्षण मंत्री) : सभापती महोदय, उद्या संध्याकाळ पर्यंत हे निवेदन करण्यास मी सांगतो.

**उपसभापती** : ठीक आहे. आता यानंतर शासकीय विधेयके घेण्यात येतील. या बाबतीत मी सदनाला सांगू इच्छितो की, यातील सन 2006 चे वि.प.वि.क्रमांक 10 - महाराष्ट्र स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठे (स्थापना व विनियमन) विधेयक, 2006 हे उद्या घेण्यात येईल. त्यानंतर बाकीची विधेयके झाल्यानंतर नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा घेण्यात येईल.

****

........ एसएस 5 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : अन्न भेसळ प्रतिबंध (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक.

**L.C. BILL NO.XIV OF 2006.**

**(A BILL FURTHER TO AMEND THE PREVENTION OF FOOD ADULTERATION ACT, 1954, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.)**

श्री. बाबा सिद्दीकी (अन्न व नागरी पुरवठा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन 2006 चे वि. प. वि. क्रमांक 14 - अन्न भेसळ प्रतिबंध अधिनियम, 1954 महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि. प. वि. क्रमांक 14 मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

***

( यानंतर श्री. सरफरे .... टीटी 1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा)(सुधारणा) विधेय□

L.A.BILL NO.XII OF 2006.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA AGRICULTURAL LANDS (CEILING ON HOLDINGS ACT, 1961).

डॉ. राजेंद्र शिंगणे (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधा□सभे□ संमत □ल्याप्रमा□मी आपल्या अ□मती□ सन 2006 चे वि.स.वि. □मां□ 12 महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, 1961 यात आणखी सुधारणा करण्याकरीता विधेयक मांडतो.

**उपसभापती** : विधेय□ मांड□यात आले आहे.

डॉ. राजेंद्र शिंगणे : महोदय, मी आपल्या अ□मती□ स□ 2006 चे वि.स.वि. □मां□12 महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, 1961 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घे□यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, महाराष्ट्र शेत जमीन अधिनियम 2001 व्दारे पूर्वीच्या महाराष्ट्र शेत जमीन अधिनियम 1961 च्या कलम 28-1 अ मध्ये सुधारणा केली होती. मागील अनेक वर्षापासून ज्या खंडकऱ्यांच्या जमिनी शेती महामंडळाकडे होत्या, त्या त्यांना परत मिळाल्या पाहिजेत अशी अनेक वर्षापासून त्यांची सातत्याने मागणी होती. म्हणून त्यासंबंधी सन 2003 मध्ये वरील अधिनियमात सुधारणा केली होती. व त्याप्रमाणे अध्यादेश काढला होता. प्रामुख्याने अहमदनगर, नाशिक, सांगली, कोल्हापूर, सातारा, पुणे या जिल्हयातील खंडकऱ्यांच्या जमिनी अनेक वर्षापासून शेती महामंडळाकडे अतिरिक्त जमीन म्हणून वर्ग केल्या होत्या. शेती महामंडळाकडे वर्ग करण्याअगोदर अनेक खंडकऱ्यांनी या जमिनी अनेक खाजगी साखर कारखान्यांना खंडाने दिल्या होत्या. शेती महामंडळाकडे या जमिनी आल्यानंतर शासनाने त्या संबंधित खंडकऱ्यांना 2003 मध्ये परत करण्याचा निर्णय घेतला व त्याकरीता एक अध्यादेश काढला. त्या अध्यादेशामध्ये 90 दिवसाच्या आत संबंधित खंडकऱ्याने आपला अर्ज तहसिलदार, जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यासाठी तरतूद करण्यात आली होती. शासनाने हा निर्णय घेतल्यानंतर शेती महामंडळामध्ये असणारे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. राजेंद्र शिंगणे...

कर्मचारी आणि काही शेतकरी यांनी औरंगाबाद न्यायालयामध्ये एक याचिका दाखल केली. ती दाखल केल्यानंतर सरकारने घेतलेला निर्णय रद्द करावा, तो थांबवावा अशाप्रकारची विनंती न्यायालयाला केली होती. आणि न्यायालयाने सुध्दा सरकारच्या निर्णयाला स्थगिती दिली होती. नंतरच्या काळात शासनाने घेतलेला निर्णय न्यायालयाने कायम ठेवला आणि त्या खंडकऱ्यांच्या जमिनी त्यांना परत मिळाल्या पाहिजेत यासाठी शासनाने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्या संदर्भात सुध्दा न्यायालयाने निर्देश दिले.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.राजेंद्र शिंगणे (पुढे सुरु...

परंतु 90 दिवसाच्या अवधीमध्ये ही जमीन परत करण्याचा निर्णय घेत असतांना 90 दिवसामध्ये संबंधित खंडकरी शेतकऱ्यांनी अर्ज करायला पाहिजे होता. परंतु न्यायालयाची स्थगिती असल्यामुळे अनेक खंडकरी शेतकरी जमीन परत मिळविण्यासाठी 90 दिवसाच्या कालावधीमध्ये अर्ज करु शकले नाहीत. आता न्यायालयाची स्थगिती उठल्यानंतर 90 दिवसाच्या आत शेती महामंडळाकडून जमीन परत मिळविण्यासाठी खंडकरी शेतकऱ्यांना अर्ज करता यावा, यासाठी या अधिनियमामध्ये सुधारणा केलेली आहे. सरकार यामध्ये स्वत:कडील जमीन देते असे नाही. त्यांच्या जमिनीचा मालकी हक्क अनेक वर्षे शेती महामंडळाकडे होता,ती जमीन परत करण्यासाठी 90 दिवसात खंडकरी शेतकऱ्यांना अर्ज करता यावा, यासाठी अधिनियमामध्ये या विधेयकाद्वारे सुधारणा करतो आहोत. मला वाटते की, सभगृहाने या सुधारणेला मान्यता द्यावी. अनेक वर्षापासून खंडकरी शेतकऱ्यांचा प्रश्न प्रलंबित पडलेला होता. त्यांना जमीन परत करण्याच्या संबधात दिनांक 17-02-2006 रोजी अध्यादेश काढलेला आहे त्याचे अधिनियमामध्ये रुपांतर करण्यासाठी हे विधेयक आणलेले आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

श्री.मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम,1961 यात आणखी सुधारणा करण्याकरिता 2006 चे विधानसभा विधेयक क्रमांक 12 मांडलेले आहे. खंडकरी शेतकऱ्यांचा प्रश्न आहे. खंडकरी शेतकऱ्यांची जमीन शेती महामंडळाने घेतलेली होती, त्यामुळे ती जमीन त्या शेतकऱ्यांना वापरता आली नाही, त्याचबरोबर महामंडळानेही त्याचा वापर केला नाही. महामंडळाकडील जमीन परत मिळण्यासाठी 90 दिवसाच्या आत खंडकरी शेतकऱ्यांना अर्ज करता येत होता, परंतु संभाजीनगर येथील हायकोर्टाच्या स्थगितीमुळे शेतकऱ्यांना अर्ज करता आलेला नाही. शेवटी त्यांची ही अडचण दूर व्हावी म्हणून कायद्यामध्ये तरतूद करण्यासाठी हे विधेयक आणलेले आहे. खरे तर या विधेयकाचे स्वागत करायला पाहिजे. खरे म्हणजे महाराष्ट्र शासनाने कोणतीही जमीन अधिगृहित करुन आपल्या ताब्यात घेते, त्यानंतर अनेक वर्षे ती जमीन तशीच पडून रहाते. त्या जमिनीवर मूळ मालक काही करु शकत नाहीत. अशाप्रकारचे अनेक भूखंड संपूर्ण महाराष्ट्रामध्ये पडून आहेत. जमीन परत मिळवायची झाली तर त्यासाठी सोपी प्रक्रिया नाही. अनेक प्रकारचे वळसे घेत शासनाकडे जावे लागते. शासन पाच वर्षे रहाते, त्यानंतर नवीन सरकार येते. परंतु शेतकरी हा तसाच कायम रहातो. महसूल खात्याने चांगला निर्णय घेतलेला आहे, त्यामुळे या विधेयकाचे मी स्वागत करतो. अशाचप्रकारची जागरुकता ठेवणे आवश्यक आहे. महाराष्ट्रामध्ये अशा अनेक जमिनी पडून आहेत, शेतकऱ्यांना त्या परत मिळाल्या तर शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये चार दिवस आनंदाचे जातील. या विधेयकाच्या उद्देश व कारणामध्ये म्हटलेले आहे की, "मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने पूर्वीच्या पट्टाकारांना जमीन देण्याबाबत "जैसे थे स्थिती" ठेवावी असा आदेश दिल्यामुळे, बहुतांश पट्टाकारांना, जमीन परत मिळण्यासाठी सक्षम प्राधिकरणाकडे नेमून दिलेल्या कालावधीमध्ये अर्ज सादर करता आले नाहीत. परिणामी, उक्त अधिनियमामध्ये सुधारणा करण्याचे शासनाचे प्रयोजन साध्य होऊ शकले नाही. त्यावेळी, उच्च न्यायालयाने दिवाणी अर्ज निकालात काढल्यामुळे, शासनाला, उक्त कलम 28-1अअ मध्ये योग्य त्या सुधारणा करुन पूर्वीच्या पट्टाकारांना जमीन परत मिळण्यासाठी अर्ज सादर करण्याची संधी देणे इष्ट वाटते."

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ...

1961 च्या अधिनियमातील कलम 28 (अ) (अ) मध्ये परिवर्तन करुन जी सुधारणा सुचविलेली आहे त्या सुधारणेचे मी स्वागत करतो. माझी महाराष्ट्र शासनाला एकच सूचना आहे की, अशा प्रकारचे अनेक प्रश्न महाराष्ट्रामध्ये पडून आहेत. त्यासाठी उच्च न्यायालयात जाण्याकरिता शेतकऱ्यांकडे पैसे नसतात. त्यामुळे जी परिस्थिती आहे ती तशीच परिस्थिती राहू द्यावी असा विचार करुन शेतकरी गप्प बसतो. त्यांना जमीन मिळत नाही. "असुनी खास मालक घरचा, म्हणती चोर त्याला" अशी शेतकऱ्यांची परिस्थिती होते. म्हणून महाराष्ट्र शासनाने आणि खासकरुन माननीय महसूल मंत्र्यांनी घेतलेल्या निर्णयाचे मी स्वागत करतो आणि हे विधेयक सदनाने मंजूर करावे अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

प्रा. जोगेंद्र कवाडे ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, महाराष्ट्र शेतजमीन ( जमीनधारणेची कमाल मर्यादा ) अधिनियम, 1961 यात आणखी सुधारणा करण्यासाठी सन 2006 चे वि. स. वि. क्रमांक 12 सभागृहासमोर आणण्यात आले आहे त्याबद्दल शासनाचे आणि माननीय मंत्रिमहोदयांचे अभिनंदन करण्यासाठी तसेच या विधेयकाचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे. अनेक शासकीय प्रकल्पांसाठी शेतकऱ्यांच्या जमिनी अधिग्रहित केल्या जातात आणि अनेकवर्षे त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे प्रकल्प उभे न राहिल्यामुळे त्या जमिनी तशाच पडून असतात. शासकीय प्रकल्पांसाठी खंडकरी शेतकऱ्यांच्या ज्या जमिनी घेतल्या जातात त्यातील उरलेल्या जमिनी त्या खंडकरी शेतकऱ्यांना वैयक्तिक लागवडीसाठी परत करण्यात याव्यात यासाठी हे जे विधेयक आणलेले आहे ते निश्चितपणे शेतकऱ्यांना न्याय देणार आहे. या विधेयकाचे मी स्वागत करतो. आपली जमीन परत मिळण्यासाठी खंडकरी शेतकऱ्यांनी 90 दिवसांच्या आत अर्ज केला पाहिजे. अशा योग्य नियमाचा समावेश आपण यामध्ये केलेला आहे त्याचेही मी स्वागत करतो. अनेकदा असे होते की, अशा प्रकारे शेतकऱ्यांच्या जमिनी अधिग्रहित केल्या जातात आणि जी अतिरिक्त जमीन असते ती परत मिळावी म्हणून शेतकऱ्यांनी मागणी केल्यानंतर सुध्दा त्यांना जमीन परत न करता इतर लोकांना जास्त दराने विकण्याचा प्रयत्न केला जातो. अशा प्रकारच्या अनेक तक्रारी नागपूर विभागातून आलेल्या आहेत. परंतु आपल्या या विधेयकामुळे त्याला प्रतिबंध बसेल. प्रकल्पासाठी अधिग्रहित करण्यात आलेल्या ज्या जमिनीचा उपयोग होणार नाही त्या जमिनी परत मिळण्यासाठी 90 दिवसात अर्ज केल्यानंतर त्यांना जमीन परत देण्याची जी तरतूद विधेयकामध्ये केलेली आहे ती निश्चितपणे शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त आहे. म्हणून मी शासनाचे आणि माननीय महसूल मंत्र्यांचे या निमित्ताने अभिनंदन करतो. मी या विधेयकाचे स्वागत करतो. या विधेयकाला पाठिंबा देऊन मी माझे भाषण संपवितो.

-----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

श्री. दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, एखादी नवीन घटना घडावी, एखादी नवीन गोष्ट घडावी आणि त्याबद्दल शासनाचे कौतुक करावे अशा प्रकारचे हे विधेयक नाही. मुळातच यापूर्वी या सदनामध्ये ज्यावेळी याबाबतचे विधेयक मंजूर झाले त्यावेळी सगळ्यांनी शासनाचे अभिनंदन केलेले आहे. त्यावेळचे माननीय महसूल मंत्री श्री. निंबाळकर यांनी विधेयक मांडले होते. शेती महामंडळाचे कर्मचारी कोर्टात गेल्यामुळे यावर स्थगिती आली होती म्हणून हे सर्व थांबले. शेजाऱ्याच्या पोराचे कौतुक किती करावयाचे यालाही मर्यादा असतात. सभापती महोदय, याचा लाभ ज्या भागामध्ये मिळाला याची यादी वाचल्यानंतर हे शासन कोणत्या धोरणाने, कोणत्या भागाकरिता, कोणत्या पध्दतीने व्यवहार्य कायदा बनवत असते याची प्रचिती या सदनामध्ये आज आली. मागच्या वेळी जे विधेयक आले होते त्यावेळी असे भाष्य करण्यात आले की, खंडकरी खेतकऱ्याची जी जमीन आहे ती पश्चिम महाराष्ट्रातील जमीन परत देऊन टाकण्यासाठी विधेयक आले आहे. शेती महामंडळाकडे असलेली शेकडो एकर जमीन नुसती पडून होती. शेती महामंडळाने महाराष्ट्र शासनाकडून कोट्यवधी रुपयांचे अनुदान घेतले परंतु या जमिनीचा उपयोग केला नाही. त्यामुळे त्या जमिनी तशाच पडून राहिल्या. त्यावेळचा निर्णय स्वागतार्ह होता आणि आताचाही निर्णय स्वागतार्ह आहे. आम्ही काही करीत नाही आणि दुसऱ्याला काही करु देत नाही असे ज्यावेळी घडते त्यावेळी शेतकऱ्यांच्या ताब्यामध्ये जमीनी द्याव्यात या भूमिकेचे आम्ही स्वागत केले.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 18:30

(श्री. दिवाकर रावते...)

आता दोन प्रश्न निर्माण झालेले आहेत. आपली उपासमार होऊ नये या भावनेतून शेती महामंडळाचे कर्मचारी कोर्टात गेले. शेती महामंडळातील कर्मचा-यांची संख्या अतिरिक्त झाली. शेकडो हेक्टर जमीन मोकळी होण्याची चांगली घटना घडली. परंतु या कर्मचा-यांचे काय करणार ? सभापती महोदय, हे शेती महामंडळ संपुष्टात आणा. त्याला बाद करा. माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी जो विषय याठिकाणी मांडला त्या विषयातील स्पेसिफिक मुद्दे मी येथे मांडतो. महाराष्ट्रातील अनेक शेतकरी हे त्यांची शासनाकडे असलेली जमीन परत मिळेल याची वाट पाहात आहेत. महाराष्ट्रातील 4 कृषी विद्यापीठांकडे अक्षरश: शेकडो हेक्टर जमीन पडून आहे. केवळ कोकण कृषी विद्यापीठाने त्यांच्या ताब्यात असलेल्या जमिनीवर आंबा, काजू इत्यादीच्या बाबतीत प्रयोग करुन ताब्यात असलेल्या संपूर्ण जतिमनीचा वापर करण्याची क्षमता दाखविली आहे. अन्य 3 कृषी विद्यापीठांकडे तर जमीन नुसती पडून आहे. पंजाबराव कृषी विद्यापीठाच्या जमिनीवर तर झ ोपडपट्टीचे अतिक्रमण होत आहे. हे अतिक्रमण काढण्याची क्षमता त्या कृषी विद्यापीठामध्ये नाही. या पंजाबराव कृषी विद्यापीठाच्या संदर्भात एकेकाळी इतकी गंभीर परिस्थिती होती की, या सरकारमधील एक मंत्री महोदय स्वत:च्या बंगल्यात कृषी विद्यापीठाची वीज चोरुन वापरत असल्याच्या बातम्या दै. देशोन्नतीमध्ये छापून आल्या होत्या. त्याबाबतीत त्या मंत्र्यांविरुध्द शासनाने काहीच केले नाही. कृषी विद्यापीठ देखील त्या मंत्र्यांच्या बाबतीत काही करु शकले नाही. हे कृषी विद्यापीठ जर झोपडपट्टी काढू शकत नाही तर मग मंत्र्यांना काय जाब विचारणार ? पंजाबराव कृषी विद्यापीठाकडे एवढी जमीन पडून आहे की, त्या जमिनीचे नियोजन करण्याकरिता त्यांच्याकडे तेवढा स्टाफ नाही. ह्या जमिनी शेतक-यांना मिळाव्यात अशी शासनाने भूमिका जाहीर केलेली आहे. मला काय बोलायचे आहे त्याची कल्पना माझ्या अकोटच्या मित्रांना आली असेल. मराठवाडा कृषी विद्यापीठाची परिस्थिती तर आणखीन गंभीर आहे. त्या विद्यापीठाकडे शेकडो एकर जमीन पडून आहे. विद्यापीठाच्या तिजोरीत पैसा नाही. त्यामुळे त्या जमिनीवर त्यांना काही करता येत नाही. मग या अतिरिक्त जमिनीचे काय करायचे ? तुमच्या तिकडच्या राजकारण्यांनी या जमिनींच्या बाबतीत राजकारणाचा धंदा केला आहे. ज्यांच्या जमिनी गेल्या त्यांना सांगितले की, ह्या जमिनी आपल्याला परत मिळाल्या पाहिजेत. खंडकरी शेतक-यांना जशा जमिनी परत केल्या त्याप्रमाणे ह्या

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते....)

जमिनी परत दिल्या पाहिजेत. या मताशी मी देखील ठाम आहे. सभापती महोदय, मी हे नमूद करु इच्छितो की, आमदाराला विधिमंडळाचे नियम तसेच विधिमंडळात केल्या जाणा-या कायद्यांची पूर्ण जाणीव असली पाहिजे. अशी जाणीव नसणारा आमदार जर अधिकाराच्या पलीकडे जाऊन काही करीत असेल तर त्याची आमदारकी रद्द झाली पाहिजे.. विद्यापीठाच्या कुलगुरुंना मारहाण करायची, त्यांच्या विरोधात लोकांना भडकवायचे आणि खटले गरीब शेतक-यांवर भरायचे असे प्रकार झालेले आहेत. ह्या जमिनी शेतक-यांना देता येणार नाहीत असा सुप्रिम कोर्टाने निर्णय दिला. मग त्या जमिनी लिलावाच्या माध्यमातून तरी द्याव्यात. कोर्टाने स्थगिती दिल्यामुळे शेतक-यांना जमिनी परत मिळण्यासाठी 90 दिवसाच्या आत अर्ज करता आला नाही. त्यानंतर आता ही कायद्यामध्ये सुधारणा करण्यात येत आहे. शेतक-यांच्या जमिनी त्यांना परत मिळाल्या पाहिजेत ही शासनाची भूमिका स्पष्ट आहे. कोर्टाने निर्णय दिलेला असला तरी, जर विद्यापीठाला जमिनीची आवश्यकता नसेल, त्या जमिनी वापरण्याची क्षमता विद्यापीठाकडे नसेल, त्या जमिनीवर विद्यापीठाकडून कोणतीही प्रयोगशीलता, उपक्रमशीलता होणार नसेल, ......

...नंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ MHM/ पूर्वी श्री.शिगम 18:35

श्री. दिवाकर रावते ...

आणि उध्वस्त झालेला शेतकरी फक्त नोकरीच्या जिवावर घर चालवीत असेल तर त्याने विद्यापीठाला दिलेली जमीन परत मिळणे आवश्यक आहे. यासाठी जरुर तर कायदा तयार करा. मी यानिमित्ताने सांगू इच्छितो की, पंजाबराव कृषी विद्यापीठ आणि मराठवाडा कृषी विद्यापीठाकडे जी अतिरिक्त जमीन आहे ती जर विद्यापीठाच्या कामाला येत नसेल तर शेतकऱ्यांना परत करा. एकीकडे नोकऱ्या मिळत नाहीत तरी सुध्दा शेतकऱ्यांना जमिनी परत मिळत नाहीत. आज मराठवाडा कृषी विद्यापीठाकडे साडेसहा एकर जमीन आहे. त्यातील फक्त 1.5 एकर जमीन वापरात आहे. बाकीची जमीन तशीच पडून आहे. या जमिनीला कंपाऊंड घालण्याची सुध्दा विद्यापीठाची ऐपत नाही. जमीन नांगरण्यासाठी आणि पेरण्यासाठी शेतकऱ्यांनी आंदोलन केले. शासनाचे याबाबतीतील धोरण बरोबर नाही. काही गोष्टी याठिकाणी रेकॉर्डवर आल्या पाहिजेत. सरकारमधील कॅबिनेट मंत्र्यांना ज्यावेळी एखादी गोष्ट बाहेर बोलावयाची असेल त्यावेळी ती गोष्ट सरकारचे धोरण म्हणून बोलावी लागते. कॅबिनेट मंत्री शासनाचे धोरण म्हणून बोलत असतो. या सदनाचे सदस्य माननीय श्री. गोविंदरावजी आदिक मागील काळात कृषीमंत्री होते. त्यांची आणि माझी अनेकदा भेट होत असे. आम्ही या संदर्भात चर्चा देखील करीत असू. कृषीमंत्री असताना त्यांनी जाहीर केले की शेतकऱ्यांना जमिनी परत केल्या जातील. मंत्री म्हणून बोलताना प्रसिध्दीच्या मागे न लागता आणि व्यक्तिगत प्रसिध्दीचा विचार न करता जनहिताच्या दृष्टीने सरकारची भूमिका रोखठोकपणाने मांडण्याची हिंमत करावी लागते. तेव्हा त्यांना सांगितले की अशा प्रकारचे आश्वासन देऊ नका. कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या कालच्या नाशिक येथील सभेमध्ये ज्याप्रमाणे गोंधळ झाला तसा गोंधळ श्री. आदिक यांच्या सभेमध्ये झाला होता आणि त्यांना वाटले की शेतकऱ्यांना कशासाठी बोलाविले ? सभापती महोदय, हा प्रश्न अत्यंत गंभीर आहे. ज्यांनी विद्यापीठाला जमिनी दिल्या त्यांची आज तिसरी पिढी आली तरी त्यांच्या मुलांना नोकऱ्या मिळत नाहीत. विद्यापीठे या जमिनीचा वापर करण्यासाठी सक्षम नाहीत. पश्चिम महाराष्ट्रासाठी ज्याप्रमाणे निर्णय घेता त्याप्रमाणेच विदर्भ आणि मराठवाडयातील शेतकऱ्यांना न्याय मिळण्यासाठी ही जमीन शेतकऱ्याला परत दिली गेली पाहिजे. कृषी विद्यापीठांनी घेतलेली जमीन शेतकऱ्यांना परत करा. यासाठी कायदा करा. विद्यापीठांना विचारावे की तुम्हांला किती जमीन हवी आहे आणि किती अतिरिक्त आहे त्यानुसार त्याचा विनियोग करावा. सरकारने याबाबतीत ठाम भूमिका घेऊन येत्या

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

पावसाळी अधिवेशनात किंवा नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात कायदा करावा. शेतकऱ्यांना या त्रासातून मुक्ती देण्याचे काम शासनाने करावे अशी मी विनंती करतो. आज शेतकऱ्यांची तिसरी पिढी आली तरी त्यांना वडिलोपार्जित जमीन मिळत नाही. महाराष्ट्रामध्ये इतर प्रकल्पांमध्ये सुध्दा शेतकऱ्यांची शेकडो एकर जमीन गेलेली आहे. मराठवाडा विकास मंडळ बंद पडलेले आहे परंतु त्यांच्याकडे शेकडो एकर जमीन आहे. त्याठिकाणी फक्त एक कर्मचारी काम करीत आहे. म्हणून ही जमीन सुध्दा मूळ मालकाला परत करण्यात यावी. ही जमीन महामंडळ सांभाळू शकत नाही. म्हणून अशा प्रकारच्या जमिनी मूळ मालकांना आणि शेतकऱ्यांना परत करा अशी कळकळीची विनंती करतो आणि या बिलाला पाठिंबा देऊन मी माझे भाषण संपवितो.

**उपसभापती** : सिडकोकडे अतिरिक्त असलेली साडेबारा टक्के जमीन शेतकऱ्यांना आणि मूळ मालकांना परत करण्याचा निर्णय झाला होता परंतु त्याची अंमलबजावणी झालेली नाही. तसेच कळवा येथील मफतलाल कंपनीसाठी अधिग्रहित केलेली जमीन शेतकऱ्यांना परत करण्याबाबत विनंती अर्ज समितीकडे प्रकरण आले होते समितीने शिफारसही केली होती परंतु या संदर्भात शासनाकडून न्यायालयाच्या निकालाचा आधार घेण्यात आला.

यानंतर श्री. खर्चे पी.

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** .......

न्यायालयाचा दाखला या प्रकरणात दिलेला आहे. मूळ शेतकऱ्याच्या जमिनीचा वापर संपला असेल तर त्या जमिनी मूळ मालकांना द्याव्यात. हया जमिनी बाजारभावाने ते मूळ मालक घेण्यास तयार आहेत. या अनुषंगाने तसेच आणखी दोन तीन गोष्टींचा मंत्री महोदयांनी सहानुभूतीने विचार करुन त्यावरील उत्तर द्यावे, अशी मी सूचना करु इच्छितो.

श्री. दिवाकर रावते : महोदय, मी इंडस्ट्रीजसंबंधीचा विषय काढणार नव्हतो परंतु आपण आता दाखला दिल्यामुळे मी पैठण येथील विषय मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून इच्छितो. पैठण येथील जमीन इंडस्ट्रीजसाठी संपादित केली होती व त्या ठिकाणी फक्त दोनच इंडस्ट्रीज सध्या आहेत. परंतु गेल्या 25 वर्षांपासून ही जमीन तशीच पडून आहे. तशीच परिस्थिती नागपूर येथील कार्गो-हबच्या संदर्भात आहे. त्याचबरोबर राज्यात अशा अनेक ठिकाणी एमआयडीसी साठी शासनाने जमिनी संपादित करुन ठेकेदारांची पोटे भरली व शेतकरी मात्र उध्वस्त झालेले आहेत. अशा प्रकारे संपूर्ण राज्यातील जमिनींबाबत सार्वत्रिक विचार करुन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी माझी विनंती आहे.

--------------

.........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गोविंदराव आदिक (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी या विधेयकावरील दुरुस्तीवर बोलणार नव्हतो परंतु सन्माननीय सदस्य श्री. रावते यांनी आपल्या भाषणातून जो उल्लेख केला तो चुकीचा उल्लेख रेकॉर्डवर राहू नये म्हणून त्यासंबंधीचा खुलासा करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, हा खुलासा करण्यापूर्वी जे दुरुस्ती विधेयक या ठिकाणी शासनाकडून आलेले आहे त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो व मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. जे शेतकरी ही जमीन परत मिळण्याबाबत 90 दिवसांची अट असल्यामुळे वंचित राहणार होते ते वंचित राहू नयेत म्हणून ही दुरुस्ती करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे या सदनातील ज्येष्ठ सदस्य आहेत, सामाजिक न्यायाच्या भूमिकेतून ते नेहमीच आग्रही असतात, पोटतिडीकीने बोलतात, शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर नेहमीच बोलत असतात. परंतु पुष्कळ वेळा कधी कधी काय होते हे मला माहिती नाही, त्यांच्याकडून चुकीचा उल्लेख होतो. या ठिकाणी त्यांनी असा उल्लेख केला की, "मी कृषी मंत्री असतांना, कृषी मंत्री या नात्याने मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या संदर्भात त्यांच्याशी चर्चा केली" ही गोष्ट खरी आहे की, अनेक वेळा त्यासंदर्भातच नव्हे तर दोन्ही सदनाच्या सन्माननीय सदस्यांबरोबर चर्चा केली होती. महात्मा फुले विद्यापीठ, मराठवाडा कृषी विद्यापीठ तसेच डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ या विद्यापीठांच्या जमिनीच्या बाबतीत ज्या जमिनी विद्यापीठांकडे जास्तीच्या झालेल्या आहेत, त्या मूळ मालकांना परत करण्याच्या संदर्भात जी मागणी होती त्यासाठी मी पुढाकार घेतला होता. सन्माननीय सदस्यांना मी अनेक वेळा बोललो की आपले सहकार्य मला याबाबतीत मिळावे. मी शासनाचा कृषी मंत्री या नात्याने माझी भूमिका मांडत होतो. ज्या जमिनी कृषी विद्यापीठांना आवश्यक नाहीत, जरुरीपेक्षा जास्त जमिनींचे संपादन करण्यात आले आहे, ही वस्तुस्थिती आहे. अशा जमिनी शेतकऱ्यांना वहितीसाठी दिल्या तर शेतकऱ्यांना उपजिविकेचे साधन मिळेल आणि त्यांच्यावरील अन्याय दूर होईल हे माझे वैयक्तिक मत होते. परंतु शासनाच्या पातळीवर तसा निर्णय झालेला नव्हता आणि मी शासनाचा निर्णय कधीही जाहीर केलेला नाही.

---------

यानंतर श्री. भारवि .......

03-04-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) ZZ 1

BGO/ MHM/ SBT/ खर्चे.. 18:45

श्री.गोविंदराव आदिक...

आपण सांगितले की, शासन म्हणून तेव्हा मी निर्णय जाहीर केला. भोंगळ आश्वासन दिले असा शब्द सन्माननीय सदस्यांनी वापरला आहे. हा फार अन्यायकारक शब्द आहे. मी सभागृहामध्ये मागे बसलेलो असल्याने मी नाही असे समजून ते बोलले असतील अशी माझी समजूत आहे. येथे त्यांनी दुसरा उल्लेख केला आहे, तो वस्तुस्थितीला धरून नाही. जेव्हा सभा झाली तेव्हा मंत्र्यांना पळ काढायला लागला, असा उल्लेख करण्यात आला. मी कोणतीही बैठक परभणीमध्ये घतलेली नव्हती. मी जेवढया म्हणून बैठका घेतल्या आहेत, त्या मंत्रालयातच घेतलेल्या आहेत. मी परभणीला एकही बैठक घेतलेली नाही. काल कांद्याच्या प्रश्नासंबंधी जसा प्रकार घडला तसा माझ्या बाबतीत घडलेला नाही. शेतकऱ्यांना जमिनी परत करण्यासंबंधीचा निर्णय हा विद्यापीठ कायदा, महसूल कायदा, भूसंपादन कायदा यातील ज्या तरतुदी आहेत त्या लक्षात घेऊन करावयाचा होता. मी ज्यावेळी मंत्री होतो त्यावेळी फक्त यासंबंधीची प्रोसेस सुरू झाली होती. या जमिनी परत करण्याकरिता शेतकऱ्यांनी एकमत करून प्रस्ताव द्यावा असे सुचविले होते. परत यात एक मुद्दा होता. आपण सर्व जमिनी परत करू शकत नव्हतो. सर्व शेतकऱ्यांची अपेक्षा होती की, त्यांच्या जमिनी परत मिळाव्यात. जी जमीन अतिरिक्त ठरत होती, तेवढीच आपण देऊ शकत होतो. ती द्यायची असेल, तर ती कोणाला द्यायची, कशी द्यायची यासंबंधी विचार करावयाचा होतो. कारण यात मूळ मालक व अन्य यामध्ये वाद सुरू झाला होता. यासंबंधी एक प्रस्ताव शासनाला सर्वसंमतीने द्यावा व तो शासन स्वीकारेल अशा पध्दतीचे प्रयत्न मी सुरू केले होते. अशी कोणती सभा किंवा बैठक झाली नाही त्यातून मला पळ काढावा लागला. मेहरबानी करून येथे जो उल्लेख करण्यात आलेला आहे, तो अन्यायकारक आहे. तो उल्लेख रेकॉर्डवरून काढून टाकावा अशी माझी आपल्याला विनंती आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य तेथे होते किंवा नव्हते हा विषय महत्त्वाचा नाही. सन्माननीय सदस्यांनी मंत्री या नात्याने त्यावेळी जो निर्णय घेतला होता त्याचे मी स्वागत केले आहे. मी असे म्हटले होते की, कॅबिनेट मंत्र्याला स्वत:चे वैयक्तिक असे मत असू शकत नाही. त्यांचे जे म्हणणे असते, ते सरकारचे असते असे लोक समजतात. मी ज्या बैठकीचा उल्लेख केलेला आहे. ती संभाजीनगर मधील होती. आमदारांनी असे करता कामा नये असेही मी बोललो होतो. त्यावेळी आमदार कोण होते हे देखील त्यांनी आठवावे. सन्माननीय सदस्यांचे वैयक्तिक मत होते, त्याचे मी स्वागत करतो. पण त्यावेळी त्यांनी मंत्री म्हणून मत मांडले होते. आज ते मत वैयक्तिक असू शकते. ज्यावेळी मंत्री बोलतो त्यावेळी ती सरकारची भूमिका असते असे संपूर्ण महाराष्ट्राचे म्हणणे आहे. आपण जे मत मांडले ते वैयक्तिक आहे असे म्हणू नका. कारण त्यात शेतकऱ्यांचे हित आहे. आपण जर मंत्री असता तर कदाचित आपली भूमिका आपण रेटलीसुध्दा असती. तेव्हा बाकीचा जो काही उल्लेख आहे तो योग्य की अयोग्य आहे, यात न जाता आपण वैयक्तिक मत मांडण्याचा जो निर्णय घेतला तो योग्य होता. म्हणून येथे आपण व मी जो काही विचार मांडला आहे, तो शेतकऱ्यांच्या हितासाठी आहे. तो या माध्यमातून पुढे न्यावा अशी विनंती करीत आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.राजेंद्र शिंगणे (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, हे विधेयकाच्या माध्यामातून खंडकरी शेतकऱ्यांना 90 दिवसांची मुदत देत आहोत. महाराष्ट्रातील अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी कृषि विद्यापीठ व विविध प्रकल्पांच्या नावाखाली नुसत्या पडून आहेत. त्या जमिनी शेतकऱ्यांना परत मिळाल्या पाहिजेत, अशी आग्रही मागणी येथे अनेक सन्माननीय सदस्यांनी केली आहे. माननीय सदस्य सर्वश्री रावते, सरपोतदार, कवाडे, आदिक इत्यादींनी या विधेयकाला पाठिंबा दिला आहे. त्याबद्दल मी त्यांचे मनापासून आभार मानतो. खरे म्हणजे आपण शेतकऱ्यांचीच जमीन त्यांना पुन्हा परत करीत आहोत. म्हणजे आपण शेतकऱ्यांवर उपकार करीत आहोत, अशातला भाग नाही. खंडकरी शेतकऱ्यांच्या जमिनी परत करीत असताना ज्या कायदेशीर अडचणी आहेत, त्या दूर करण्याचा प्रयत्न या विधेयकाच्या माध्यामातून आपण करीत आहोत.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ SBT/ MHM/ पूर्वी श्री.भारवि.... 18:50

डॉ.राजेंद्र शिंगणे....

सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी कृषी विद्यापीठाकडे अतिरिक्त असलेली हजारो एकर जमीन शेतकऱ्यांना परत करण्यासंदर्भात शासनाने कायदा करावा व त्याबाबतचे विधेयक सभागृहासमोर आणावे अशा प्रकारची अतिशय चांगली सूचना केली आहे. विद्यापीठाकडे अनेक वर्षांपासून अतिरिक्त जमिनी पडून आहेत ही वस्तुस्थिती आहे. विद्यापीठांमध्ये वेगवेगळे संशोधन करण्यासाठी शेतकऱ्यांची हजारो एकर जमीन घेण्यात आलेली आहे. परंतु अलिकडच्या काळामध्ये त्या जमिनीवर अतिक्रमण होत आहे. आज तर अशी परिस्थिती आहे की, विद्यापीठाकडे तार फेंसिंग करण्यासाठी सुध्दा पैसा नाही. त्यामुळे ज्या जमिनी पडित आहेत त्या शेतकऱ्यांना परत करण्याबाबत या ठिकाणी सूचना करण्यात आलेली आहे. एकीकडे विद्यापीठाकडे जमिनी पडून आहेत, तर दुसऱ्या बाजूला शेतकऱ्यांना जमिनी नाहीत. भूमिहीन शेतकऱ्यांना, अल्प भूधारक शेतकऱ्यांना जमिनी दिल्या पाहिजेत म्हणून अलिकडच्या काळात शासन घोषणा करीत आहे आणि नवीन नवीन योजना आणत आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जी सूचना केली आहे त्यासंदर्भात निश्चितपणाने पुढील काळात, कृषी विद्यापीठाकडे शेतकऱ्यांच्या ज्या अतिरिक्त जमिनी आहेत आणि ज्यांचा उपयोग अलिकडच्या काळात होत नाही, त्या जमिनी शेतकऱ्यांना परत मिळाव्यात म्हणून शासनाकडून प्रयत्न केला जाईल आणि त्या संदर्भातील विधेयक लवकरात लवकर आणण्याचा प्रयत्न केला जाईल.

शासनाकडून धरणासाठी, तलावासाठी, रस्त्यांसाठी जमीन संपादित केली जाते. परंतु प्रकल्पासाठी जेवढी जमीन लागते त्यापेक्षा जास्त जमीन संपादित केली जाते. प्रकल्प पूर्ण होऊनही, संपादित केलेल्या ठिकाणी जमीन शिल्लक राहते. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी मागणी केलेली असतानाही, त्या जमिनी त्यांना देऊ शकत नाही. केरळमध्ये भास्कर पिल्ले आणि इतर व्यक्ती न्यायालयात गेल्या होत्या. त्यांच्या केसच्या संदर्भात तेथील उच्च न्यायालयाने संपादित केलेली जमीन परत करीत असताना निश्चितपणाने जमिनीचा लिलाव करुनच, ती परत करावी अशा प्रकारचा निर्णय दिला होता. मागील आठवडयात मुंबई उच्च न्यायालयाने सुध्दा संपादित जमिनीबाबत निर्णय दिलेला आहे. मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय आणि केरळ न्यायालयाने दिलेला निर्णय आम्ही तपासून घेऊ. त्यानंतर राज्यामध्ये संपादित केलेल्या अतिरिक्त जमिनी शेतकऱ्यांना परत करुन, त्यांना न्याय देता येईल काय, याबाबत निश्चितपणाने पुढाकार घेऊन, काम करण्याचा प्रयत्न करणार आहोत.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.राजेंद्र शिंगणे....

तसेच सिडकोने स्थानिक शेतकऱ्यांची संपादित केलेली जी जमीन होती, त्यातून अतिरिक्त ठरलेली साडेबारा टक्के जमीन मूळ शेतकऱ्यांना परत करण्यात यावी अशा प्रकारची सूचना करण्यात आलेली आहे. याबाबत माननीय मुख्यमंत्री आणि नगर विकास खात्याचे माननीय मंत्री महोदयांशी चर्चा करुन, तसेच विधी व न्याय विभागाचा सल्ला घेऊन, शासनाकडून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. तसेच वेगवेगळया प्रकल्पांच्या माध्यमातून संपादित केलेली जी जमीन अतिरिक्त ठरलेली आहे ती जमीन शेतकऱ्यांना परत करण्यासाठी शासनाकडून निश्चितप्रकारे कार्यवाही केली जाईल एवढेच या निमित्ताने सांगतो आणि हे विधेयक सभागृहाने एकमताने मंजूर करावे अशी विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 व 3 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक-12 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक-12 संमत झाले आहे.

---------

नंतर श्री.कांबळे....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**शेतकऱ्यांच्या आत्महत्यांविषयी**

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मी अतिशय महत्वाच्या विषयाकडे सभागृहाचे लक्ष वेधू इच्छिते. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांविषयी दोन्ही सदनामध्ये बऱ्याच वेळा चर्चा झालेली आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांवर वेगवेगळा अभ्यास देखील करण्यात आलेला आहे. सभापती महोदय, सांगावयाची एक गोष्ट म्हणजे, नाशिकच्या " दैनिक सकाळ " च्या शंभर पत्रकारांच्या टीमने प्रमुख श्री. उत्तम कांबळे, श्री. अभिजित पवार, श्री. संजीव लाटकर व ॲग्रोवनचे संपादक श्री. निशिकांत भालेराव यांच्या मदतीने " शेतकऱ्यांच्या आत्महत्या " या विषयावर एक अभ्यासपूर्ण अहवाल तयार केलेला आहे. शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या कशा टाळता येतील याबाबत सकारात्मक दृष्टीकोन ठेवून वेगवेगळ्या गावांतून माहिती देखील जमा केलेली आहे. सभापती महोदय, या संदर्भातील सी.डी. मी आपल्यामार्फत सदनाला देऊ इच्छिते जेणेकरुन या माहितीचा शासनाने अभ्यासासाठी जास्तीत जास्त उपयोग करावा व त्या संदर्भातील अंमलबजावणीमध्ये गांभीर्याने लक्ष घालावे.

डॉ. राजेंद्र शिगणे : सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केलेल्या सूचनेसंदर्भात मी त्यांना सांगू इच्छितो की, या संदर्भातील अहवाल शासनास अगोदरच प्राप्त झालेला आहे. तो अहवाल विचारात घेऊनच पुढील उपाययोजना करण्यासंदर्भात कार्यवाही करण्याचा सरकार प्रयत्न करत आहे.

----

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आता सायंकाळचे सात वाजत आले आहेत. तरी, आताचा हा अल्पकालीन चर्चेचा प्रस्ताव उद्या सकाळी घेण्यात यावा.

**उपसभापती** : उद्या सकाळी 10.00 ते 12.30 वाजेपर्यंत अशासकीय विधेयके आहेत. आजचा अल्पकालीन चर्चेचा प्रस्ताव आपण उद्या विरोधी पक्षातर्फे सुचविण्यात येणारा प्रस्ताव म्हणून घेऊ शकतो.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आम्ही वेगळ्या विषयावर प्रस्ताव दिलेला आहे.

**उपसभापती** : ठीक आहे. आता अल्पकालीन चर्चा घेण्यास माझी काहीही हरकत नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अल्पकालीन चर्चा उद्या सकाळी घ्यावी व अशासकीय कामकाज परवा घ्यावे.

**उपसभापती** : ठीक आहे. उद्या सकाळी 10.00 ते दुपारी 12.30 या कालावधीत आपण अशासकीय विधेयके घेणार होतो, परंतु आता सभागृहाने मागणी केल्यानुसार व सभागृहाच्या संमतीने ही अशासकीय विधेयके बुधवारी सकाळी 10.00 ते दुपारी 12.30 या वेळेत घेण्यात येतील आणि आज असलेली अल्पकालीन चर्चा उद्या सकाळी 10.30 ते 12.30 या वेळेत घेण्यात येईल. आता सभागृहाची बैठक स्थगित होत आहे. सभागृहाची विशेष बैठक सकाळी 10.00 ते 12.00 पर्यंत व सभागृहाची नियमित बैठक उद्या दुपारी 1.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 18 वाजून 59 मिनिटांनी, मंगळवार, दिनांक 4 एप्रिल, 2006 च्या सकाळी 10.30 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही